म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय नाटक
दा क्र ८८६
जुलै १९३३.

थमाला

ग.

]

IRBK-0100886



लेखक—व्यंकटेश विष्णु वैद्य.

IRBK-0100886
IRBK-0100886

पुष्प दुसरें

ऑगस्ट १९२९.

किंमत बारा आणे.

म. म. स. ठाण, वाचनालय शाखा.
क्र. ८८८ नों. दि
वि. नाट्य

॥ श्रीश वंदे ॥

# गोमांतक-गौरव-ग्रंथमाला.

पुष्प दुसरें

संगीत

# स्वार्थत्याग.

[ अंक १ ते ४. ]

लेखक

व्यंकटेश विष्णु वैद्य.

ऑगस्ट १९२९.

IRBK-0100886
IRBK-0100886

किंमत १२ आणे.

प्रकाशक
व्यं० वि० वैद्य,
C/o लोकमित्रकार्यालय,
पो० खानापूर–बेळगांव.

* * *

[ सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन. ]

* * *

मुद्रक
द० गो० सडेकर,
प्रो० 'धनंजय'मुद्रणालय,
पो० खानापूर–बेळगांव.

# निवेदन.

रामवनाभिगमनाच्या कथाभागावर श्री. किर्लोस्कर यांचें "रामराज्य-वियोग" श्री. खाडीलकर यांचें "सवतिमत्सर" श्री. कुळकर्णी यांचें "बंधुप्रेम" इत्यादि अनेक नाटकें मराठी भाषेंत लिहिलीं गेलीं असतां त्याच विषयावर आणखीहि नाटक लिहिण्याचें प्रयोजन काय असा विचार सकृद्दर्शनीं सामान्य वाचकांच्या मनांत उद्भूत झाल्यास नवल नाहीं. वाल्मिकी रामायणांत जरी काव्यसौंदर्याकरितां अनेक असंभाव्य गोष्टींचा समावेश झालेला असला, तरी रामायण हा एक इतिहासग्रंथ आहे आणि त्या ग्रंथावरून आर्यांच्या तत्कालीन समाजस्थितीचें ज्ञान चांगल्या रीतीनें होतें यांत संशय नाहीं. रामचन्द्राच्या यौवराज्याभिषेकोत्सवासारखा महत्वाचा समारंभ असतां, त्याचा प्रेमळ बंधु भरत नंदिग्रामास मातूलगृहीं कां असावा ? हें एक कोडेंच आहे आणि त्या कोड्याचें समाधानकारक उत्तर खुद्द रामायणकर्त्यांनीं किंवा वरील तीनही नाटककारांनीं दिलेलें नाहीं. हें कोडें प्रस्तुत लेखकाच्या मनांत कित्येक दिवसपर्यंत घोळत असल्यानें लेखकाच्या अल्पमतीप्रमाणें त्या कोड्याचें उत्तर या नाटकांत देण्याचा यथाशक्ति प्रयत्न करण्यांत आला आहे. उच्चकुलीन राजघराण्यांतील कन्येला वयानें लहान असली तरीहि पट्टराणीपदाचा मान देण्याचा प्रघात आधुनिक कालांतही आपण सूर्याचे वंशज समजणाऱ्या राजस्थानांतील रजपूतांतहि होता हें मशहूर आहे. उदेपूरच्या राजघराण्यांतील कन्येला उदेपुरी महाराणी या नांवानें संबोधून तिला पट्टराणीपदाचा सन्मान समर्पण करण्याची चाल संपूर्ण राजस्थानांत कांहीं कालामागें होती. एरवीं वरांची असंभाव्य भानगड एकाएकीं उपस्थित होणें अशक्यच आहे. पुत्रकामेष्टी यज्ञाचे वेळींहि कैकेयी सन्मानाकरितां रुसून बसली होती, ही कथाहि प्रसिद्ध असल्यानें आमच्यास तर्कास त्या योगानें दुजोरा मिळतो; परंतु

कांहीं जरी असलें तरी रामवनाभिगमन ही ऐनवेळीं उपस्थित झालेली गोष्ट नसून, अयोध्येच्या राजघराण्यांत युवराज कोणाला करावें ह्या विषयींचें कारस्थान अनेक वर्षेपर्यंत शिजत होतें. खरें पाहिल्यास रामचंद्रापेक्षांहि भरताचेंच चरित्र रामायणांत जास्त उदात्त व विशुद्ध रंगविलेलें आहे. अशा स्थितींत राज्यलोभास वश होऊन भरतासारखा स्वार्थत्यागी, निरपेक्ष व शांततावादी पुरुष कांहीं भानगड उपस्थित करील अशी शंका सुद्धां घेण्यास जागा नव्हती असें असतां ही स्थित्यंतरात्मक घटना कशी घडली हें योग्य पुराव्याच्या अभावीं केवळ अनुमानावर अवलंबून ठेवल्याशिवाय गत्यंतर नाहीं.

गोमांतकविजय ह्या माझ्या पहिल्या नाट्यकृतीस गोमांतकाच्या मानानें चांगला लोकाश्रय मिळाल्यानें प्रस्तुत हें दुसरें नाटक प्रसिद्ध करण्याचें धाडस केलें आहे. गोमांतकविजयाप्रमाणें या नाटकालाहि रसिक व वाङ्मयप्रेमी बंधु चांगला आश्रय देतील अशी आशा आहे. हें नाटक लिहिण्याच्या कामांत आमचे विद्वान् मित्र व कुकळ्ळी येथील श्रीशांतादुर्गा विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. नारायण श्रीधर प्रभु यांनीं अतिशय मदत केली. तसेंच कित्येक हौशी गानप्रिय मित्रांनीं आपला अमोलिक वेळ खर्चून पदांच्या चाली बसवून दिल्या. ह्या सर्व मित्रांचे आम्हीं अत्यंत आभारी आहोंत. या सर्व मित्रमंडळीचे उपकार औपचारिक आभार मानून फिटण्यासारखे नाहींत; परंतु " आम्हां घरीं धन शब्दांचींच रत्नें " असल्यानें त्या रत्नांचाच उपहार उपकारकर्त्यांस केल्यास नवल नाहीं.

खानापूर
ता० २४।८।२९

सर्वांचा नम्र,

व्यंकटेश विष्णु वैद्य.

# अर्पण-पत्रिका

श्रीमन्मातोश्री

**सौ० पद्मावतीबाई वैद्य**

हिच्या चरणांवर ही माझी द्वितीय नाट्यकृति
सप्रेमादरानें समर्पण केली आहे.

माते ! पुत्राचा जन्म होतांच त्याच्या भावी भाग्याच्या आशेनें मातेचें हृदय आनंदानें उचंबळून येतें. तसेंच माझ्या जन्माचे वेळीं तुझ्याहि अंतःकरणांत आनंदोर्मी उठल्या असतील; पण भावी कालांत त्या आनंदोर्मीस योग्य असें कार्य माझ्या हातून घडून येऊन तुझ्या पायांवर सुवर्णपुष्प कांहीं मला वाहतां आलें नाहीं. तरी या साहित्यपुष्पांतच तूं समाधान मानून घेशील ना ?

आपला बालक,
व्यंकटेश.

वंदेमातरम्

गोमान्तक गौरव ग्रन्थमाला

पुष्प पहिलें

# गोमान्तक विजय

लेखकः—व्यंकटेश विष्णु वैद्य.

सम्भाजी महाराजांनीं गोमान्तकविजय कसा केला हा रोमांचकारी इतिहास तुम्हाला समजून घ्यावयाचा आहे ना ? तर एक वेळ वरील नाटक अवश्य वाचा. कागद ग्लेज, बांधणी जाड पुठ्याची मजबूत, नाटकांत आधुनिक गायकी चालीचीं साठ सुन्दर पद्यें घातलीं आहेत. विद्वानांचे उत्तम अभिप्राय. किं. -॥-

---

लवकरच प्रसिद्ध होईल) पुष्प तिसरें (लवकरच प्रसिद्ध होईल.

# वीरवर पृथ्वीराज.

लेखकः—व्यंकटेश विष्णु वैद्य.

दिल्लीचा शेवटचा हिन्दुराजा पृथ्वीराज चव्हाण यांचें इतकें विस्तृत चरित्र मराठीभाषेंत प्रथमच प्रसिद्ध होत आहे. ह्यांत पृथ्वीराजाचा पराक्रम, समरसिंहाचा आत्मत्याग, चण्डमुण्डीराची स्वामिभक्ति, चन्दकवीचें चातुर्य इत्याद्यनेक प्रसंग ओजस्वीभाषेंत रेखाटले आहेत. अवश्य वाचा.

पुस्तकें मागविण्याचा पत्ता:-व्यंकटेश विष्णु वैद्य.

पो० कुडाळी-गोवा.

# निवडक उपयुक्त पुस्तकें.

| | | | |
|---|---|---|---|
| शिवणकला-परिज्ञान | ०--८--० | श्रीमद्भगवद्गीता | १--४--० |
| दंतमंजन | ०--८--० | मंगळसूत्र | ०--४--० |
| कलावैभव(आ.६वी.) | १--०--० | वनिताबोध | ०--६--० |
| बागाईत--शेती | ०--६--० | मोहनमाळ | ०--४--० |
| खतें करण्याचें पुस्तक | ०--४--० | गृहदेवता | ०--४--० |
| साबण करण्याचें पु० | ०--६--० | महिलाक्लेशनिवारण | ०-१०-० |
| रंगकलानिधी | ०--४--० | राजनैतिक कारस्थान | ०-१२-० |
| सिमेंट करण्याचें पु० | ०--३--० | कानडी-मराठी शिक्षक | ०--८--० |
| पेटंट औषधें | ०--४--० | आंगठीचा प्रभाव | ०--६--० |
| पेटंट मलमें | ०--३--० | मुद्रासामुद्रिक | ०--४--० |
| स्त्रियांची उद्योगशाळा | ०--४--० | सौंदर्यसाधन | ०--६--० |
| रबरस्टँप व शाई | ०--३--० | नरकाचा दरबार ! | १--०--० |
| सिसपेन्सिलींच्या कृती | ०--४--० | भोजप्रबंध | ०--४--० |
| स्त्रियांसाठीं घरगुती धं. | ०--४--० | रामतीर्थ-वचन-सुधा | ०--४--० |
| मुलांचे छोटेखानी धंदे | ०--३--० | १९२४ चा महाराष्ट्र | १-- ० ० |
| मेणबत्त्या क. पुस्तक | ०--३--० | नपुंसकत्वनिरसन | ०-१२-० |
| **इतर उपयुक्त** | | शांताराम | ०-१०-० |
| सर्वसंग्रह भाग १ ला | १--८--० | रंभा-शुक-संवाद | ०--०--६ |
| लो. टिळक (चरित्र) | १--०--० | उपदेशामृतबिंदु | ०--१--६ |
| महात्मा गांधी | ०--४--० | आत्मोद्धारबोध | ०--४--० |
| संस्कृत कवींचीं चरित्रें | ०--६--० | देवी कुमुदिनी | २--०--० |
| भजनसाम्राज्य | ०-१२-० | संसार-दर्पण | १--४--० |
| सुनीति-भागवत | ०-१२-० | आत्मसामर्थ्ययोग | १--०--० |
| श्रीस्वामीचरित्रसारामृत | ०--६--० | सार्थ गीतगोविंद | ०--८--० |

**पत्ताः—लोकमित्रकार्यालय, पो०-खानापूर-बेळगांव.**

ग्रा. क्र. ८८६
वा. ........ नं.
ता. ग.

संगीत

# स्वार्थत्याग

## अंक पहिला.

### प्रवेश पहिला.

मंगलाचरण

१. पद ( चालः--नमन पद युगाला० )

जगतिं जनरुपानें । प्रभु जो नटला । नयें तारि
जो भूमि । सारी विशाला ॥ ध्रु० ॥ उदित नव भावना ।
होत धरणीतला । विजयि त्या होऊं दे ।
हे विश्वपाला ॥ १ ॥

( वसिष्ठ एकटाच सचिंत बसला आहे, असा पडदा उघडतो )

वसिष्ठः—रामचंद्र आणि भरत ! दोघेही माझे प्रिय शिष्य ! सत्य, साहस, सौंदर्य इत्यादि सर्व सद्गुणांत समतुल्य ! इतकें असतां मला रामचंद्राविषयींच जास्त प्रेम कां वाटावें ? भरतांत असें काय उणें आहे, म्हणून त्याच्याविषयीं मला कांहींसा तिरस्कार वाटावा ? भरताचा स्वार्थत्याग, भरताची बंधुप्रीति, भरताचा सत्यवादीपणा, भरताचा पराक्रम इतका सोज्ज्वळ आहे कीं, सामान्य मनुष्यास रामचंद्रापेक्षांही भरताचें जास्त प्रेम वाटावें. भूतदयेनें अनुकंपित होऊन अव्याहतपणें रात्रीच्या रात्री दीनाची सेवा करणारा आज जगतितलावर भरतापेक्षां श्रेष्ठ पुरुष कोण आहे ? मानवांच्याच नव्हे, तर पशुपक्ष्यांच्या दुःखानेंही अंतःकरणापासून कळवळणारा

दयेचा सागर सबंध भारतवर्षांत भरत हा एकटाच आहे. राजपुत्र असूनहि वासनेचा क्षय केलेला, विवाहित असूनहि कामावर जय मिळविलेला, संसारांत असूनहि पराकाष्ठेचा सत्यवादी, पापी परकीयांवरही पुत्राप्रमाणें प्रेम करणारा भरत हा एकटाच महात्मा आहे. आकाश कोसळून पडो, पृथ्वी दुभंग होवो किंवा वाऱ्याची वावटळ येवो; सत्यापासून लेशमात्रसुद्धां न ढळणारा हा महात्मा मला कां प्रिय असूं नये? अयोध्येचें राज्य त्यास देण्यास दशरथ वचनबद्ध झाला असतांही मी त्याला मोडता कां घालावा! रामचंद्रापेक्षांही भरत जनतेस जास्त प्रिय असतां त्यास सिंहासनावरून खालीं ओढण्याचा मी कां प्रयत्न करावा! आहे! मी असा प्रयत्न करण्याला कारण आहे आणि तें केवळ राष्ट्रहितच होय! वर वर विचार करणाऱ्या सामान्य मनुष्यांना कांहींही वाटो; सत्याचें खरें स्वरूप न कळणाऱ्या सत्यवेड्यांना कांहींही दिसो; पण भरत राज्यपदीं आल्यास राष्ट्राचा घात होईल, अयोध्येचा नाश होईल आणि जनता पारतंत्र्याच्या पंकांत खोल रुतून बसेल! असलें हें भयानक दृश्य माझ्या डोळ्यांपुढें स्पष्टपणें दिसत असतां मी स्वस्थ बसून राहावें काय? दुर्गतीचा दावानल पेट घेणार, याची जाणीव झाली असतां मी मजा पाहात बसावें काय? ज्या राष्ट्राच्या उत्कर्षाकरितां आर्यलोक भारतवर्षांत आले, त्यावेळेपासून--मनुइक्ष्वाकूंच्या वेळेपासून--माझ्या पूर्वजांनीं अविश्रांत परिश्रम केले, तें राष्ट्र एका पोकळ वचनाच्या भरीं भरून मी बुडूं देऊं काय? नाहीं! नाहीं! ती गोष्ट माझ्या हातून कल्पांतींही घडणार नाहीं. मला राष्ट्रापेक्षां सत्य प्रिय नाहीं. आधीं राष्ट्राचें तारण आणि मग सत्याचें पालन!

२. पद ( चालः—अमर—पद पावे० )

गमत नच मातें । सत्य मह मोदकर । राष्ट्रींच
मन पाहीं ॥ ध्रु० ॥ भिरु मनुज वासना ।
प्रीतिला ठेविते । देशसुखसाधना । आड येई ॥१॥

सत्य, सत्य ही कांहीं वेगळी वस्तु नाहीं, तें मनुष्याच्या वासनेंतच समाविष्ट असतें. राष्ट्रापेक्षां सत्याला मी श्रेष्ठ स्थान देत नाहीं आणि देणारही नाहीं. ( दशरथ येतो. ) राजा ! बरा वेळेवर आलास. आज तुझ्याशीं मला अत्यंत महत्वाच्या गोष्टीविषयीं बोलावयाचें आहे म्हणून ह्या एकांतस्थानीं बोलावल्याबद्दल आश्चर्य वाटूं देऊं नकोस !

दशरथः—नाहीं ! महाराजांनीं या एकांतस्थानीं बोलावतांच कांहीं तरी षट्कर्णीं न होण्यासारखें राजकारण आहे, असा मी तर्क केलाच होता. बोला ! आपली काय आज्ञा आहे ती ?

वसिष्ठः—अयोध्येचें राजकारण करण्यांत माझे केस काळ्यांचे पांढरे झाले; परंतु इतकी आणीबाणीची वेळ कधींच आली नव्हती. आचरणांत आणल्यास सत्यहानि आणि न आचरणांत आणल्यास राष्ट्रहानि असा बिनतोड प्रसंग येऊन ठेपला आहे. बोल, तूं सत्याकरितां राष्ट्रावर पाणी सोडण्यास तयार आहेस, कीं राष्ट्राकरितां सत्याचा त्याग करण्यास तयार आहेस ?

दशरथः--मला दोन्हीही पाहिजेत. सूर्यवंशीय राजांनीं कोणताही प्रसंग आला तरी सत्याची कास सोडली नाहीं. सत्यप्रतिज्ञ म्हणून भारतवर्षांत सर्वांत श्रेष्ठ समजण्यांत येणारा हरिश्चंद्र हा सूर्यवंशीय होता, मग मीच त्याचा त्याग कसा करूं ? उलट उत्तानपाद, ध्रुव, दिलीप, रघु इत्यादि माझ्या पूज्य पूर्वजांनीं ज्या राष्ट्राचें संचालन, संवर्धन आणि संगोपन केलें, तें राष्ट्र मी कसें बुडवूं ?

३ पद ( चालः—शांति घना मानसा० )

देशसुखा मंगला द्वय हींच पाहीं । आधार दायीं ॥
ध्रु० ॥ जगतीं सुखाचा । नाकीहि साचा । अनु-
पम महति सुधेचा ॥ १ ॥

अखिल अवनीतलावर अगाध बुद्धिमत्तेचे सागर म्हणून गाजणारे गुरुमहाराज मला या संकटांतून मुक्त करणार नाहींत काय? या विपत्तींतून वांचण्याचा मला मार्ग दाखविणार नाहींत काय?

वसिष्ठः–नाहीं! राजा माझी बुद्धि येथें लुली पडते. आजच नव्हे तर कित्येक वर्षेंपर्यंत सारखा मी यासंबंधीं विचार करीत आहे. मेंदूला तीव्र ताप दिला, तरी या संकटापासून तारणारी तोड म्हणून मला सांपडत नाहीं. रात्रीच्या रात्री आलोचन जाग्रणें केलीं, विचाराच्या वावटळीनें विशाल मेंदू सुकवून टाकला; परंतु योग्य उपाय म्हणून सांपडत नाहीं. दोन्हीपैकीं एकाचा तरी बली हा दिलाच पाहिजे.

४. पद ( चालः–प्रेमसेवा शरण० )

तीव्र तापें सतत शिणविला मेंदु हा। योग्य मज
न दिसत याहुनी तें महा। ध्रु०। रवितप शम
दायी। द्विज आज नच पाहीं। सवितातपें होई।
वपु मंद हा पहा। १ ॥

दशरथः–आपणासारख्या मुत्सद्द्यांची मति मंद करणारी गूढ गोष्ट माझ्यासारख्या पामराला कशी कळणार? सर्व राजकारणाचा भार वशिष्ठ-कुळावर सोंपवून सूर्यवंशीय राजे आजपर्यंत स्वस्थपणें शत्रूचें दमन करीत आले आहेत. याच कुलाच्या बुद्धिमत्तेवर भरंवसा ठेवून रघूनें अश्वमेध यज्ञ केला आणि ब्राम्हणास अपार संपत्ति वाटून दिली; ह्याच कुलाच्या बुद्धिमत्तेनें दिलीपास कामधेनूची सेवा घडून, पुत्रप्राप्ति झाली; याच कुलाच्या बुद्धिमत्तेनें वेनाचा नाश होऊनही सूर्यवंश कायम राहिला! असल्या महान् महान् आपत्तींनाही तोंड देऊन ज्यानीं सूर्यवंशाचें मुख जगांत उज्ज्वल केलें, त्यांचीच मति मंद झाल्यावर मग काय उरलें? ब्राम्हणाची बुद्धिमत्ता, क्षत्रियाचें शौर्य आणि वैश्याचें साहस या त्रयविर हा आर्यजातीचा रथ उभा आहे. आर्य जातिरूपी रथाचीं हीं तीन चाकें

आहेत. ह्यांतून अग्रभागींच असलेलें चाक जर मोडून पडलें, तर उरलेल्या चाकांच्या बलावर हा रथ चालणें शक्य नाहीं.

५. पद ( चालः--निरखितां सुखवितेः )

विभविनी बळकृती ब्रम्हतेजा विना । भाग्यता
लाभतो क्षत्रिया नच रणा ॥ ध्रु० ॥ वैश्यां करीं
द्रव्य । सुसुर धरि मति भव्य । बल क्षत्रियां
नव्य । भरतभुमि तारणा । १ ॥

वसिष्ठः-याला कोणती तोड आहे, ह्याचें दिग्दर्शन मघांशींच केलें आहे. सत्य किंवा राष्ट्र ह्यांपैकीं कोणाचा तरी बली देणें, हीच ती तोड होय. यापूर्वींही तुझ्या पूर्वजांनीं अशाच युक्त्या योजून राष्ट्राचें रक्षण केलेलें आहे. वरुणाच्या वरानें उपलब्ध झालेल्या रोहिदासाचा राष्ट्रक्षयाच्या भीतीनें बली न देतां एका ब्राम्हण पुत्राच्या बलिदानानें वरुणास संतुष्ट करण्याचा प्रयत्न केला होता. सत्यप्रतिज्ञ हरिश्चंद्रानें त्यावेळीं राष्ट्रापुढें सत्याची दरकार केली नाहीं.

दशरथः--सत्याचा त्याग करून राष्ट्राचें रक्षण कर असा आपला गर्भित सल्ला आहे; पण तो सल्ला कळण्यापूर्वीं सत्याचें स्वरूप तरी कळणें इष्ट नाहीं काय ?

वसिष्ठः--आणि तेंच कळविण्याकरितां मी तुला बोलाविलें आहे. कैकेयीच्या लग्नाचे वेळीं तिच्या पुत्राला अयोध्येचें सिंहासन अर्पण करीन म्हणून कैकय देशाच्या राजाला दिलेलें वचन तुला आठवत असेलच.

दशरथः-होय आठवतें आणि योग्य वेळ येताच त्या वचनाप्रमाणें भरतास यौवराज्याभिषेक करण्याचा माझा मानस आहे. जनतेच्या एकनिष्ठ प्रेमास पात्र झालेल्या भरताला यौवराज्याभिषेक होणार, हें ऐकून कोणाला आनंद वाटणार नाहीं ? भारतभक्तीच्या भरतीनें कोणाचें हृदय भरून येणार नाहीं ? युवराजाची योग्य निवड केली म्हणून मला कोण धन्यवाद देणार नाहीं ?

वसिष्ठः-पण ज्येष्ठ पुत्राचा-रामचन्द्राचा-युवराजपदावर आरंभ असतां त्याला दूर सारून भरताची निवड करणें योग्य दिसेल काय ?

दशरथः—एक तर माझें या बाबतींत कैकेयीच्या पित्याला वचन गुंतलें आहे आणि अशीं उदाहरणें सूर्यवंशांत पूर्वीं पुष्कळदां घडलेलीं आहेत. राम पराक्रमी, धाडसी आणि शूर योद्धा आहे. तो सहज नूतनराष्ट्र निर्माण करील. सत्याला बाध न आणतां अयोध्येचें रक्षण तर होईलच; पण त्याबरोबर आणखीही एका नवीन उपराष्ट्राची जोड अयोध्येला लाभेल. माझ्या चारही पुत्रांनीं एकाच राष्ट्राकरितां भाण्डत न बसतां, अनार्यांचीं नूतन राज्यें संपादन करून तीं भरभराटीस आणावीं अशीच माझी इच्छा आहे आणि माझे शूर पुत्र ही इच्छा पूर्ण करतील अशी मला आशा आहे.

वसिष्ठः—पण भरताला यौवराज्याभिषेक केल्यानें ती इच्छा पूर्ण तर होणार नाहींच; तर अयोध्येचें राज्यही त्याला गमावून बसावें लागेल. नृपनीति वारांगनेसारखी आहे. त्या नीतींत केवळ बालक असलेला भरत सिंहासनारूढ होतांच अनार्यांचें प्राबल्य होऊन, अयोध्येचें राष्ट्र त्यांच्या भक्ष्यस्थानीं पडेल. अनार्य लोक आर्यांचा किती द्वेष करितात, त्यांच्या संसाराची कशी धुळधाण उडवितात, आर्यांगनांची अब्रू कशी घेतात, याची पूर्ण जाणीव असूनही भरत त्यांना बंधु म्हणून संबोधित आहे; त्यांच्याशीं बन्धुभावनेनें वागत आहे; त्यांच्याशीं मैत्री ठेवीत आहे आणि त्यांच्यांत मिळून मिसळून राहात आहे. ह्या वागण्यानें भरताचा एखादे दिवशीं वध करण्यांत येईल आणि अयोध्येची राज्यलक्ष्मी अनार्य हिरावून नेतील. सत्यवेड्या भरताच्या या लीला पूर्णपणें राष्ट्रनाशक आहेत.

६. पद ( चालः--खरविप्राचा प्याला० )

करि विनाशा लीला भरताचि हा । सत्य नच लव
ठावें । अनुदिन नव बाला ॥ ध्रु० ॥ सकल जनीं
सम असतां । होइल वरचढ जनता । विथरत

जित स्वाराज्यीं । टॉकी नृपमाला ॥ १ ॥

दशरथः—अनार्यांशीं सलोख्यानें वागलें असतां आर्यानार्यांत प्रेमभावना उत्पन्न होऊन, संग्रामाच्या सागरांतून आर्यावर्त आपोआप वर येईल, अशी त्याची समजूत आहे. ही समजूत चुकीची आहे असें कसें म्हणतां येईल ? हा युद्धाचा वणवा असाच वाढवीत राहून आपसांतील युद्धांनीं आर्यावर्त क्षीणबल व्हावा असें आपलें म्हणणें आहे काय ? युगानुयुगांचीं भांडणें भरताच्या या आचरणानें मिटत आलीं आहेत.

वसिष्ठः—भांडणें मिटत आलीं आहेत, हा तुझा निवळ भ्रम आहे. स्फुलिंगावस्थेंत भस्माच्छादित असलेला अग्नि आंतल्या आंत धुमसत आहे. शंबरासुराच्या विशाल वल्गना तूं ऐकल्या नाहींस काय ? आर्यावर्त अनार्यमय बनवून आर्यांना परत उत्तरध्रुवाकडे हांकलून लावण्याची शुनकासुराची प्रतिज्ञा तुझ्या कानीं आली नाहीं काय ? महात्मा भरतापेक्षां एखादा फाटका अनार्यही मला अत्यंत प्रिय आहे, ही महिषासुराची भाषा अजून बंद झाली आहे काय ? आर्यांनीं यज्ञयागांचा त्याग करावा, अग्निहोत्रांना रजा द्यावी आणि त्यांचा महादेव, त्यांची लिंगपूजा, त्यांचा भूतगण यांना अनन्यभावानें शरण जावें. असें केलें तर आर्यानार्यांची एकी सहज घडून आली. सगळेच अनार्य बनल्यावर भांडणें तरी कोणाशीं होणार ? तूं किंवा तुझा भरत यांची परत उत्तर ध्रुवाकडे जाण्याची जरी तयारी असली तरी सगळेच आर्य कांहीं अजून नेभळट बनलेले नाहींत. त्याच्यांत स्वसामर्थ्यानें संपादन केलेली भूमि संरक्षण करण्याची ताकद आहे.

७. पद ( चालः—देवता कामुकता रहिता० )

कामना आर्यजना भुवना । देशदैन्य तेच हरित ॥
ध्रु० ॥ जी असते शक्तियुता । शस्त्रधारि देवता ।
तेजगुणें अबल अरी । मारी पदतलिं तुडवित तया
निरामया करित ॥ १ ॥

आम्ही येथील प्राचीन रहिवासी, अशी अनार्य वारंवार हाकाटी करीत असतात; पण आर्य येथें येण्यापूर्वी या देशाची स्थिति काय होती? या अनार्यांना धान्य माहित नव्हतें, वस्त्र माहित नव्हतें, लिपी माहीत नव्हती. पशूचें ताजें मांस हें यांचें अन्न आणि त्यांची कातडीं हीं यांचीं वस्त्रें! ह्या हास्यास्पद हीन स्थितींतून आर्यांनीच आपल्या आचरणानें ह्यांना मनुष्य ह्या संज्ञेस पात्र केलें. हे उपकार तेथेंच राहिले आणि प्रत्येक अनार्याला आर्यांचा द्वेष करण्याचें बाळकडूच पाजण्यांत येत आहे.

वशिष्ट:—गुरुमहाराज! अनार्यांचीं हीं कृत्यें मला नाकबूल नाहींत आणि मी त्यांचा पक्षपातहि घेत नाहीं. आर्यानार्यांत प्रेमभाव उत्पन्न झाल्याशिवाय आर्यावर्तांत शातता नांदणार नाहीं ही माझी प्रामाणिक समजूत आहे. देशांतील सर्व लोकांनीं बंधुभावनें वागावें आणि देश भरभराटीस आणावा हीच माझी इच्छा आहे. भरत बालक आहे. त्याचे प्रयत्न कदाचित् चुकत असतील.

वसिष्ट—होय! चुकत आहेत. आणि विश्वधर्माची शिकवण मानवजातीला द्यावी अशी जर त्याची इच्छा असेल, तर अयोध्येचें सिंहासन ही त्याला योग्य जागा नाहीं. हिमालयाचीं गिरिकंदरें, नैमिषारण्यांतील पर्णकुटी किंवा गंगातिरावरील आश्रम या जागीं जाऊन पाहिजे तर त्यानें विश्वधर्माचा प्रसार करावा—

८ पद (चालः—धिक्कार मन साहिना)

विश्वास सुख होइना ॥ ध्रु० ॥ चढता विभवकालिं
कुजन नर ग्रासिती सुजन भुप हृश्य तें गमत
नच का मना ॥ १ ॥ महनीय नृपप्रीति हरवीत
जनता तारीत देशाजि लोकांजि भवना ॥ २ ॥

अयोध्येच्या सिंहासनाच्या पायीं हजारों आर्यांचें रक्त खर्च झालें आहे. शेंकडो आर्य राजांनीं त्या करितां आपला देह झिजविला आहे. असलें

हें पवित्र सिंहासन तूं आर्यांकडे राखणार कीं, अनार्यांच्या हातीं देणार ? रामाच्या राज्याभिषेकानें तें आर्यांकडे राहील आणि भरताच्या राज्यारोहणानें तें अनार्यांकडे जाईल. बोल ! राजा बोल ! यांपैकीं तुला कोणती घटना पसंत आहे.

दशरथः–पण कैकेयीच्या बापाला दिलेल्या वचनाचें काय करणार ?

वसिष्ठः—चाळीस वर्षांपूर्वी कैकेयीच्या बापाला दिलेल्या वचनाची आज कोणाला फारशी आठवण नाहीं; आणि यदाकदाचित् कोणाला असली, तर कांचनाच्या कुलुपानें त्यांचीं तोंडें बंद करतां येतील. शाठ्यनीति ही राजकारणाची आदिजननी आहे. रामचंद्र जेष्ठ पुत्रच असल्यानें इतर सर्व गोष्टी सुसंगत रीतीनें होऊन जातील. आणि राष्ट्राचा बचाव होऊन अयोध्येचें सिंहासन अबाधित राहील.

दशरथः—भरतहि पराक्रमी आहे. त्याच्या अंगांत राष्ट्राभिमान ओतप्रोत भरलेला आहे आणि भारतीय राजांच्या कर्तव्यांचें त्याला उत्तम ज्ञान आहे. गरीबांच्या दुःखानें कळवळणाऱ्या गुणी मनुष्याच्या हातांत राज्यसूत्रें जातांच अयोध्येचें सिंहासन डळमळावयास लागेल ही विचारसरणीच मला समजत नाहीं. सत्यानें साम्राज्य चालवून सेवा बजाविणाऱ्या सम्राटावर लोक प्रीतीच करतील. भरत सिंहासनावर बसला कीं, आर्यावर्तांतील आर्यानार्यांचा कलह शमन होऊन शांतीचें साम्राज्य प्रस्थापित होईल आणि लोक सुखानें संसार करूं लागतील.

वसिष्ठः–राजा ! तुझ्या ह्या कल्पना कल्पनासृष्टींत कदाचित् शक्य होतील; पण त्या दृश्यसृष्टींत कधींहि उतरणार नाहींत. आर्यानार्यांच्या समेटाची भाषा बोलणें म्हणजे परिस्थितीचें गाढ अज्ञान प्रकट करण्यासारखें आहे. अनार्यांत आर्यांचा द्वेष इतका मुरलेला आहे कीं, कोणत्याहि एका जातीचा संपूर्णपणें पाडाव झाल्याशिवाय, कोणतीहि एक जाति दुर्बल होऊन दुसऱ्याची सेवाचाकरी करूं लागल्याशिवाय आर्यानार्यांचें सख्य

जुळणार नाहीं. समेटाची भाषा इतिहासकालीं शक्य होती आणि आर्यावर्तांत प्रथमच वसाहत करणाऱ्या आर्यांनी त्या रीतीनें प्रयत्नही केला होता; पण तेव्हां अनार्य जोरावर असल्यानें त्यांनीं तो प्रेमाचा हात झिडकारून टाकिला. हळुहळू वसाहत करणाऱ्या आर्यांची संख्या वाढूं लागली, त्यांनीं शहरें वसविलीं, त्यांनीं गांवें निर्माण केली, त्यांनीं कालवे काढले, त्यांनीं शेतें तयार केलीं, आणि अरण्यास आर्यावर्ताचें स्वरूप आणलें. आर्यांचीं हीं सस्यश्यामल क्षेत्रें, आर्यांचीं हीं भव्य भुवनें, आर्यांचीं हीं नामांकित नगरें अनार्यांनीं बळकावण्याचा आतां उद्योग चालविला आहे. पण आर्यलोक तीं कशीं बळकावूं देतील? शत्रूशीं साम करणारा भरत गादीवर येतांच राज्यांत अनार्यांचें प्रस्थ फारच वाढूं लागेल आणि हळुहळु आर्यपुढाऱ्यांचे खून पडूं लागतील. या अशांतीस कंटाळून भरतानें राज्यत्याग केला कीं, अनार्यांस आयतेंच फावेल. शत्रूला, सापाला, खून करणाराला, बायकांवर बलात्कार करणाराला राजानें शासन हें केलेंच पाहिजे. तेथें शांतिब्रम्हाचा, क्षमेचा, दयेचा अवलंब केला, तर राष्ट्र विलयास गेलेंच म्हणून समजावें. राजाचें अंतःकरण खंबिर पाहिजे, त्याचें मन अस्थानीं दयेनें व्याप्त होतां कामा नये, आणि अपराध्यांस दंड देण्यांत क्षमेचा अवलंब करून त्यानें आत्मघातास प्रवृत्त होतां कामा नये. भरताच्या अंगांत या गुणाचा लवलेशसुद्धां नाहीं. भरत दयेचा पुतळा आहे, भरत क्षमेचा सागर आहे आणि भरत शांतीचा समुद्र आहे; पण हे गुण राजाला काय होत ?

दशरथः—महाराज ! वाईटाकडे प्रथम लक्ष दिलें पाहिजे. कदाचित् मी त्याच्या आजास दिलेल्या वचनाची वार्ता बाहेर फुटून बखेडा झाला तर काय करणार ? बाकी भरत बखेडा करून, भाऊबंदकीच्या कलहाला आमंत्रण करील असें मला वाटत नाहीं.

वसिष्ठः—नाहीं भरत कधींहि कलह करणार नाहीं ही मला खात्री आहे. पण त्याच्या बाजूचे गयाळ, गचाळ, गबाळ लोक मात्र भरताच्या

ना. ८८५ ५५४३३

नांवावर नाहक नूतन नूतन भांडणें उपस्थित करतील. अनार्यांना चिथावून परभारें सापाकडून विंचु मारविण्यांत हे लोक पटाईत आहेत. एक वेळ रामचंद्राला यौवराज्याभिषेक झाला, कीं याच्या गमजा लावडतोब थंड होतील.म्हणून यौवराज्याभिषेकाच्या वेळीं भरत अयोध्येंत असतां कामा नये.

दशरथः—रामचन्द्राच्या—अत्यंतप्रेम असलेल्या सख्या भावाच्या—राज्या-रोहणप्रसंगीं भरत उपस्थित नसण्याची ही कल्पना कशीशीच वाटते ! एवढा अवाढव्य समारम्भ होणार म्हणून गाजत असतां, भरताला कोणत्या कामगिरीवर पाठविणार ? उत्सवप्रसंगीं दिग्वीजयाच्या मोहिमेस जा. असें मी त्याला कोणत्या तोंडानें सांगूं ? सर्व लोक आनन्दांत मग्न असतां भरतानेंच मात्र रानावनांतील कष्ट सहन करावे असें माझ्या मनाला कसें बरें वाटेल ? नका ! महाराज नका ! भरताचें मन मी वळ-वितों, रामाच्या राज्याभिषेकाला त्याची सम्मति मी घेतों आणि तुमच्या मनाप्रमाणें सर्व घडवून आणतों.

वासिष्ठः—राजा! भरत माझा शत्रु आहे काय? भरताविषयीं मला द्वेष आहे काय?भरताचें अकल्याण व्हावें अशी माझी इच्छा आहे काय? नाहीं! नाहीं ! भरत माझा प्रिय शिष्य आहे. रामाइतकीच किंवा कांकण भर जास्तच मी त्याच्यावर प्रीति करतों. भरताची भरभराट व्हावी, त्याची कीर्ति सम्पूर्ण जगतीतलावर दुमदुमून राहावी, त्याच्या यशानें सर्व आर्या-वर्त पावन व्हावा अशीच माझी इच्छा आहे; पण हा व्यक्तीचा प्रश्न झाला, ही खाजगी प्रीति झाली. हें व्यक्तिहित, हें खाजगी प्रेम, राष्ट्र-हिताच्या आड आणण्याची माझी इच्छा नाहीं. भरतापेक्षां, रामापेक्षां किंवा जगांतील कोणत्याहि गोष्टीपेक्षां माझें राष्ट्र मला जास्त प्रिय आहे. त्या राष्ट्राच्या कल्याणाकरितां सत्य, न्याय, धर्म इत्यादि सद्गुणांचा बलि देण्यास माझी तयारी आहे. राजा! ह्याच राष्ट्रकल्याणाकरितां भरताला दूर पाठवून बखेड्याचा कांटाच उपटून टाक असें माझें तुला सांगणें आहे.भरत

रामाच्या राज्यारोहणाला संमति देईल; पण त्याच्या पक्षाचे म्हणून मिर-वणारे जे रामचन्द्राचा द्वेष करणारे ढोंगी लोक आहेत, ते बखेडा माज-विल्याशिवाय मुळींच राहणार नाहींत. शत्रूशीं साम करणाऱ्या भरताला ते आंवरणार नाहींत. या लोकांना आंतून अनार्यांची फूस असल्यानें, ही वावटळ वाऱ्याच्या वेगानें फोंफावून, सर्व राष्ट्रांत विशाल वणवा पेटवील. भरतच दूर राहिला, म्हणजे त्याच्या नांवावर नंगा नाच घालणें या गचा-ळांना शक्य होणार नाहीं.

९. पद ( चालः—प्रखर कोप हा० )

भरत शांतिकार्य काळ । असतां नच राम भाल ।
नृपतिलकें धृत विशाल । नेत्र केंवि पाही ॥ध्रु०॥
अनुपम जरि भरतबाळ । पाहुनि जनता गचाळ ।
दवविच सुनु अवनिपाळ । अवन आन नाहीं ॥१॥

दशरथः—पण भरताला मी कोणत्या कामगिरीवर पाठवूं ? अशी कोणती कामगिरी आहे कीं, तेथें गेल्यानें भरताचें अयोध्येच्या राजका-रणाकडे दुर्लक्ष होऊन, आम्हाला निवांतपणें समारम्भ उरकून घेतां येईल ?

वसिष्ठः—ती सर्व योजना मी पूर्वींच करून ठेवली आहे. कैकय देशांत हल्लीं भयंकर अवर्षण पडलें आहे, ही वार्ता तुला कळली असेलच. आर्तांचें परित्राण करण्यांत, दीनावर दया दाखविण्यांत, दुःखितांचें दुःख दूर करण्यांत भरताला अपरिमित आनंद वाटतो, हें तुला माहितच आहे. कैकय देशचे राजे तुझे आप्त आहेत, कैकय देशाशीं आमचा मित्रत्वाचा संधि आहे. तेथील आर्तांच्या परित्राणाकरितां,दुःखितांच्या दुःखनिवारणा-करितां, भरताच्या आधिपत्याखालीं एक स्वयंसेवकाचें पथक पाठविलें, तर एका धोंड्यानें दोन पक्षी मारल्यासारखें होईल. कैकय देशाची राजधानी नंदिग्राम ही येथून पंधरा दिवसांच्या वाटेवर असल्यानें येथलें वर्तमान भरतास तावडतोब कळणें शक्य नाही. गुप्तपणें समारंभाची तयारी करून

फक्त आदल्या दिवशींच हें शुभवर्तमान राजसभेंत घोषित करणें योग्य होईल. अशानें रामचंद्राच्या शत्रूंस आमचा बेत हाणून पाडणें शक्य होणार नाहीं, आणि एकदां समारंभ पार पडल्यावर प्रत्यक्ष ब्रम्हदेव जरी खालीं उतरला, तरी त्याचें कांहीं एक चालणार नाहीं.

१०. पद ( चालः–वसुधातल रमणीय )

जनताबल युवराजपदा बहु उचित सतत नव
मंगलकाला ॥ध्रु०॥ मुदित मनीं परमेश जनाच्या
वास करित तो नित्य सुकाला ॥ १ ॥

दशरथः—होय ! ही योजना मला पसंत आहे. भरताची भूदतयेची भावना अत्यंत प्रबल असल्यानें नंदिग्रामास तो आनंदानें जाईल. जेष्ठ पुत्र या नात्यानें रामचंद्रच राज्याचा अधिकारी आहे; पण कैकेयीच्या कमनीय सौंदर्यास वशिभूत होऊन त्यावेळीं माझ्याकडून जें अन्याय्य वचन दिलें गेलें, त्याचें परिमार्जन याच रीतीनें करणें योग्य आहे. [ पडदा पडतो ]

---

## प्रवेश दुसरा.

( कैकेयी व भरत बोलत आहेत असा पडदा उघडतो )

भरतः–माते ! सर्व मानवानीं बंधुभावानें वागावें असाच परमेश्वराचा हें जग निर्माण करण्यांत हेतु आहे. कैकयदेशांतील रहिवासी झाले तरी ते मानवच ना ? संकटांत सहाय्य करून एकमेकांना हात देणें हाच मानवाचा आद्य धर्म आहे. बाकीचे धर्म आपली महति वाढविण्याकरितां मनुष्यांनीं निर्माण केलेले आहेत. परोपकार, भूतदया, सर्वात्मैक्यता या तत्वांवरच विश्वधर्माची इमारत उभी आहे. कैकय देशांतील आर्तांना आज सहाय्याची अत्यंत आवश्यकता आहे. अयोध्येंतील हजारों स्वयंसैनिक स्वखुषीनें दुःखितांच्या परित्राणाकरितां माझ्याबरोबर जाण्यास तयार आहेत. कैकय

देश हीच तुझी जन्मभूमि आहे. प्रत्येक मनुष्याला आपल्या जन्मभूमीविषयीं निरतिशय प्रेम वाटतें. त्या प्रेमाला स्मरून मला उल्हसीत अंतःकरणानें, मोकळ्या मनानें आणि आनंदी हृदयानें त्या देशांतील आर्तांचें परित्राण करण्यास जाण्याची परवानगी दे पाहूं.

११. पद ( चालः—हृदयीं पेटवीन० )

जनता सोडवीन धन धान्य दानें । मन प्रेमयुत
करिन पर मोदवदनें ॥ ध्रु० ॥ करुनी तयां साह्य
गे शांततेनें । वळवीन वन लोक वश सदा भावने॥१॥

कैकेयीः—कैकय देशांत मी जन्मलें, कैकय देशांत मी वाढलें, कैकय देशाची राजकन्या म्हणून माझें जीवन व्यतीत झालें. आज जरी अयोध्याधिपांची अंगना म्हणून त्यांचें अर्धांग भूषित करण्याचा सन्मान मला मिळाला आहे, तरी दशरथाची पत्नि, किंवा भरताची माता म्हणून माझी प्रसिद्धि नाहीं, तर कैकय देशची राजकन्या म्हणूनच लोक मला ओळखतात. नंदिग्रामातील त्या राज विथिका, तीं देवालयें, ते प्रासाद, त्यांत बालवयांत केलेली क्रीडा जणूं काय कालच घडल्यासारखी मला आठवत आहे आणि त्या आठवणीनें माझें हृदय आनंदाच्या उन्मादानें बधिर होऊन शरीर पुलकित होत असतें. ज्या लोकांत मी खेळलें, ज्या लोकांत मी वागडलें, ते लोक आज अवर्षणाच्या ईश्वरी प्रकोपानें व्यथीत झालेले आहेत. ही वार्ता ऐकून माझें हृदय कसें विदीर्ण होणार नाहीं ? पण राजपुत्रा ! मातेचें हृदय ही कांहीं और चीज आहे. कल्पनेच्या आटोक्यांत न आलेली, भावनेच्या भ्रांतीस न गवसलेली, विचाराच्या विशाल कक्षेंत न सांपडलेली अशी जर जगांत कोणती गोष्ट असेल तर ती मातेचें हृदय हीच होय! दुःखितांचें दुःख निवारण करण्यास, गोरगरिबांस अन्नदान करण्यास, रानावनांतून उन्हातान्हांतुन तुला फिरावें लागेल, मैदानाचीं मैदानें आपल्या पायांनीं तुला तुडवावीं लागतील. जन्मापासून सुखांत वाढलेला तूं राजपुत्र ! तुला हीं

असलीं काबाडकष्टाचीं कामें कशीं झेपणार ? मातेच्या अंकावर बसण्याचे तुझे दिवस अजून संपले नाहींत. तेथें तुझ्यावर मायेची पांखर कोण घालणार?

१२. पद (चालः—प्रेम बाई हें वेडें०)

ज्यांत बाल्य मम गेलें । बाल खेळ खेळलें । जनता
भया साहिना । दुःख तें मला कळे ॥ ध्रु० ॥
जलहि देश भागीं ना । लवही तृषाकुलें । मरति
नित्य गाई करुणा । चित्त हें पहा जळे ॥ १ ॥

**भरतः**–माते ! जगाचा जगदीश जीवाची जोपासना करण्यांत डोळ्यांत तेल घालून तयार असतो. क्षुद्र जीवांची सुद्धां तो उपेक्षा करीत नाहीं. परमाणु सदृश्य प्राण्यांपासून प्रचंड पर्वतापर्यंत त्याची दृष्टी समतेनें सारखी पोंचत असते. तो पतित पावन परमेश्वर माझी उपेक्षा कसा करील ? दीनाचा पाठीराखा, गरीबांचा कनवाळु, आर्तांचा आराधक, सदैव सहाय्य करण्यास पाठीमागें तयार असतां, नित्य हाताशीं धरून वागवीत असतां मला कोणाची भीति आहे. तो माझ्यावर मायेची पांखर घालील इतकेंच नव्हे तर माझ्या हातून अनेक आर्तांचें परित्राण कार्य घडवूनही आणील.

**कैकयीः**—राजपुत्रा ! तुझी माता जरी कैकयदेशाची राजकन्या असली तरी तुझा जन्म अयोध्येंतच झाला आहे आणि तुझें बालवय येथेंच व्यतीत झालें आहे. कैकय देश म्हणजे कांहीं अयोध्यानगरी नव्हे. येथील विस्तृत मैदानें, सस्यश्यामल क्षेत्रें, सुपीक भूमि यावरून तूं कैकय देशाची कल्पना करूं नकोस. तो देश डोंगराळ आहे, त्या देशांतील वस्ती विरल आहे आणि तेथील डोंगरांत अनार्यांची वस्ती फार आहे. आर्यांचा मनापासून द्वेष करणारे ते लोक कोणत्या वेळीं काय प्रसंग आणतील याचा नेम नाहीं. अनार्यांशीं गांठ आणि असंगाशीं संग ह्या दोन्हीही गोष्टी सारख्याच ! ह्या रानटी अनार्यांच्या मदतीस जाणें म्हणजे कृष्णसर्पांनाच दूध पाजण्यासारखें आहे. अन्य कोणत्याही देशांत आर्तांच्या

परित्राणाकरितां जाण्याची जर तूं परवानगी मागतास, तर मोठ्या आनंदानें ती मी तुला दिली असती. कैकय देशाविषयीं जरी माझें अंतःकरण तिळ तिळ तुटत असलें, अवर्षणाच्या आघातानें त्या देशांतील लोकांची कशी स्थिति होते हें जरी मी स्वतः अवलोकन केलें असलें, तरी माझें मातेचें हृदय तुला परवानगी देऊं शकत नाहीं. संपूर्ण आर्यावर्तांत, अयोध्येचें राज्य श्रीमंत आहे, तें राष्ट्र अत्यन्त भरभराटीस आलेलें म्हणून प्रसिद्ध आहे, या साठीं पैशांची भरपूर मदत केली, कीं आपलें कर्तव्य संपलें. भांडारांतून पैशाची मदत मिळत नसेल, तर मी माझ्या खाजगी खर्चांतून बचत केलेली सर्व रक्कम त्या कार्यास अर्पण करतें, पाहिजे तर माझे बहुमोल दागिने देतें; पण स्वतः तूं कैकय देशांत जाण्याचें रहित कर. तूं एक दिवस दृष्टीस पडला नाहींस, तर मला माझें जीवनहि असह्य होऊन जाईल. मातेच्या मनाची माया ओळखण्यास जननीचाच जन्म घ्यावा लागतो.

भरतः—माते ! अनार्यांविषयींच तुला भीति वाटते ना ? अनार्य लोक माझ्या जीवाला अपाय करतील हीच शंका तुला व्यथीत करीत आहे ना ? अनार्य लोक माझ्या प्राणाला पददलित करतील हीच शंका तुला बोंचते ना ? नाहीं ! नाहीं ! असें कधींहि घडून येणार नाहीं. अनार्य लोक विश्वासू आहेत, अनार्य लोक प्रामाणिक आहेत, अनार्य लोक पापभीरु आहेत, ते असा विश्वासघात कधींहि करणार नाहींत. आर्य लोकच त्यांचा फाजील द्वेष करीत आहेत. आर्यांवर त्यांनीं प्रेम करावें असें आर्यांनीं त्यांचें काय बरें केलें आहे ? आर्यांनीं त्यांच्या जमिनी बळकावल्या, त्यांचीं राज्यें नष्ट केलीं, त्यांना रानावनांत हांकून लावण्यांत आलें आणि त्यांच्या सर्वस्वाचा अपहार करण्यांत आला. कांहीं आर्यांची मजल तर येथपर्यंत गेली आहे कीं, पशु समजून ते अनार्यांची शिकार करित असतात, निःशस्त्र अनार्यांशीं शस्त्रानें लढून ते त्यांचा वध

करतात. पशुप्रमाणें अनार्यांशीं धर्मयुद्ध करण्याची आवश्यकता नाहीं अशी त्यांची समजूत आहे; अशा स्थितींत अनार्यांनीं आर्यांचा द्वेष करूं नये तर काय करावें ? त्यांना प्रेमानें मिठ्या माराव्या ? त्यांना प्रीतीनें कुरवाळावें ? त्यांची भक्तीनें सेवा करावी ? काय करावें तरी काय ? प्रीति ही परस्परावलंबी आहे. द्यावें तसें घ्यावें हा जगाचा न्यायच आहे.

१३ पद ( चालः-भालीं चंद्र असे धरिला. )

लोकीं स्नेह दया विमला। लाभे पर मानस त्याला
॥ ध्रु० ॥ माया कमला शांतवि क्रोधबला सुखित
धरा जंतु जतूला ॥ १ ॥

अंतःकरणपूर्वक प्रेमानें वागविलें असतां अनार्य लोक त्यांच्याशीं अत्यन्त प्रेमानें वागतात. आपल्या उपकार कर्त्याला ते कधींहि विसरत नाहींत आणि त्याच्याकरितां जीव देण्यासही मागेंपुढें पहात नाहींत. पुढाऱ्यावरील एकनिष्ठ प्रेमाचीं उदाहरणें जर कोठें पहावयाचीं असतील, तर तीं अनार्यांतच पाहिलीं पाहिजेत. ज्याचें निमक खाल्लें त्याच्यावर उलटावयाचें हें अनार्यांना मुळींच ठाऊक नाहीं. अनार्य लोकांची प्रीति संपादन करण्याकरितां, त्यांना प्रीतीनें बद्ध करून आर्यानार्यांचें सख्य जुळविण्याकरितां आणि तें सख्य जुळवून आर्यावर्तांत पेटलेला अशांतीचा अग्नि शमन करण्याकरितां मी जात आहें. आर्यानार्यांचें सख्य जुळविण्याचा, प्रेम वाढविण्याचा, प्रीति वर्धित करण्याचा हाच एक मार्ग आहे. हा सन्मार्ग चोखाळण्यास तूं मला परवानगी देणार नाहींस काय ? आर्यावर्तांत पेटलेला असुयेचा अग्नि शमविण्यास तूं मला मदत करणार नाहींस काय ? माझें हें वर्तन गर्हणीय आहे असें तुला वाटतें काय ? बोल ! माते बोल ! आईच्या आशिर्वादाचाच आत्मजाला आधार असतो.

कैकेयीः—बाळा ! तुझें म्हणणें खरें आहे. एका हातानें टाळी कधींहि वाजत नाहीं. आर्यानार्यांचा द्वेष परस्परांतील अविचारी लोकांच्या दुष्कृ-

त्याचा परिणाम आहे. आम्ही मुळचे रहिवासी म्हणून, अनार्य लोक आर्यांचा द्वेष करितात; आणि आम्ही जेते म्हणून, आर्य लोक अनार्यांना तुच्छतेनें वागवितात. एकमेकांच्या मनांतील ही अढी परस्परांनी टाकून दिल्याशिवाय आर्यानार्यांचें सख्य जुळणें शक्य नाहीं.

भरतः—असें जर आहे तर आई तूं मला परवानगी देण्यास कांकूं कां करतेस ? सत्कृत्यें आचरण्यासच ईश्वरानें मनुष्याला जन्मास घातलें आहे. तीच आई धन्य कीं, जी सत्कृत्यें आचरणारा पुत्र प्रसवते ! हें सत्कृत्य आहे, आणि याचा तुला अभिमानच वाटला पाहिजे.

कैकयीः—बाळा ! तुझ्यासारखा सद्गुणी पुत्र प्रसवून देवानें मला धन्य केलें आहे खरें ! तुझ्याबद्दल मला अभिमानच नव्हे, तर आदरहि वाटतो. तुझ्या गुणाची कीर्ति दिगंतीं पसरल्याबद्दल मला अभिमान कां वाटणार नाहीं ? तुझ्या शीलाचें साम्राज्य पृथ्वीवर पसरल्याबद्दल मला आनन्द कां वाटणार नाहीं ? तुझ्या हातून आर्तांचें परित्राण होत आहे, हें ऐकून मला समाधान कां होणार नाहीं ? जा ! बाळा जा ! माझ्या कैकय देशांतील दुःखितांचें दुःख निवारण करण्याकरितां, त्यांचे त्रास हरण करण्याकरितां, त्यांची जीवनयात्रा सुखकर करण्याकरितां झट. ही तुझी माता तुला आनंदानें निरोप देत आहे. ( पडदा पडतो. )

---

## प्रवेश तिसरा.

( कुटिला प्रवेश करिते. स्थळः—रस्ता. )

कुटिलाः—मंथरा काय म्हणाली ? उद्यां त्या रामाला युवराज्याभिषेक होणार; रामचन्द्र राजा झाल्यावर कौसल्या राणीसाहेब राजमाता होणार आणि मग कैकेयीला कोणिहि पुसणार नाहीं. राजपुत्र भरत यांचा जन्म राजघराण्यांत झाल्याबद्दल त्यांस थोडीशी तैनात करून मिळेल. मग कैकेयी राणीसाहेबांना विचारतो कोण ? त्यानांच जेथें मान नाहीं तेथें

आमच्यासारख्या त्यांच्या दासीजनास तरी कोण विचारणार ? आज त्या पट्टराणी पदावर विराजमान असतां वर्षाकाठीं एखादें त्यांचें जुनें लुगडें आम्हां दासींस मिळण्याची पंचाईत ! आणि जर कां असें झालें तर आमचें काय होणार तें एक ईश्वर जाणे ! भरतास युवराजपद मिळेल तर काय बहार होईल ! मग दशरथ महाराजांमागून भरत राजा होईल आणि कैकेयी बाईसाहेब राजमाता होतील. भरत परम मातृभक्त असल्यामुळें बाईसाहेबांना विचारल्याशिवाय कोणतेंहि राजकारण करणार नाहीं, आणि बाईसाहेबांची मी आवडती दासी असल्यामुळें त्या मला विचारल्याशिवाय कोणतीच गोष्ट करणार नाहींत. म्हणजे मला समजल्याशिवाय राज्यांत पान देखील हालणार नाहीं. असें जर कां घडून आलें तर काय मजा होईल ! म्हणून तर मला कोणतीहि खटपट करून भरतास राज्य मिळेल असें केलेंच पाहिजे ( विचार करून ) हो ! बरी आठवण झाली ! रामाला यौवराज्याभिषेक होऊं न देण्याची मंथरेनें केली आहे प्रतिज्ञा ! मंथरा मोठी पाताळयन्त्री बायको आहे. ती वाटेल तें करून त्या वसिष्ठाचें कारस्थान हाणून पाडल्याशिवाय राहणार नाहीं. वसिष्ठाचें कारस्थान रसातळास गेलें तर कितीतरी मजा होईल ! मंथरेनें त्या म्हाताऱ्याच्या कारस्थानावर नजर ठेवण्याची कामगिरी माझ्याकडे सोंपविली आहे. ती योग्य रीतीनें कशी बरें पार पडणार ? तो वसिष्ठया पडला ब्राम्हण ! तशांत म्हातारा ! मोठा कर्मनिष्ठ कां कर्मभ्रष्ट काय म्हणतात तो ! तेव्हां असल्या बुद्रुकाच्या आश्रमांत माझा प्रवेश होणार कसा? ( विचार करून) हो बरी आठवण झाली. त्याचा तो शिष्य आहे ना कौटिल्य ! त्याचें गुरुगृहींचें शिक्षण आतां पूर्ण झालें आहे. तो आतां गृहस्थाश्रम स्वीकारणार अशी दाट वदन्ता आहे. त्याच्यावरच आपलें नेत्रपल्लवी मोहनास्त्र चालवावें आणि त्याला आपलासा करावा.जर कां मंथरेचें कारस्थान जमलें आणि समारंभ ढांसळला तर त्याला द्यावा झिडकारून ! बरें तिकडून

मंथरेचें कारस्थान ढासळून रामचन्द्र राज्यारूढ झाला तर तो वसिष्ठ आणि त्यांचे शिष्य यांचें प्रस्थ फारच माजणार तेव्हां त्याच्याबरोबर करावा झालें संसार! आम्हांला काय कोठूनहि आमचें यथास्थित झालें म्हणजे झालें. हो! असेंच केलें पाहिजे. दोन जहाजांवर पाय ठेऊन उभें राहिल्याशिवाय या धामधुमीच्या पुरांतून पैलतीर गांठणें शक्य नाहीं. ( दूर पाहून ) हा कोण बरें येत आहे ! हाच तो कौटिल्य ! होय तोच तो ! काय स्वारीचें ध्यान ! काय तो पोशाक ! काय ती चालण्याची तऱ्हा ! अ हा हा हा ! (हंसते) ही स्वारी कांहीं सरळपणानें वळणार नाहीं ! ह्याला कांहीं तरी थापा देऊन मुरळ पाडली पाहिजे. ( कौटिल्य प्रवेश करितो. कुटिला जरा लाजल्यासारखी करिते. )

कौटिल्यः—कोण तुम्ही ? नांव काय तुमचें ? अशा चुकल्या चुकल्या सारखें काय करतां ? ( स्वगत ) विधात्याची करणी अजब खरी ! काय हें सौंदर्य ! काय हा विनय ! ज्याला संसारांत असली रूपवति सोबत मिळेल तो धन्य खरा ! ( उघड ) असा लुगड्याचा पदर हातानें चोळीत चोळीत असें चुकलेल्या पक्षासारखें काय करतेस ? तुमचें कांहीं हरवलें आहे काय ? असल्यास सांगा ? तें परत मिळवून देण्याची हमी मी घेतों. कारण हें आहे रामराज्य !

कुटिलाः—माझें कांहीं हरवलें नाहीं; पण चोरीला मात्र गेलें आहे.

कौटिल्यः—चोरी झाली म्हणतां ? कोणती वस्तु चोरीला गेली आहे म्हणता ? आणि चोर कोण ? चोरी केव्हां झाली ? सांगा लवकर. ताबडतोब कोतवालास वर्दी देऊन चोर त्याच्या ताब्यांत देतों. हें काय परकीयाचें राज्य आहे ? हें आहे रामराज्य !

कुटिलाः—काय म्हणता ? रामराज्य ! रामचन्द्र राजा झाला केव्हां ? तो तर अद्याप युवराजसुद्धां झाला नाहीं. मग राजा होणार कसा ?

कौटिल्य:—अग ! राजा झाला नसला तर उद्यां युवराज होईल. होणार काय आणि झाला काय ? दोहोंचा अर्थ एकच ! अयोध्येचे लोक तर त्याला युवराज नव्हे तर राजाच मानूं लागले आहेत. काय त्याचें तेज ! काय त्याचें रूप ! काय त्याचा पराक्रम ! सर्वच कांहीं और आहे बुवा ! बरें तें राहूं दे. पण तुझें कोणी काय चोरून नेलें आहे तें तर कळूं दे. कारण हें आहे रामराज्य ! या राज्यांत चोरी होणेंच शक्य नाहीं. तुझीच कांहीं तरी गफलत झाली असेल.

कुटिला:—( मुरका मारून ) चोरी कोणी केली म्हणतां ? ती करणारा येथें जवळच आहे.

कौटिल्य:—काय ? येथें जवळच आहे ? ( इकडे तिकडे पाहून ) कोठें दिसत नाहीं तो ! दाखवा पाहूं. त्याच्याकडून तुमची वस्तु तुम्हांस परत देवावितों. अग ! चोरी करणें म्हणजे महापातक. तें करणारास सोडून कसें चालेल ! कारण हें आहे रामराज्य !

कुटिला:—चोर कांहीं लांब नाहीं. माझ्या समोरच उभा आहे.

कौटिल्य:—आम्हीं तर येथें दोघेंच आहोंत. एक तूं व दुसरा मी ! तिसरा तर कुठेंच दिसत नाहीं. मग चोर कुठें आहे. तें तर कळूं द्या. कारण हें आहे रामराज्य !

कुटिला:—पुरे करा तुमचे तें रामराज्य ! म्हणे रामराज्य ! रामराज्य !

[ वेडावते ]

कौटिल्य:—बरें ! पुरे झालें. दाखव आतां चोर कुठें आहे तो. नाहीं तर तो पळून जाईल. पण पळून जातो कुठें म्हणा ! कारण हें आहे रामराज्य !

कुटिला:—चोर तर माझ्या समोर आहे आणि मला दिसत आहे. तुम्हाला दिसत नाहीं असें म्हणतां ? हेंच कां तुमचें आंधळें रामराज्य ?

कौटिल्य:—मला तर कोठें दिसत नाहीं ! मग तूंच दाखव पाहूं ? मग त्याला दाखवितों रामराज्य !

कुटिला:—आग लागो तुमच्या त्या रामराज्याला. काय बाई तरी हीं पुरुषी ढोंगें ! "चोर तो चोर आणखी वरून शिरजोर" अशांतलीच कृति!

कौटिल्य:—बरें ! तूं काय म्हणालीस ? इथें चोर आहे ? मग तो दिसत नाहीं कसा ? बरें ! त्याचें नंतर पाहूं पण तुझें नांव काय तें आधीं सांग. कीं नांव सुद्धां विसरलीस ? तसें तूं विसणार नाहीं म्हणा कारण हें आहे रामराज्य !

कुटिला:—नांव विसरायला काय झालें ! मी काय तुमच्यासारखी आंधळी आहे. तुम्हीं आंधळें म्हणून तुम्हाला चोर दिसत नाहीं. तशी नांव विसरायला मी कांहीं खुळी नाहीं. चांगली चाणाक्ष आहे चाणाक्ष ! मग बरी विसरेन ! माझें नांव कुटिला. कुटिला बरें कां !

कौटिल्य:—काय कुटिला ? अगदीं छान ! तुला फार चांगलें शोभतें हें नांव ! कारण तुझें नखकेशांत सर्व कुटील आहे. केंस कुटील, भुवया कुटील, भांग कुटील, वर्तन कुटील, बुद्धि कुटील, आणि तुझी चालसुद्धां कुटील आहे. पण ही तुझी कुटिलता फार दिवस राहणें शक्य नाहीं. कारण हें आहे रामराज्य !

कुटिला:—जळो तुमचें तें रामराज्य ! पुन्हां तें माझ्या समोर उच्चारूं नका.

कौटिल्य:—बरें तें राहिलें एका बाजूला. आतां खरें सांग ! तूं राहतेस कुठें ? तुझें लग्न तर झालेलें दिसत नाहीं. कोणाशीं वाग्दान तर झालें नाहीं ना ? अं. असें नाक काय मुरडतेस ? सांगायला कांहीं भीति नाहीं कारण हें आहे रामराज्य !

कुटिला:—माझें लग्न तर झालें नाहींच; पण तुम्हीं काय म्हणालांत तें वाघाला दानसुद्धां झालेलें नाहीं.

कौटिल्य:—( स्वगत ) ही स्वरूपसुंदरी नवरा म्हणून जर मला पसंत करील तर काय बहार होईल ! ( उघड ) बरें तें राहूं दे ! पहिल्यानें चोर

कुठें आहे तो लवकर दाखव पाहूं ? तो जर पळून गेला तर त्यास शोधण्यास विनाकारण त्रास ! पण गेला तर जाणार कुठें म्हणा ! कारण हें आहे रामराज्य !

कुटिलाः—चांगला हातास धरून दाखवितें. ( त्याचा हात धरून ) हा पहा चोर !

कौटिल्यः—( भीतीनें ) काय ? मी चोर ? मी—मी—का—काय चो—चो चोरी के—ली. मी रामचंद्राच्या पायांची शपथ देऊन सांगतों मी चोरी केली नाहीं.

कुटिलाः—तुम्हींच माझी चोरी केली. तुम्हींच चोर अहांत. माझी वस्तु परत देतां कीं नाहीं ? निदान त्याचा मोबदला तरी मला मिळाला पाहिजे. वस्तु देतां कीं नाहीं ? कीं नेऊं फौजदाराकडे ?

कौटिल्यः—मी चोरी केली नाहीं. खरेंच सांगतों मी चोर नाहीं. मला फौजदाराकडे नेऊं नको. मी तुझ्या पायां पडतों ( पायां पडतो ) तुमची कोणती वस्तु चोरीस गेली तें सांगा ? भिक्षा मागून मी ती तुला आणून देतों; पण माझी अब्रू घेऊन अपकीर्ति करूं नकोस. कारण हें आहे रामराज्य !

कुटिलाः—माझी वस्तु तर तुमच्याजवळ आहे.

कौटिल्यः—मग सांग लवकर कोणती वस्तु ती. माझा प्राण जरी मागशील तरी सुद्धां तो देऊन टाकीन. अपकीर्ति होण्यापेक्षां प्राण देणें चांगलें. कारण हें आहे रामराज्य !

कुटिलाः—मग मी मागेन तें देतों असें वचन द्या.

कौटिल्यः—वचन ! वचन कशाला ? एकवचनी रामाच्या राजवटींत पुरुषांचा शब्द हेंच वचन. कारण हें आहे रामराज्य !

कुटिलाः—( त्याच्या अंगाशीं बिलगून ) आपण माझें मन चोरलें

आहे. तें माझें मला परत द्या. निदान त्याच्या मोबदल्यांत आपलें मन तरी मला द्या.

कौटिल्यः—( आनन्दानें ) हात्तेच्या ! इतकेंच ? कांहीं हरकत नाहीं. मी फारच भिऊन गेलों होतों. कारण हें आहे रामराज्य !

कुटिलाः— मग आतां तरी माझ्याशीं लग्न करण्याचें वचन द्या पाहूं.

कौटिल्यः— बरें ! हें घे वचन ! ( वचन देतो ) आतां तुझी खुपी झाली ना ?

कुटिलाः— ह्या वचनाप्रमाणें माझ्याशीं पुढें लग्न कराल ना ? कां आपलें रामराज्य झाल्यावर मला विसराल. पुरुषांची जात थोडी कपटी आहे म्हणून विचारतें ?

कौटिल्यः—वचन मोडायला काय मी दशरथ राजा आहें. वचन मोडण्याचा प्रघात राजे लोकांत असतो. तशांत मी राजकारणी मुत्सद्दिहि नाहीं. मी आहे एक साधा मनुष्य. मला माझ्या शब्दाची किंमत प्राणा॰ पेक्षांहि जास्त आहे. कारण हें आहे रामराज्य !

कुटिलाः— दशरथ राजानें कसें काय वचन मोडलें ?

कौटिल्यः—कैकेयीच्या लग्नाच्या वेळीं कैकय राजाला दशरथानें असें वचन दिलें होतें कीं, कैकेयीच्या पुत्राचीच युवराजपदावर स्थापना करीन. पण आतां तें वचन मोडून राजा दशरथ रामचंद्राला यौवराज्याभिषेक करण्याच्या तयारींत आहे. हा नाहीं कां वचनभंग.

कुटिलाः— पण रामचंद्राला राज्याभिषेक होणार हें तुम्हांस कसें कळलें?

कौटिल्यः—आमच्या गुरुजींनीं राजा दशरथाला आश्रमांत बोलावून आणिलें आणि त्यास रामचंद्रास राज्याभिषेक करण्यास सांगितलें; पण पहिल्यानें राजा वचनभंग करण्यास तयार होईना. जेव्हां गुरुजींनीं बराच आग्रह धरिला तेव्हां एकदांचा तो कबूल झाला.

कुटिलाः—पण राजाचा बेत पुन्हां फिरणार नाहीं ना ?

कौटिल्यः—फिरणार कसा ? समारंभांत कांहीं व्यत्यय येऊं नये म्हणून त्यानें भरतास कांहीं तरी निमित्तानें दूर देशीं घालविलें. तो परत अयोध्येस येण्यापूर्वीच रामराज्याभिषेकाचा समारंभ घाईनें उरकून घेण्याचा त्यांनीं बेत केला आहे. त्या समारंभाच्या वाटाघाटीकरितांच आज खास दरबार भरविण्यांत येणार आहे. मला गुरुजींच्या बरोबर दरबारला गेलें पाहिजे. दरबार संपल्यावर मग तुला याच ठिकाणीं भेटेन. बरें जातों.

कुटिलाः—तर मग जाच तुम्ही; पण दरबार संपल्यावर तावडतोब या हं. आपणाशिवाय आतां मला एक क्षण सुद्धां करमेल असें वाटत नाहीं. मेला जीव सारखा आपल्या वाटेकडे लागलेला असतो. मी येथेंच आपली वाट पहात बसतें. ( कौटिल्य जातो ) बरें झालें ! मला पाहिजे ती बातमी तर मिळाली. याला असाच झुलवीत ठेऊन आपलें काम साधलें पाहिजे. मासा तर गळाला चांगला अडकला आहे. काय म्हणावें या मूर्ख पुरुषांना ! एखाद्याच्या शब्दावर सहजच विश्वास ठेवतात. कांहीं सुद्धां विचार करीत नाहींत. मी आतां जराशी हंसलें, मुरडलें तों यांनीं माझ्यावर विश्वास ठेवला; पण आम्ही बायका कसल्या खमंग ! या पुरुषांची नीट पारख केल्याशिवाय यांच्यावर विश्वास ठेवीत नसतों. बरें ! आतां असेंच जावें आणि मंथरेला ही अस्मादिकांनीं मिळविलेली महत्त्वाची बातमी सांगावी. ( जाते. )

## अंक पहिला समाप्त.



# संगीत
# स्वार्थत्याग

## अंक दुसरा.

### प्रवेश पहिला.

( मंथरा एकटीच प्रवेश करिते )

मंथराः—रामाला राज्याभिषेक ! काय ऐकत आहे मी हें ! आजपर्यंत मनांत धरलेलें अनार्यांच्या उन्नतीचें माझें ध्येय मातीस मिळून त्याचे कोळसे होणार तर ! राजा दशरथा ! कैकयीच्या पुत्रास युवराज करीन हें तिच्या बापास दिलेलें वचन तूं कसा विसरलास ? सत्यप्रतिज्ञ सूर्यवंशांत तुझा जन्म झाला आहे, मग सत्यास विस्मरणें तुला कसें साधलें ? चाळीस वर्षांपूर्वी दिलेल्या वचनाची आज कोणास आठवण राहिली नाहीं असें तुला वाटलें काय ? नादान थेरड्या ! दिलेलें वचन मोडून रामाचा राज्याभिषेक घोषित करतांना तुझ्या जिभेस किडे कां पडले नाहींत ? तिचे तुकडे कां झाले नाहींत ?

१४. पद ( वासना संग्रामभूवर० )

भूपती आधार केवळ । सकल लोक अनंत जन
बळ ॥ ध्रु० ॥ जाहला आधार, तो खळ । पाप-
तापानें भूमि सविकल । थोरबहु आक्रांत जगतीं ।
घोर हिंसक होत नव पळ ॥ १ ॥

आर्यांनीं अनार्यांवर मनमुराद जुलूम करावा, त्यांची मालमत्ता मदानें लुटून घ्यावी, त्यांची पशूसारखी शिकार करावी, त्यांच्याशीं धर्मयुद्ध करूं नये, त्यांच्या बायकांवर बलत्कार करावा, आणि अनार्यांनीं तें निमूटपणें सोसून घ्यावें हा कोठला न्याय ? ज्या अनार्यांनीं वैदिक धर्माचा स्वीकार केला, त्या अनार्यांना आम्हीं चातुर्वर्ण्यांत समाविष्ट केलें, असें आर्य लोक वारंवार बोलून दाखवितात. ही चातुर्वर्ण्याची नीच कल्पना ज्या भटूरग्यांच्या मस्तकांतून निघाली, त्यांची धन्य होय ! वैदिक धर्मांत प्रविष्ट केलेल्या अनार्यांचा वर्ण शूद्र आणि त्रैवर्णिकांचें दास्यत्व ही त्यांची कामगिरी ! फुकटांत गुलाम मिळविण्याची आर्यांची ही किती सोज्वल युक्ति ! ह्या युक्तीच्या नीचतेस, नादानपणास आणि हीनतेस जगांत दुसरी तोड आहे काय ? शूद्रांनीं केवळ सेवा करावी. त्यांना वेदाचा अधिकार नाहीं, लढण्याचा हक्क नाहीं कीं व्यापाराचा परवाना नाहीं. शूद्र कितीही बुद्धिमान असला, कितीहि शूर असला, कितीहि धाडसी असला, तरी त्याच्या बुद्धीस, शौर्यास किंवा धाडसास समाजांत वाव नाहीं. जन्मल्यापासून मरेपर्यंत त्यानें एकच कार्य करावें, आर्यांची हीन सेवा हेंच तें कार्य होय ! त्याचें सारें जीवन गुलामगिरीच्या शृंखलेनें बद्ध ! त्याचें सारें कर्तृत्व दास्यत्वांत लोपलेलें ! त्याची सारी बुद्धिमत्ता सेवावृत्तिमुळें मलूल झालेली ! आर्यांचा हा मानभावी कावा अज्ञानी अनार्यांस समजला नाहीं, आर्यांचें हें आपमतलबी धोरण अनार्यांच्या लक्षांत आलें नाहीं आणि भोळे अनार्य भराभर आर्य धर्मांत समाविष्ट झाले, त्यांनीं वैदिक धर्म मान्य केला, त्यांनीं यज्ञयागांस संमति दिली आणि आपली उन्नति होते कीं काय याची वाट पहात बसले. पण यामुळें उन्नति होण्याचें बाजूलाच राहिलें आणि उलट स्वातंत्र्याचा मात्र नाश झाला. प्रत्येक मनुष्यप्राण्याचा जन्मसिद्ध हक्क तो त्यांनीं गमावला आणि स्वतःच्या पायांवर धोंडा पाडून घेतला.

१५. पद (सत्तावलें दास, करि जो त्रिलोकास०)
क्रांती दिसे घोर। जगतीं अनाचार। माजे, घरी
चोर। मम मातृभूमी ॥ध्रु०॥ आर्यांस ना भीति।
श्रीमान् लोभांति। झाले तयां नीति। गवसे न
नामी ॥१॥ नगरीं सदां त्रास। करिती अनार्यांस।
असुनीहि परदेश। म्हणवीत स्वामी ॥ २ ॥

बरें! स्वतंत्र राहिलेल्या अनार्यांची तरी या आर्यांनीं कींव केली काय? नाहीं! त्यांची तर दशा अत्यंत शोचनीय करून टाकिली आहे. आपल्या सुधारलेल्या हत्यारांनीं पशूप्रमाणें ते त्यांची शिकार करीत आहेत, त्यांना नर ही संज्ञा न लावतां ते त्यास वानर समजत आहेत, त्यांना बहिष्कार घालण्यांत येऊन अनार्यांना शिवणें सुद्धां पाप समजण्यांत येत आहे. त्यांना स्पर्श झाला असतां सचैल स्नान करावें असे निर्बंध घालण्यांत येत आहेत, आर्यांची वस्ती असलेल्या गांवांत त्यांना वस्ती करून राहातां येत नाहीं. किती ही जुलुमाची परमावधि! काय हा जेतेपणाचा मद! कोण हा वर्ण श्रेष्ठत्वाचा तोरा! धिक्कार! धिक्कार असो या चोरांना!

१६. पद (चालः—धिक्कार मन साहिना०)
लोभास वश वासना। ध्रु०। द्विज चित्त नीच तें
नरक सम, ठेवितें आम्हांस गहनीं तोडूनि माना।
१। परमेश महनीय परि तोहि अन्ना नाहींच
सजला भंगूनि ध्याना ॥ २ ॥

भरताच्या राज्यारोहणानें या सर्व अन्यायांचें कांहीसें परिमार्जन होईल अशी मला आशा होती; पण तो आशेचा मनोरा सफाई ढांसळला! छे! हें त्या भटूरग्याचेंच काम! राजा दशरथाला सत्यापासून भ्रष्ट होण्याची सल्ला त्याच चोरानें दिली! माझी सर्व अनार्य जाति, माझा सर्व शूद्र वर्ण निरंतर गुलामगिरींत राहावा हीच त्याची इच्छा! कैकयीला वश

करून, तिच्या मनांत मत्सरविष पेरून, तिला वचनाची आठवण देऊन रामाचा राज्याभिषेक हाणून पाडलाच पाहिजे. आज साधलें नाहीं तर केव्हांहि हें कार्य साधणें शक्य नाहीं. (जाते)

## प्रवेश दुसरा.

( राजा दशरथाचा दरबार )

दशरथः--पौरजनहो ! राजा हा ईश्वराचा पृथ्वीवरील प्रतिनिधि आहे. "ना विष्णुः पृथ्वीपतिः" ही आम्हां आर्यांची कल्पना. न्यायानें, समतेनें, सत्यानें आणि नीतीनें राज्य करून प्रजेस सुख देणें हा राजाचा धर्म! चाळीस वर्षांपूर्वी माझ्या परमपूज्य पित्याच्या मागें राजा म्हणून तुम्हीं माझी निवड केली, आणि तुम्हीं शिरावर लादलेली ती जबाबदारी मी तुमच्या मदतीनें कशीबशी पार पाडलेली आहे. आतां मी वृद्ध झालों. सामान्य आयुर्मर्यादेनें माझें तीन चतुर्थांस आयुष्य संपून गेलें, तारुण्यांतलि उत्साहानें, घडाडीनें, नेटानें आणि धमकीनें राज्यकारभार चालविण्याची पात्रता माझ्या अंगीं उरली नाहीं. पुत्र युवावस्थेंत येतांच वानप्रस्थाश्रमाचा स्वीकार करून, विश्रांति घ्यावी अशी सूर्यवंशांतील नृपतींची प्राचीन वहिवाट आहे. त्या वहिवाटीस अनुसरून माझा जेष्ठ पुत्र रामचंद्र याला यौवराज्याभिषेक करून सर्व राज्यसूत्रें त्याच्या स्वाधीन करावीं, आणि वानप्रस्थाश्रमाचा स्वीकार करून पूर्ण विश्रांति घ्यावी, असें मी योजिलें आहे. रामचंद्राची योग्यता, त्याची कर्तबगारी, त्याचा पराक्रम याची ओळख मी नव्यानें करून दिली पाहिजे अशांतली गोष्ठ नाहीं. त्याचें कार्य आज दहा वर्षें तुमच्या डोळ्यांपुढें सतत वास करीत आहे. रामचंद्राच्या यौवराज्याभिषेकासंबंधीं ज्यांच्यावर तो पुढें राज्य करणार त्या--पौरजनाची संमति घ्यावी, अशी सूर्यवंशांतील प्राचीन राजांची वहिवाट आहे. त्या वहिवाटीस अनुसरून—मी तुमचें मत विचा-

रीत आहे. मोकळ्या मनानें, सरल अंतःकरणानें, पूर्ण प्रेमानें आणि भीड-भाड न ठेवतां प्रस्तुत प्रसंगीं तें मत तुम्ही प्रकट करावें. आणि तुमच्या भावी कल्याणाचा प्रश्न मनःपूर्वक सोडवावा.

१७. पद ( चालः—प्रेमभावें जीव० )

शांततेनें बुध मनिं हो समजा भूपति नव काला।
सकल लोक मत एक रवानें। आमोददायी सतत
नृपाला ॥ ध्रु० ॥ जनता तोषद साह्या यावी मोद
वचनिं युवनृप वाला ॥ १ ॥

विनयः—राजा ! ह्या तुझ्या विचारांबद्दल आम्हीं तुझें हार्दिक अभिनंदन करतों. युवराजाची निवड तुला आपल्या मताप्रमाणेंहि कारितां आली असती; परंतु तसें न करतां ही लोकसंमत परिषद् बोलावून तूं जो लोकमतास मान दिला, तो केवळ अवर्णनीय आहे. प्रजेच्या प्रीतीवरच राजांचीं सिंहासनें अढळ असतात. हा प्रजाप्रेमाचा पाया ढांसळला कीं, सिंहासनाचा चूर होण्यास मुळींच विलंब लागत नाहीं. वेनराजानें जेव्हां उन्मादानें प्रजेच्या हक्कांची पायमल्ली केली, तेव्हां सिंहासनावरून त्याची तत्काळ उचलबांगडी करून जनतेच्या पुढाऱ्यांनीं पृथूस सिंहासनावर बसविलें, आणि सिंहासनाची महति कायम राखली. सुदैवानें सूर्यवंशांत एकाहून एक सरस असे नृपति निपजल्यानें तसले उभय पक्षीं हानिकारक असें प्रसंग फारसे घडून आले नाहींत. ध्रुवाचा निश्चय, दिलीपाचा स्वार्थत्याग, रघूची दानशूरता हे तुझ्या पूज्य पूर्वजांच्या अंगीं असलेले महनीय गुण तुझ्याहि अंगांत आहेत. तुझा विचार आम्हाला पूर्ण पसंत आहे, आणि तूं जें करशील तें आमच्या बऱ्याचेंच करशील असा आम्हाला भरंवसा आहे.

रंजनः—राजा ! तुझ्या विचाराला आमचें पूर्ण अनुमोदन आहे. ज्येष्ठ पुत्र राज्याचा अधिकारी आहे असें धर्मशास्त्र स्पष्टपणें बजावित आहे,

आणि त्यांतल्यात्यांत युवराज रामचंद्र हा केवळ अलौकिक पुरुष आहे. आर्यावर्तात अजिंक्य असलेलें भार्गवरामाचें शिवधनुष्य ज्यानें केवळ लीलेनें मोडून टाकलें, ताटकेचा वध करून ज्यानें विश्वामित्राचा यज्ञ निर्विघ्नपणें सांगतेस नेला, मारीच, सुबाहु वगैरे अनार्यांस आहवाला आव्हान करून पराक्रमानें त्यांचा वध केला, अशा पराक्रमी पुरुषाबद्दल कोणाला अभिमान वाटणार नाहीं? विक्रांत वीर्यानें वसुधेचें संरक्षण करणार असला राजा आपणास लाभावा असें कोणास वाटणार नाहीं? पराक्रमी पुरुष, वीर्यवान वीर, धाडसी धनुर्धर, चतुर चापपाणी, आणि देहधारी देव म्हणून रामचंद्राची प्रख्याती आहे. ज्ञान, शील, साहस, सौंदर्य, शांती, असा कोणताहि गुण नाहीं कीं जो रामचंद्रांत आढळत नाहीं. राजा! तुझा हा विचार आम्हाला पूर्ण संमत आहे. आणि रामाहून श्रेष्ठ असा राजा त्रिभुवनांतहि आढळणार नाही ही आमची खात्री आहे.

आनंद:—राजा! हा तुझा विचार अत्यंत योग्य आहे. गृहस्थाश्रमाची सांगता पूर्णपणें झाल्यावर, पुत्र वयांत आल्यावर, वानप्रस्थाश्रम स्वीकारावा हा आर्यांचा आश्रम धर्म आहे. वयाचीं पंचवीस वर्षे पूर्ण ब्रम्हचर्याश्रमांत घालविल्यावर अनुरूप स्त्रियेशीं विवाह करून देऊन पित्यानें पुत्राचा गृहस्थाश्रम थाटून द्यावा आणि विश्रांति घेण्याकरितां आपण वनांत गमन करावें हीच उत्तम चाल आर्यांत पूर्वापार चालत आली आहे. अध्यात्मविद्या, योगविद्या, धनुर्विद्या आणि मल्लविद्या यांचा वसिष्ठ आणि विश्वामित्र या आपल्या उभय गुरूंजवळ रामचंद्रानें पंचवीस वर्षेपर्यंत पूर्ण ब्रम्हचर्य पाळून अभ्यास केला आहे. सीतेसारखी परदुःखानें अंतःकरण कळवळणारी सुंदर स्त्री त्याची सहधर्मचारिणी आहे. त्याची कर्तबगारी, शील आणि साहस अनुपम आहे. असें असतां तुझा हा विचार आम्हांला कसा नापसंत होईल? त्यांत आम्हाला वावगें कां वाटेल? त्यांत आम्हाला वैगुण्य कां दिसेल? तुझ्या या विचाराला सत्याचें, धर्माचें, न्यायाचें,

नीतीचें अधिष्ठान आहे. या अधिष्ठानावर उभारलेला विचार विशाल वैभवाचाच द्योतक असतो. म्हणून आमची या तुझ्या विचाराला मनःपूर्वक मान्यता आहे.

दशरथः—तुम्हीं माझ्या उपक्रमाला अन्तःकरणपूर्वक मान्यता दिल्याबद्दल मला अत्यंत आनंद होत आहे. प्रजेचा विश्वास पूर्णपणें संपादन करणें हीच राजाची थोरवी आहे. परंतु तुम्ही ही जी सम्मति दिली आहे. त्यांत भीडभाडेचा, गफलतीचा, चुकीचा आणि विनयाचा अंश असणें साहजिक आहे. मी धर्मानें राज्य करीत आहें. मी म्हातारा व अनुभावि आहें, यामुळें तुम्हाला त्रास होण्याचा सम्भव नाहीं; पण माझ्या जागीं तरुण तरतरीत असा युवराज येऊन त्यानें राजदण्ड हातीं घेतला, तर तुम्हांस कदाचित् त्रास होण्याचा संभव आहे याचा तुम्ही पुरता विचार केला आहे ना ? तुम्ही माझ्या भीडेनें मान्यता दिली नाहीं ना ? तुमचा यांत कांही विनय नाहीं ना ? ही लोकसम्मत परिषद् आहे, आणि येथें प्रत्येकाला आपलें मत सविस्तरपणें प्रकट करण्याची मुभा आहे. राग, द्वेष किंवा असूया यांनीं प्रेरित न होतां प्रकट केलेल्या तुमच्या मताचा सहानुभूतिपूर्वक विचार करण्यांत येईल. राजा आणि प्रजा यांचें नातें म्हणजे पुत्रपित्याचें नातें आहे, आणि याच नात्यानें सूर्यवंशातील बहुतेक राजे आपल्या प्रजेशीं वागत आले आहेत. तर बोला ! रामचन्द्राला राज्याभिषेक करण्याचा तुमचा विचार ठाम ठरला ना ?

१८. पद (चालः–निशिदिनि मनिं धरिला०)

महिवर जरि असला। पित्याला। प्रियसुत समची
जनता त्याला। लोभ मोह रिपु, जाण हिताला
॥ ध्रु० ॥ लोक सुहीता। सहमत होतां। सकल
जनहितीं भूपति रमतां,स्वाराज्यीं सुषवित सकलां॥१॥

तर बोला ! रामचन्द्राला राज्याभिषेक करण्याचा तुमचा विचार ठाम ठरला ना ?

विनयः—राजा ! रामचंद्र आपला केवळ जेष्ठ पुत्र आहे, म्हणूनच आम्हीं त्याच्या यौवराज्याभिषेकाला संमति दिली आहे अशांतली गोष्ट नाहीं. त्याच्या अंगीं पुष्कळ चांगले गुण आहेत, आपल्या गुणांनीं तो युवराजपदाला योग्य आहे, म्हणूनच त्याला आम्हीं पसंत केलें आहे. रामचंद्र कोण नाहीं ? तो योद्धा आहे, दाता आहे, वक्ता आहे, पंडित आहे आणि शोधक आहे. केवळ पंचवीस वर्षांत इतकें ज्ञान सम्पादन केलेला एक तरी पुरुष आज धरणीतलावर विद्यमान आहे काय ? धर्मज्ञानानें वसिष्ठाला आनन्द देणारा, युद्धकलेनें विश्वामित्राला सन्तोषित करणारा,धनुर्विद्येनें भार्गवरामास मोहविणारा अन्य पुरुष या अवनीतलावर अवतीर्ण झाला आहे काय ? रामचन्द्राचें ज्ञान, त्याची दया, त्याचें दाक्षिण्य, त्याचें शील सर्वच गुण केवळ अनुपमेय आहेत. असला महाभाग आम्हाला नृपति म्हणून लाभत असतां त्याचा त्याग करण्याइतके आम्हीं मूर्ख नाहींत. रामचन्द्राचीच युवराजपदावर निवड करणें योग्य आहे.

रंजनः—राजा, पुत्रांनीं पित्याजवळ भीड कसली धरावयाची ! कन्येनें मातेजवळ विनयानें कां वागावयाचें ! राजा आणि प्रजा यांचें पुत्रपित्याचें नातें तूं सर्वांच बोलून दाखविलें आहेस आणि आजपर्यंतची तुझी वागणूक त्याच तत्वास अनुसरून आहे. रामचन्द्राच्या बाबतींत भीड धरण्याचें कारण कोठें आहे ? प्रज्ञा, चातुर्य, श्री, सौंदर्य आणि साहस यांनीं शोभिवंत झालेला रामचंद्र कोणाला आवडणार नाहीं ? मिथिलेची अहिल्यारूपी खडकाळ भूमि लागवडीस आणून सस्यश्यामल क्षेत्रांनीं समृद्ध केली, त्याच्या शोधकबुद्धीची कोण तारीफ करणार नाहीं ? अनंतकालपर्यंत पडित असलेली भूमि ज्याच्या पदरजानें पावन होतांच, फलपुष्पवती झाली, त्या महाभागाला पतितपावन परमेश्वराच्या पदवीस कोण बसवि-

णार नाहीं ? दयेनें प्रेरित होऊन आपल्या प्रतिस्पर्ध्याच्या–रावणाच्या–उरा वर पडलेलें धनुष्य उचलून ज्यानें शत्रूवरसुद्धां दया दाखविली त्या दयाशीलाला देवाच्या पंक्तीस कोण नेणार नाहीं ? असला महात्मा मायेनें राज्य करून आम्हांला सुख देणार यांत काय संशय ? आम्हीं आमचें मत पूर्ण विचारांतींच दिलें आहे, आणि कोणत्याहि प्रसंगीं आमचें तेंच मत कायम राहणार यांत बिलकूल संशय बाळगण्याचें कारण नाहीं.

आनंदः—राजा ! आम्ही आमचें मत मोहानें, भीडेनें किंवा गफलतीनें दिलेलें नाहीं, तर तें पूर्ण विचारांतीच दिलें आहे. दयेचा सागर, ज्ञानाचा उदधी, विनयाचा सिंधु, नीतीचा समुद्र, प्रेमाचा पयोनिधि असा रामचंद्रा शिवाय या जगांत कोण आहे ? एकवचनी, एकवाणी, एकपत्नि असा अन्य पुरुष पाहूं गेल्यास सांपडणें शक्य नाहीं ! राजीवनयन, कमललोचन, मृणाल नेत्र रामचंद्राचें वदन पाहून तहानभूक हरपून जाते, वृत्ति बेभान होते, चित्त बधिर होतें आणि अंतःकरणाला अननुभूत आनंदाचा आस्वाद घ्यावयास सांपडतो. विशाल भाल, उन्नत वक्षस्थल, पुष्ट दंड आणि गौरकांति असा रामचंद्र मार्गानें चालूं लागला असतां जणूं काय भूमि नमवीत आहे कीं काय असें वाटतें. शांत असून राजनीतिनिपुण, दयालु असून न्यायी आणि कनवाळू असून शाठ्यनीतिप्रवीण असा रामचंद्र आपणाला राजा असावा असें कोणाला वाटणार नाहीं ? अस्थानीं दया दाखविणें, अपमान झाला असतां शांति ठेवणें, दुष्टांशीं विनयानें वागणें ह्या दुर्गुणाचा त्याला लवलेशहि नाहीं. त्रासदायक ताटकेचा वध करितांना तिचें स्त्रीत्व त्यानें लक्षांत घेतलें नाहीं. मारीच, सुबाहु इत्यादि प्रबल अनार्यांशीं लढतांना त्यानें धर्मयुद्धाचे नियम पाळले नाहींत किंवा अनार्यांशीं त्यानें सख्य केलें नाहीं. प्रस्तुत कित्येक लोक रामचंद्राचा द्वेष करीत आहेत, त्याला पाण्यांत पहात आहेत आणि त्याचें निर्मूलन व्हावें असें इच्छित आहेत. दुष्टांना दूध पाजलें नाहीं, कृष्णसर्पांना दया दाख-

विली नाहीं, अनार्यांना आनन्द दिला नाहीं, हेंच त्यांच्या द्वेषाचें कारण आहे; पण जगांत असा कोणताहि राजा निपजला नाहीं कीं ज्यानें सर्व लोकांना सर्व काळीं संतुष्ट केलें. सर्व काळीं सर्व लोकांना संतुष्ट करणें हें साधूचें कार्य आहे, तें संन्याशाचें कार्य आहे, तें महात्म्याचें काम आहे, तें परमहंसाचें काम आहे. चंद्र चोराला अप्रिय होतो, सूर्य घूकाला नकोसा वाटतो, साखर रोग्याला कडू वाटते, म्हणून ज्याप्रमाणें त्या वस्तु त्याज्य होत नाहींत, त्याचप्रमाणें रामचंद्राचा कांहीं लोक द्वेष करितात म्हणून रामचंद्रहि त्याज्य होऊं शकत नाहीं. राजा ! निःशंक मनानें, मोकळ्या हृदयानें, सरळ अंतःकरणानें यौवराज्याभिषेकाची तयारी कर पाहूं ! कुशंकांना बुजून, आशंकांना भिऊन आणि कल्पनांनीं काऊन सत्कृत्यें सोडून देणें हें भित्र्या भागूबाईचें काम आहे. तुझ्यासारख्या पराक्रमी पुरुषाचें नाहीं.

दशरथः—पौरजनहो ! रामचंद्राला यौवराज्याभिषेक करण्याच्या ह्या माझ्या विचारास तुम्ही हार्दिक प्रोत्साहन द्याल असा मला पूर्ण भरंवसा होता आणि तो विश्वास अस्थानी नव्हता हें आतां तुम्ही कृतीनें सिद्ध केलेंच आहे. जी गोष्ट शुभ असेल ती शीघ्रतर घडवून आणावी अशी शास्त्राज्ञा आहे. शुभ कृत्यास कालावधि गेला असतां पुष्कळ विघ्नें उत्पन्न होण्याचा संभव असल्यानें हा समारंभ शक्य तितक्या लवकर उरकून घेणें मला इष्ट वाटतें. धर्मशास्त्र पाहातां परवां या कृत्यास जितका उत्तम मुहूर्त आहे तितका उत्तम मुहूर्त आणखी कित्येक वर्षांत मिळणें शक्य नाहीं. गंगोदकादि सर्व समारंभाचें साहित्य उद्यां येथें येऊन पोहो-चेल अशी मी व्यवस्था केली आहे, तर परवांच्या दिवशीं समारंभ उरकून घेण्यास तुमची अमान्यता आहे काय ? देहाचा भरंवसा नाहीं, आयुष्याची शाश्वति नाहीं, जीवनाचा विश्वास नाहीं. माझ्या रामचंद्रावर शक्य तितक्या लवकर छत्रचामरें ढाळलेलीं पाहावींत ही माझी इच्छा तुम्ही पूर्ण करणार नाहीं काय ?

१९. पद (चालः—करुणा करि जाइ०)

धरिली मनिं हीच सदां आशा ॥ ध्रु० ॥ निरूपम
शर्मा प्रेमळ सारे । जनक विकल कलहानाशा ।
विषयवासना त्यागुनि आतां । करिन विनाश
तमाकाशा ॥ १ ॥

शंकरः—राजा ! तुझी ही इच्छा मानवी स्वभावासच धरून आहे आणि शुभस्य शीघ्रं हें तत्वहि खरें आहे. अयोध्या हेंच आर्यावर्तांतील सर्वांत श्रीमान राष्ट्र आहे. आर्यावर्तांतील सर्व नृपतींनीं उपहार केल्याशिवाय येथील एकहि समारंभ पार पडलेला नाहीं. मग दोन दिवसांच्या अवधींत ही सर्व तयारी कशी होणार ? तशांत पौरजनांना अत्यन्त प्रिय असलेला भरत नंदिग्रामीं आहे. पौरजनांचा प्राण, पतितांचा परमेश्वर, प्रीतीचा पाहुणा उपस्थित नसलेला समारंभ पौरजनांना आनंदप्रद वाटणार नाहीं. रामचंद्र ज्येष्ठ आहे म्हणून बोलतां येत नाहीं; पण लोकमताचा कांटा भरताकडेच झुकेल असें वाटतें. म्हणून भारतवर्षांतील सर्व राजांना इतमामानें आमंत्रण करून हा समारंभ पार पाडावा. निदान भरत नंदिग्रामाहून परत येईपर्यंत तरी हा समारंभ तहकूब ठेवावा. नगरांत भरत उपस्थित नसतांना समारंभांत आनंदानें भाग घेणें लोकांना गोड वाटणार नाहीं.

वसिष्ठः—तुमचें म्हणणें जरी एका अर्थी खरें असलें, तरी आम्ही जाणून बुजूनच हें कृत्य करीत आहोंत यावरून त्यांत कांहीं तरी अंतस्थ हेतु असावा असा आपण तर्क करणें योग्य होतें. राजकारणाचे सर्वच डावपेंच प्रजेस उघड करून सांगणें हितावह नसलें, तरी तुमची शंकाच अशी आहे कीं, तिचें निर्मूलन करणें आवश्यक आहे. ती शंका जर तशीच कायम राहिली, तर राईचा पर्वत होऊन प्रजेंत भयंकर अशांति माजण्याचा संभव आहे. कांहीं दिवसांपूर्वीं राजा दशरथाला असें एक दुष्ट स्वप्न पडलें

की, "एक स्त्री पाठीवर मोकळे केश सोडून आरडत ओरडत राजविथिकेनें जात होती. राजधर्मांप्रमाणें नृपतीनें तिच्या दुःखाचें कारण तिला विचारलें, तेव्हां ती स्त्री म्हणाली, राजा मी अयोध्यानगरीची वास्तु देवता आहें. आतां एका महिन्याच्या आंत मी अनाथ होणार असल्यानें अशी रडत चाललें आहे." त्या भयप्रद बातमीनें हृदयास धक्का बसून राजा जागा झाला आणि दुसऱ्या दिवशीं सकाळीं त्या स्वप्नाचा अर्थ त्यानें मला विचारला. स्वप्नाचा अर्थ घडघडीत अनिष्ट होता आणि राजाची जन्मपत्रिका काढून पाहतांहि त्याला एका महिन्याच्या आंत अपमृत्यु आहे असें दिसून आलें. या उभय कारणानीं सावध होऊन तावडतोब हा परिषदेचा उपक्रम करण्यांत आला. संकटांची सूचना मिळतांच सत्वर बंदोबस्त करणें हेंच सूज्ञाचें काम आहे.

२०. पद (चालः—प्राण जरि शत्रूला०)

भूप धरि भीतिला। आधार नेमिला। देश रत<br>
जाहला। प्राण त्याचा ॥ध्रु०॥ राम हंता खला।<br>
एकला वाटला। त्यासि हा ओपिला। देश साचा॥१॥

आतां तरी आपल्या शंकांचें समाधान झालें ना? कांहीं उरलें असेल, तर सरळपणें पुढें मांडा! समाधान करण्याचा शक्य तों प्रयत्न करूं! या कार्यांत सर्वांचीच सहकारिता आम्हाला अवश्य आहे.

शंकरः—पण भारतवर्षांतील सर्व नृपति अनुपस्थित असतां आरंभलेलें कार्य तडीस जाईल ना? अपमानानें चिडून जाऊन एखादा आर्यनृपति मुळांतच रामचन्द्राचा द्वेष करणाऱ्या अनार्यांच्या मदतीनें समारम्भास विघ्न करणार नाहीं ना? आर्यराजास आमन्त्रण न केल्यामुळें अयोध्याधिपांच्या इभ्रतीस, कीर्तीस, लौकिकास आणि सन्मानास धोका पोंचणार नाहीं ना? भरताला या कृत्यामुळें चीड येऊन तो पुढेंमागें बन्धूच्याविरुद्ध शस्त्र

घेऊन उठणार नाहीं ना ? कोणतेंहि कार्य पूर्ण विचार करूनच आचरणांत आणलें पाहिजे.

वसिष्ठः—समारम्भास आमंत्रण केलें नाहीं म्हणून कोणाचाच अपमान होऊं शकत नाहीं. ती आमच्या मर्जीची गोष्ट आहे. समारम्भास पाहुण्यांना आमन्त्रण करतात तें आपलें वैभव त्यांना दाखवून मिरवावें म्हणून करीत असतात; त्यांत त्यांचा मानहि नाहीं आणि अपमानहि नाहीं. कांहीं नृपतींस आमन्त्रण करून अन्य नृपतींस आमंत्रण केलें नाहीं, तर कदाचित् न आमंत्रण केलेल्या नृपतींचा अपमान होऊं शकेल; पण या बाबतींत तशी वस्तुस्थिति नाहीं. आर्यनृपतींना आमन्त्रण न केल्यास अयोध्याधिपाच्या कीर्तीस थोडासा बाध येणार यांत संशय नाहीं. परंतु स्वप्नदोष टळून गेल्यास पुढें अश्वमेध यज्ञ करून ती कीर्ती भरून काढतां येईल. रामचंद्र, भरत, लक्ष्मण आणि शत्रुघ्न हे अयोध्येचे चारहि राजकुमार शूर, पराक्रमी, धनुर्धर आणि साहसी आहेत. ते चारहि दिशांचा दिग्विजय करून, राजा दशरथाची ही मनिषा सहज तडीस नेतील, म्हणून नृपतींना निमन्त्रण न केल्यास लौकिकाची हानि होण्याचा मुळींच संभव नाहीं. महात्मा भरत पुढें रक्तपाताची पाळी आणील असा संशयसुद्धां घेणें म्हणजे भरताची आम्हाला मुळींच ओळख नाहीं असें भासविण्यासारखें आहे. भरताचा शांतिप्रिय स्वभाव, त्याचें पशुपक्षांवरसुद्धां असलेलें प्रेम, शत्रूशींहि मैत्रीनें वागण्याचें त्याचें धोरण ह्या सर्व गोष्टी लक्षांत आणल्या असतां तो पुढें रक्तपाताची पाळी आणील हें सम्भवतसुद्धां नाहीं. तशांत न्यायहि रामचन्द्राच्याच बाजूचा आहे. ज्येष्ठपुत्र हाच सिंहासनाचा अधिकारी असें धर्मशास्त्रांत स्पष्ट सांगितलें आहे. जेष्ठपुत्र वेडा असला, पतित असला, क्लीब असला किंवा संन्यास घेतलेला असला तरच द्वितीय किंवा लायक पुत्रास सिंहासनावर बसवावें असें शास्त्र सांगतें. रामचन्द्र पतित आहे, तो वेडा आहे, तो क्लीब आहे असें कोणालाहि म्हणतां येणार नाहीं. मग

नीतिमान भरत अन्यायाचें वर्तन कां करील ? आणि कांहीं कलहप्रिय लोकांच्या चिथावणीवरून त्यानें तसें वर्तन केलें तर लोक तरी त्याला कां मदत करतील ? अयोध्येचे प्रजाजन धर्मशील आहेत, ते न्यायपरायण आहेत, ते सन्मार्गगामी आहेत. मग संशयाला जागा कोठें राहिली ? तुम्ही सूज्ञ आहां, समंजस आहां, सन्मार्गी आहां म्हणून लोकांनीं प्रतिनिधि या नात्यानें तुमची निवडणूक केली आहे. मनांत कोणताहि किंतु न ठेवतां एकमतानें परवां समारम्भ साजरा करण्यास सम्मति द्या पाहूं.

सर्व एकदम:—आमची एकमतानें पूर्ण सम्मति आहे.

वसिष्ठ:—म्हणा तर मग युवराज रामचन्द्र महाराज की जय ! ( सर्व एकदम जयघोष करितात. )

---

## प्रवेश तिसरा.

[ कौटिल्य प्रवेश करितो. ]

कौटिल्य:—झालें ! ठरलें एकदांचें ! उद्यां रामाला राज्याभिषेक होणार हें तर निश्चित ठरलें गेलें ! वज्रलेप झालें ! आतां भरत येऊं द्या, कीं दुसरा कोणी कृतांत येऊं द्या. आज दरबारांत मंजूर झालेला ठराव कांहीं बदलत नाहीं ! दरबारच्या ठरावाप्रमाणें झालेंच पाहिजे. कारण ती दरबारी शिस्त आहे. राजा दशरथाला आणि आमच्या गुरुजींना आतां लोकसंमत परिषदेचा पाठिंबा मिळालेला आहे. आतां जर कोणी माथेफिरूपणानें या पुण्यकार्याच्या उलट चळवळ करील तर त्यास नियमाप्रमाणें राजद्रोही ठरवून अंधारकोठडीचा अधिकारी करण्यास कितीसा उशीर लागणार ? रामाला युवराजपदाचा अभिषेक होणार हें कळल्यापासून मला तर फार आनंद झाला आहे कारण समारंभाच्या वेळीं पुष्कळ दक्षिणा वांटली जाणार, रामरायाची सुवर्णतुला होणार आणि तें सर्व द्रव्य आम्हां ब्राम्हणांना मिळणार ! समारंभाचे मुख्य आचार्य आमचे गुरुजी असल्यानें

त्यांच्या हातीं बहुतेक ही दक्षिणा वांटण्याची व्यवस्था राहणार ! मी आमच्या गुरूंचा पट्टशिष्य ! तेव्हां ते मला विशेष कांहीं द्रव्य देणार यांत संशयच नाहीं. ह्या समारंभांत जें भरपूर द्रव्य मिळेल तें घेऊन संसार साजरा करावा म्हणजे झालें ! आर्यांच्या चारही आश्रमांत गृहस्थाश्रम हाच श्रेष्ठ आहे. खरोखर गृहस्थाश्रमाइतकें सुख दुसऱ्या कशांतच असेल असें मला वाटत नाहीं. संसार म्हणजे सुखाचें आगर ! त्यांत आणखी मनासारख्या बायकोची भर पडली कीं, मग कांहीं विचारूंच नका. हा सुखाचा संसार सोडून भावी स्वर्गसुखाच्या आशेनें संन्यास पत्करणारे लोक किती तरी मूर्ख आहेत ! मला तर आतां असें वाटूं लागलें आहे कीं, गेलीं बारा वर्षें मी व्यर्थ अध्ययनांत घालविलीं. जर कां माझ्या माता-पित्यांनीं माझें लहानपणींच लग्न करून मला संसार थाटून दिला असता तर कितीतरी चांगलें झालें असतें. मातापित्याच्या ह्या महान चुकीचें प्रायश्चित मला आतां भोगावें लागत आहे. बस्स ! ठरलाच विचार ! आतां पहिल्यानें आपलें लग्न उरकून टाकावें. दैवयोगानें कुटिलेसारखी फटाकडी बायको अस्मादिकांच्या विद्वत्तेवर व तेजावर भाळून अनायासें आमच्या गळीं पळत आहे. मग कां कमी करा ? खरोखर कुटिलेसारखी बायको मिळण्यास सात जन्म पुण्याई केली पाहिजे. अहाहा ! काय तें अप्रतिम लावण्य ! काय ती तिच्या शरिराची स्वाभाविक मोहकता ! बायको पण बायको ! जणूं काय स्वर्गलोकींची अप्सराच या भूतलावर अवतरली आहे. (दूर पाहून) ही कोण बरें इकडे येत आहे ? कुटिलाच, माझी कुटिलाच ! काय ही चालण्याची ढब ! अहाहा ! ( हंसतो )

( कुटिला प्रवेश करिते. )

कुटिला:—मेलें माणसानें तिष्ठत तरी किती वेळ बसावयाचें ! आतां तरी या गरीब दासीची आठवण झाली हें भाग्यच म्हणावयाचें ! आपण गेल्यापासून दहा बारा खेपा तरी येऊन गेलें ! मेलें माणसानें इकडे झुरून

झुरून मरावें ! तुम्हांला त्याचें कांहीं आहे काय ? फुकटचें वचन द्यायला काय, एक सोडून पन्नास वेळ ! कामाच्या घाईत मेली दोन दिवस झोंपच घ्यायला मिळाली नाहीं. थोडा वेळ झोंपावें म्हणून अंथरुणावर पडलें, तों कोठची झोंप यायला ! जरा कोठें डोळा लागतो न लागतो तोंच आपण स्वप्नांत दिसायला लागलां ! ध्यानीं, मनीं, स्वप्नीं केवळ आपलीच मूर्ति विहरत आहे. मेलें असें कां कोणाला वेड लावतात ? दुसऱ्याला वेड लावायचें तरी किती ? मी आपली वेडी म्हणून दहावीस वेळां येऊन गेलें ! आम्हां बायकांचा स्वभावच मेला अतिशय भोळा ! आम्ही सहज फसतों; पण पुरुषांचें तसें नाहीं. त्यांना कोणाची माया नाहीं कीं दया नाहीं. मला वचन दिलेंत त्याप्रमाणें आणखी कित्येकानांहि आपण वचन दिलें असेल, वचन देणें आणि तें मोडणें हा तुम्हां पुरुषांचा म्हणे जन्मसिद्ध हक्कच आहे राजा दशरथानें नाहीं कां कैकय राजाला वचन दिलें ? राजानें वचनभंग करण्याचा निश्चय केला आहे असें मघां तुम्हींच ना सांगितलें ? त्यांतलेच आपण —( रागानें दूर जाते )

कौटिल्यः——वचन मोडणार असेंच ना तुझें म्हणणें ? वेडी आहेस झालें ! अग मी राजा कां आहे वचन मोडायला ? मी रामाचा भक्त आहे. खरा रामभक्त वचनापासून केव्हांही ढळत नसतो. समजलीस ? कारण हें आहे रामराज्य !

कुटिलाः—रामभक्त कधींहि वचन मोडीत नसतो मग कोण मोडतो ? राम कीं काय ?

कौटिल्यः—माझा रामचंद्र केव्हांहि वचन मोडणार नाहीं. कारण एक-बाणी, एकपत्नी, एकवचनी असा त्याचा बाणा आहे. मग तो कसा वचन मोडील ?

कुटिलाः—राम वचन मोडीत नाहीं, त्याचा बाप वचन मोडतो ! पित्याच्या पापाचा वांटेकरी पुत्र होतो ना ? मग तुमचा तो राम पित्यानें

दिलेल्या वचनाची पूर्तता कां करीत नाहीं ? तें वचन पूर्ण केल्यास अयोध्येचें वैभवशाली सिंहासन अंतरतें इतकेंच ना ?

कौटिल्यः—राजा दशरथानें दिलेलें वचन रामचंद्राला मुळीं माहीतच नाहीं. रामाला जर ही वस्तुस्थिति कळेल तर तो असलें अन्यायाचें राज्य केव्हांहि स्वीकारणार नाहीं, हीच तर राजकारणांतील पठाडी गोम आहे. तुम्हां अक्कलशून्य बायकांना ती कशी कळणार ? कारण हें आहे रामराज्य!

कुटिलाः—( स्वगत ) हा म्हणतो तें खरेंच आहे. ही पठाडी गोम आतां मंथरेच्या कानावर घातलीच पाहिजे. आतां या खुळ्याकडून दरबाराची वार्ता काढून घेऊं म्हणजे झालें. ( उघड ) रामचंद्राला ही गोष्ट कळली नाहीं म्हणतां ? लोकसंमत परिषदेला तो उपस्थित नव्हता ?

कौटिल्यः—त्यानें परिषदेंत उपस्थित राहूं नये अशी आमच्या गुरुजींनीं मोठ्या कौशल्यानें तजवीज केली होतीच मुळीं ! परिषदेंत एखादे वेळीं वचनाची वाच्यता होणार अशी गुरुजींना धास्ती वाटत होती; पण सुदैवानें तसा कांहीं प्रकार घडून आला नाहीं; कारण ती गोष्ट माहीत असलेलीं वृद्ध माणसें आज फारशीं हयात नाहींत आणि आहेत तीं सर्व रामचंद्राच्या बाजूचीं आहेत; कारण हें आहे रामराज्य !

कुटिलाः—आपल्या गुरुजींना रामाकरितां इतकी खटपट करण्याचें कारण काय ? युवराज भरताचें आणि त्याचें कांहीं वांकडें कां आहे ?

कौटिल्यः—कारण कांहीं फार मोठेंसें नाहीं. त्याचा भरतापेक्षां रामाकडेच जास्त ओढा आहे. आणखी कारण तें काय असणार ? कारण हें आहे रामराज्य !

कुटिलाः—बरें, आज परिषदेंत काय ठरलें ? कीं आम्हां बायकांना सांगायचें नाहीं ? कशाला सांगणार ? मी कोण आपली ? आम्हां बायकांच्या तोंडांत कांहीं रहात नाहीं, असें म्हणतात तें अगदीं खरें ! कुठून कांहीं कळलें कीं, आपल्या प्रीतीच्या माणसाला तें सांगून आम्ही मोकळ्या

होतों; पण पुरुष कांहीं आपल्या मनाचा थांग लागूं देत नाहींत. सागराच्या तळाचा ठाव मिळेल; पण पुरुषाच्या मनाचा ठाव मिळायचा नाहीं, असें म्हणतात, तें अगदीं खरें बाई ! मला सांगा ना दरबारची हकीकत ! सांगा ना ? (रागानें दूर जाते.)

कौटिल्यः—( हंसत ) अरे वा ! राग आला वाटतें ! रागवायला काय झालें ? ये सांगतों. या राज्यांत एकमेकावर कोण रागावतो कीं काय ? कारण हें आहे रामराज्य !

कुटिलाः—(जवळ येऊन) मला कशाला सांगणार? मी कोण आपली? मेला आम्हां बायकांचा जन्म फुकट ! तुम्ही मला सांगणार नाहीं, तर दुसरा कोण बरें सांगणार ? नकाच सांगूं ! मेली म्हण आहे ना ! पावसानें भिजविलें, राजानें लुटलें व नवऱ्यानें मारलें तर कोणाला सांगणार ? माझ्यावर आपलें मुळीं प्रेमच नाहीं. ( रडूं लागते. )

कौटिल्यः—खरेंच माझें तुझ्यावर प्रेम आहे. तुझ्यावर जर माझें प्रेम नसतें,तर परिषद संपल्यावर मी तावडतोब इकडे धांवून कां आलों असतों? मी तुला शपथेवर सांगितलें ना ? मी रामाची खोटी शपथ कधींच घेत नसतों; कारण हें आहे रामराज्य !

कुटिलाः—( लाडिवाळपणानें जवळ जाऊन ) आपलें माझ्यावर प्रेम आहे ना ? मग सांगा ना मला परिषदेंत काय ठरलें तें ?

कौटिल्यः—अग ! जें काय ठरणार होतें तें ठरलें ! परिषदेंत अमूक एक ठरवायचें तें पूर्वीच ठरलेलें असतें. अज्ञ लोकांच्या समजुतीकरितां परिषदेचा तो एक फार्स करून दाखवायचा असतो. राजाचें, आमच्या गुरुजींचें आणि सर्व मंत्रिमंडळाचें रामाला यौवराज्याभिषेक करण्याचें ठरलें होतें. तेंच ठरावयाच्या रूपानें पास करण्याचा फार्स झाला.आणखी होणार काय ? कारण हें आहे आमचें रामराज्य !

कुटिलाः—म्हणजे ? कोणीच रामाच्या राज्याभिषेकाला अडथळा केला नाहीं ? सर्वांना हा वचनभंगाचा अन्याय पसंत आहे ?

कौटिल्यः—सर्वांनाच पसंत आहे असें मी केव्हां सांगितलें ? बहुतेकांना ही वचनभंगाची गोष्ट माहीतच नाहीं. ज्या लोकांनाच ती गोष्ट माहीत आहे, त्यांना अधिकारीमंडळापुढें आपली नापसंती दाखविण्याचें धैर्य नाहीं. एखादा निर्भीडपणानें स्पष्ट व योग्य बोलला, तर त्या एकट्याला विचारतो कोण ? कारण हें आहे रामराज्य !

कुटिलाः—मग या वचनभंगानें चिडून जर प्रजेनें रामास युवराज न करितां भरतास राज्य मिळालेंच पाहिजे, असें निक्षून घोषित केलें तर त्याचा कांहिंच कां उपयोग होणार नाहीं ?

कौटिल्यः—होईल ! पण केव्हा ? प्रजेमध्यें संघटनेचें बळ उत्पन्न होईल तेव्हां ! प्रजेमध्येंच पाहिल्यानें मुळींच एकी नाहीं. कांहींचीं तोंडें पूर्वेकडे असतात, तर कांहींचीं पश्चिमेकडे असतात. अशा आपसांत लठ्ठालठ्ठी करणारांना विचारतो कोण? तशांत भरतावरील निस्सीम प्रेमामुळें अनार्यांनीं कांहीं प्रयत्न केला, तर जाती जातींत वैमनस्य उत्पन्न करून परस्पर आर्यानार्यांचा कलह लावून देण्याच्या भेदनीतींत आमचे राज्यकर्ते अगदीं प्रविण आहेत. समजलीस ? कारण हें आहे आमचें रामराज्य !

कुटिलाः—बरें, तें राहूं द्या. मला येऊन फार वेळ झाला. तिकडे राणीसाहेब वाट पाहात असतील. आतां मला गेलेंच पाहिजे; तेव्हां या गरीब दासीला पुन्हां केव्हां दर्शन होणार ?

कौटिल्यः—उद्यां सूर्योदयापूर्वी याच ठिकाणीं भेटेन; पण मला सांग, परवां फारच चांगला मुहूर्त आहे. त्याच वेळीं आमचेंहि लग्न घेऊं उरकून कारण हें आहे रामराज्य !

कुटिलाः—माझी कांहीं हरकत नाहीं; पण—

कौटिल्यः—हा पण कां मध्यें आड येतो आहे, तें मला समजेल कां? समजल्यावर त्याला युक्तीनें दूर करतां येईल. तुला नको त्याची काळजी! कारण हें आहे रामराज्य!

कुटिलाः—तसें कांहीं नाहीं; पण माझी एक दूरची मावशी आहे. तिनेंच मला लहानाची मोठी केली. माझ्यावर तिचा जीव कीं प्राण आहे; तेव्हां तिला नको कां बोलवायला? तसेंच कैकेयी राणीसाहेबांची नको कां परवानगी घ्यायला? त्या तर सध्यां अतिशय दुःखांत आहेत; म्हणून म्हणतें हा अभिषेक—समारम्भ आटोपल्यावर मावशीला बोलावणें पाठवूं आणि राणीसाहेबांची परवानगी घेऊं. मुहूर्तांना काय तोटा! जर एखाद्या भटजीचा हात ओला केला, तर एक सोडून दहा मुहूर्त तयार!

कौटिल्यः—बरें! तुझ्या मर्जीप्रमाणें होऊं दे! माझी संध्या खोळंबून राहिली आहे; तेव्हां मलाहि होतो आहे उशीर! उद्यां कांहीं संध्येला वेळ मिळेल, असें वाटत नाहीं. कारण रामाला परवां राज्याभिषेक असल्यानें उद्यांचा दिवस आम्हाला अगदीं गर्दीचा जाणार! म्हणून उद्यांचीहि संध्या मला आजच उरकून टाकिली पाहिजे. सन्ध्या न करून कसें चालणार? कारण हें आहे रामराज्य! (दोघेंहि जातात.)

## अंक दुसरा समाप्त.

# संगीत
# स्वार्थत्याग

## अंक तिसरा.

### प्रवेश पहिला.

( कांहीं मुली नाचत प्रवेश करितात. नाचाचा प्रेक्षणीय देखावा. )

२१. पद.

गा हो गा हो सदा रामचंद्रा गुणाच्या समुद्रा विरा
पूरुषसिंहा । लोक तोषदा । बुद्धि ज्या सदा । हा
गावा ॥ ध्रु० ॥ शांत मूर्ति, सौम्य नीति, अभिनव
धरि विमल रीति, सिताकांत अमरमहित राक्षस
जीवन नाशन आसनिं साजावा ॥ १ ॥

कमलाः—गडे सुशिल ! रामचंद्राला राज्याभिषेक होणार, यांत लोकांना ग आनंद कसला ? फार झालें तर रामचंद्र आपला पति म्हणून कीं सीतादेवीला आनंद व्हावा.

सुशीलाः—फार झालें तर रामचंद्र आपला प्रिय पुत्र म्हणून कीं कौसल्यादेवीला आनंद व्हावा.

सरलाः—फार झालें तर रामचंद्र आपला प्रिय आत्मज म्हणून कीं राजा दशरथाला आनंद व्हावा.

विमला:—फार झालें तर रामचंद्र आपला प्रिय बंधु म्हणून लक्ष्मणाला आनंद व्हावा.

तरला:—फार झालें तर रामचंद्र आपला प्रिय शिष्य म्हणून कीं वसिष्ठ गुरूला आनंद व्हावा.

अमला:—हें तुमचें फार झालें; वाढतां वाढतां त्यांतून अयोध्येंतील एक देखील प्रजाजन सुटणार नाहीं.

कमला:—आणि मग प्रत्येकानें आनंद करावा, असें सहज सिद्ध होऊन जाईल.

सुशीला:—रामचंद्र अयोध्येचा युवराज म्हणून लोक उत्सवांत आनंदानें भाग घेत आहेत.

सरला:—नाहीं. रामचंद्र सकलगुणसंपन्न आहे, म्हणूनच जनता उत्सवांत सामील झाली आहे.

विमला:—नाहीं. रामचंद्र प्रतापी पुरुष आहे, म्हणून पौरजनांनीं उत्सवाला पाठिंबा दिला आहे.

तरला:—नाहीं. राम अत्यंत सुंदर आहे म्हणून प्रजा उत्सहानें समारंभ साजरा करीत आहे.

अमला:—रामचंद्राच्या सौंदर्यावर फार तर बायका भाळून जातील; पुरुषांना त्याचें काय होय ?

कमला:—रामचंद्राच्या सौंदर्यावर फार तर युवति भाळून जातील; वृद्धांना त्याचें काय होय ?

सुशीला:—रामचंद्राच्या सौंदर्यावर फार तर कुमारी भाळून जातील; विवाहितांना त्याचें काय होय ?

सरला:—पण सर्वांवर प्रेम करणाऱ्या रामचंद्राचा अनार्यांनीं द्वेष कां करावा ?

विमला:—त्याचें नांव कानीं पडतांच भेदरल्यासारखें कां व्हावें ?

तरलाः--त्याच्या पराक्रमाची, कर्तबगारीची, साहसाची आणि विनयाची निंदा कां करावी ?

अमलाः—रामचंद्रानें काय त्यांची मालमत्ता लुटून आपलें घर भरलें आहे ?

कमलाः—त्यानें काय त्यांच्या बायकापोरांची कत्तल केली आहे ?

सुशीलाः—त्यानें काय अनार्यांची भूमि हरण करून आर्यांच्या हवालीं केली आहे ?

सरलाः--पण राम म्हणे अनार्यांना समतेनें वागवीत नाहीं.

विमलाः--त्यांना वानर समजून अनार्यांवर आडून बाण मारतो.

तरलाः--अनार्यवस्तीचा संसर्ग आर्यवस्तीला लागूं नये म्हणून झटत असतो.

अमलाः--अनार्यांना अस्पृश्य समजण्यांत यावें व त्यांची सावली देखील घेऊं नये, अशी लोकांना शिकवण देतो.

कमलाः–आणि आपण त्याप्रमाणें वागणूक करतो.

सुशीलाः–अनार्य चांडाळ आहेत. त्यांत सद्गुणी पुरुष निपजणें शक्य नाहीं, असें त्याचें म्हणणें आहे

सरलाः–हें रामचन्द्राचें वर्तन गर्हणीय नाहीं काय ?

विमलाः—ह्या कृत्यांनीं रामचंद्र अन्यायाचा वांटेकरी होत नाहीं काय?

तरलाः—सर्व मनुष्यप्राण्यांची योग्यता जन्मतः सारखी असतां हें वर्तन रामचन्द्राला शोभतें काय ?

अमलाः—कुत्रा–मांजरासारखे घाणेरडे प्राणी आम्हीं स्पृश्य समजतों; मग अनार्यच अस्पृश्य कां ?

कमलाः–अनार्यांनीं शूद्र वर्णांत सामील होऊन आर्यांची सेवा करावी हा निर्बंध का ?

सुशीलाः–कुत्र्या–मांजरापेक्षांहि अनार्य हीन आहेत काय ?

सरला:–पशूपेक्षांहि ते नीच आहेत काय ?

विमला:—महारोग्यांपेक्षांहि ते हीन आहेत काय ?

तरला:–मग यज्ञयागांच्या प्रसंगीं त्यांना मज्जाव कां ?

अमला:—सार्वजनिक समारम्भांत भाग घेण्यास त्यांना आडकाठी कां?

कमला:–त्यांची वस्ती गांवाबाहेर चांडाळवाड्यावर कां ?

सुशीला:—रामचंद्र हा अन्याय करीत आहे. त्यानें या अन्यायाचें परिमार्जन करावें, याबद्दल आम्हीं त्यांना राज्याभिषेकाच्या वेळीं विनन्ति करूं या.

२२. पद (चाल:–किति मजेदार हार० )

गुणि महाराज आज रघुवीर भुपति, सकल नगर
भुषित सुमनिं दारोदार ॥ ध्रु० ॥ राम हा प्रियाचि
जाण प्रजेला । मोद तयाप्रति होत विशाला । वाद्यें
फार । वारंवार । लोक तोषित होती मार । नाचे
जनता बहु आनंदें ॥ १ ॥

---

## प्रवेश दुसरा.

( कैकेयी व मंथरा बोलत आहेत, असा पडदा उघडतो. )

मंथरा:—कैकेयी ! तूं भोळी आहेस. राजकारणांतले डावपेंच तुला समजत नाहींत. आपमतलबी लोकांचा कावा तुला कळत नाहीं, दांभिक भक्तांच्या भावनांचें तुला ज्ञान नाहीं. तुझ्या पुत्राला सिंहासनाचा स्वामी करीन, असें राजा दशरथानें तुझ्या बापाला भर राजसभेंत घडघडीत वचन दिलें होतें.कैकय देशांतील कित्येक वृद्ध मनुष्यांनीं ही घटना समक्ष पाहिलेली आहे. तूं त्यावेळीं नववधू होतीस.यामुळें तुला यांतलें कांहीं माहीत नाहीं. तेव्हां दिलेलें हें वचन सत्यप्रतिज्ञ सूर्यवंशचूडामणि म्हणवून घेणारा राजा दशरथ आज मागें घेत आहे. जणूं काय ती घटना घडूनच आली नाहीं,

असें त्यानें वर्तन ठेवलें आहे. तुझ्या पुत्राचा हक्क तो पायाखालीं तुडवीत आहे. ह्याचा जाब त्याला विचारणें तुझें कर्तव्य नाहीं काय ?

२३. पद (चालः—खर विषाचा प्याला०)

सुत सुखाला लागे अनलचि हा । शांत करि नच
पाहीं । विलयचि तव सारा ॥ध्रु०॥ नृपति भुलत
द्विज वचना । करित सकल नय विहिना । तुज
फसवी । बहु भुषवी तुडवित सुनु तारा ॥ १ ॥

भरताच्या हक्कांस जागून तूं त्याच्या मातेनें—त्याला जर राज्य मिळवून दिलें नाहीं. तर त्याला तें कोण देणार ?

कैकेयीः—तूं हें काय बोलत आहेस ? जेष्ठ पुत्र म्हणून रामचंद्रच राज्याचा अधिकारी असतां भरताला राज्यपद मिळालें पाहिजे, असा हट्ट कसा धरतां येईल? माझ्या पुत्राला सिंहासनावर बसविण्याचें त्याच्या पित्यानें वचन दिलें असेल, तर तें नाकारण्याचें कारण काय ? भरत व रामचंद्र त्यांना सारखेच प्रिय आहेत. मग आपलें वचन मोडून इहलोकीं अपकीर्ति आणि परलोकीं नरक यांना वांटेकरी होण्याचें त्यांना काय कारण ? धर्मानें, न्यायानें, वहिवाटीनें आणि लौकिकानें सिंहासन रामाचें आहे. त्यांत मी ढवळाढवळ करणार नाहीं. भरताप्रमाणें रामहि मला प्रिय आहे. त्यालाहि मी आपलाच पुत्र समजतें.

मंथराः—कैकयी तूं आहेस तरी कोण ? आत्महित ज्याला समजत नाहीं, अपमानाची ज्याला चाड नाहीं, वैभवाची ज्याला इच्छा नाहीं, त्यानें मनुष्य तरी म्हणवून कां घ्यावें ? रामाची कसबकरणी जर तुला माहीत असती, तर तूं त्याच्यावर खास प्रेम केलें नसतेंस. सर्वांभूतीं प्रेम करण्याची भरताची प्रवृत्ति कोणीकडे ? आणि जात्यभिमानानें अंध झालेलें रामाचें वर्तन कोणीकडे ? रामाची स्वार्थाची अपूर्व हांव कोठें आणि भरताचा स्वार्थत्याग कोठें ? एक स्वर्गातला देव तर दुसरा नरकांतला

काढी. रामचंद्राच्या हातीं अधिकार आला नाहीं, तोंच पुत्रासह तुला देशोधडीस लागावें लागेल; तुझे हाल कुत्र्यादेखील खाणार नाहीं.

२४. पद (चालः—ने पितरां खर०)

ने विलया नृप करणि ही अदया। पर दास्यीं नाहीं
सुख या ॥ ध्रु० ॥ भरतचि नसे जरि राज्याला ।
सवती समाकुल संतापाला । नृपतिच जरि वरी
जननिला । खरि दासिच तूं होत विजया ॥ १ ॥

भावी संकटाची सूचना मिळतांच सावध होणें हें मानवाचें कर्तव्य आहे. तर जा! आणि राजा दशरथाला या अनिष्ट कार्यापासून परावृत्त कर!

कैकेयीः—पण तूं सांगतेस तें खरें कशावरून? माझ्या पुत्राला सिंहासनाचा अधिपती करीन, असें राजानें वचन देण्याचें कारण काय?

मंथराः—ये अशी ताळ्यावर ये. कैकय देश हा सर्व आर्यावर्तांत पवित्र मानला जातो. तेथील राजघराणें अत्यंत शुद्ध, पवित्र व परंपरायुक्त आहे. त्यामुळें कैकय देशच्या राजकन्या वरण्याकरितां आर्यावर्तांतील राजपुत्रांची अहमहमिका लागलेली असते. कैकयदेशच्या राजघराण्याशीं संबंध जडून आपलें घराणें मानमान्यतेस चढावें, अशी आर्यावर्तांतील प्रत्येक राजाची इच्छा असते. यामुळें कैकय देशच्या राजकन्येच्या पोटीं निपजलेल्या पुत्रास सिंहासनाचा अधिपति समजावें, असा प्रघातच पडून गेला आहे आणि कैकय देशचे राजेहि वराकडून तसें वचन घेतल्याशिवाय आपली कन्या सहसा त्यास अर्पण करीत नाहींत. त्या राजकन्येला कैकयी याच नांवानें संबोधून तिला पट्टराणी मानावें आणि बाकी सर्व राण्यांत तिला मानाचें पहिलें स्थान मिळावें, असा प्रघातच पडून गेला आहे. या वहिवाटीस अनुसरून तुझ्या पुत्राला राज्य मिळणें योग्य व नीतिसंमत आहे. अयोध्येच्या राजघराण्यांतहि तुला पट्टराणीचा मान असतां तुझा पुत्रच सिंहासनाधिश्वर कां होऊं नये?

त्यानेंच असा कोणता अन्याय केला आहे कीं, सिंहासनावरचा त्याचा हक्क उडवून टाकावा!

**कैकेयी:**—तूं म्हणतेस तें खरें आहे; पण असें असतां भरताच्या पित्यानें त्याला दूर करून रामचंद्राला राज्याभिषेक कां करावा? वचन आणि वहिवाट यांच्या सांगणीस त्यानें हरताळ कां फांसावा?

**मंथरा:**—कैकेयी! अजूनहि राजाची प्रीति आपणावर आहे अशा भ्रमांत तूं आहेस काय? तुझ्यापेक्षां दशरथ राजा कौसल्येवर जास्त प्रेम करतो, तिला जास्त मान देतो आणि तिच्या पुत्राला जास्त प्रीतीनें वागवितो हें तुला दिसत नाहीं? राजाची ही दुटप्पी वागणूक आजचीच नाहीं, ती कित्येक वर्षांची आहे. मागें पुत्रकामेष्टी यज्ञाच्या वेळीं राजानें तुझी अवहेलना करून कौसल्येला प्रथम हविर्भाग अर्पण केला हें तुला आठवतें ना? त्या वेळीं तुझा पिता जिवंत होता त्यास हा अपमान असहनीय होऊन, त्यानें किती तेजस्वीपणाचें वर्तन केलें तें तुला स्मरत आहे ना? पित्याच्या सांगण्यावरून तूं रुसून बसली होतीस; अन्य राण्यांच्या दुप्पट हविर्भाग दिल्यानंतरच तुझा राग शमन झाला हें तुला माहीत आहे ना? तो तुझा तेजस्वी पिता आज जिवंत नाहीं? पण अपमानाकरितां प्राण देणारा त्याचा आत्मा या तुझ्या भेकडपणामुळें स्वर्गांत किती तळतळत असेल याची कांहींतरी कल्पना कर आणि हा तुझा वेंगळूटपणा सोडून दे कशी? राजाचें प्रेम तुझ्यावर नाहीं· हें त्रिवार सत्य आहे. हा विलासी राजा तुझ्या सौंदर्यावर तेव्हां मोहित झाला असेल; पण तारुण्यभर संपतांच आतां त्यानें तुझी अवहेलना चालविली आहे. तुझा सवतीमत्सर करणाऱ्या कौसल्येच्या पुत्रानें राज्यारूढ व्हावें आणि तुझ्या पुत्रानें त्याचे जोडे पुसावे हें तुला कसें सहन होतें? न्यायानें, करारानें आणि वहिवाटीनें राज्य भरताचें आहे.

२५. पद (चालः-लोळत कच०)

न्यायचि नृप भरत धराणि । योग्य तीस नाहिं कोणि । विमल प्रेम जगत धाम शौर्यानें नर सुमणि ॥ ध्रु० ॥ राज्याला पर न पात्र, दुष्ट नष्ट राम दिसत, विकल करित सकल जगत हीन नीच तव कराणि ॥ १ ॥

न्यायानें भरताचें असलेलें हें राज्य मधल्यामधें हिसकावून घेणारा हा उपटसुंभ रामचंद्र कोण ? राजाच्या या अनीतिमान कृत्याचा इनकार केलाच पाहिजे, राजाचें हें असत्य आचरण उघड केलेंच पाहिजे, राजाचें हें दुराचरण जगांतील तमाम लोकांस घोषित केलेंच पाहिजे.

कैकेयीः--तूं सांगतेस तें अगदीं बरोबर आहे; पण जो राजा माझ्यावर प्रीति करीत नाहीं, तो माझ्या हट्टास तरी कितीसा दाद देईल ? भरत तर येथें नाहीं, त्याच्यावांचून मला कोणाचें साह्य मिळणार ?

मंथराः--भरताला येथून दूर दवडण्यांत राजाचा कोणता कावा आहे, हें आतां तरी तुझ्या लक्षांत आलें ना ? भरत येथें उपस्थित नसतांना समारंभ उरकून घेण्याची चालविलेली घाई काय सांगत आहे ? स्वप्न, जन्मपत्रिका वगैरे सर्व त्या वसिष्ठाच्या सुपीक डोक्यांतून निघालेल्या कल्पना आहेत ! ह्या कावेबाज कल्पनांनीं अयोध्येची दुधखुळी प्रजा चकली तरी ही मंथरा चकणार नाहीं ! तुझ्या लग्नाच्या वेळीं तुझ्याबरोबर पाठराखणी दासी म्हणून मी येथें आलें, त्याला आज चाळीस वर्षे झालीं ! वसिष्ठाची व माझी इतक्या दीर्घ कालावधीची ओळख आहे. पक्का कावेबाज, शास्त्रनीतींत मुरलेला, आपमतलबाचा पुतळा असा जगांत जर कोणता नीच पुरुष असेल तर तो वसिष्ठच होय ! भरत अनार्यांना जवळ करतो, त्यांस समतेनें वागवितो, त्यांच्याशीं प्रेमानें वागतो, हें कृत्य ह्या कोल्ह्याला सहन होत नाहीं. तो भरताचा द्वेष करीत आहे, त्याला पाण्यांत पहात आहे

आणि कोणत्या उपायानें भरताचा सत्यानाश करतां येईल याच चिंतनांत तो नेहमीं गढून गेलेला असतो. ह्या कोल्ह्यानेंच राजाला भुरळ घालून दुष्कृत्यास प्रवृत्त केलें आहे ! पुत्रकामेष्टी यज्ञाच्या वेळींहि कौसल्या प्रथम पत्नि म्हणून तीस प्रथम हविर्भाव अर्पण करण्याची सल्ला याच नादान मनुष्यानें दिली होती ! हा कुटिल नीतीचा अर्क आहे, कृष्णकृत्याचें सार-सर्वस्व आहे आणि गुप्त मसलतींचा कांदा आहे !

२६. पद (चालः—मद्यवपु घट०)

नीच विलसत सत्ता-मदानें वृकचि हा रुधिर रत
घोर पशु पाहे, विप्र खास नोहे ॥ध्रु०॥ मसलत
विफल सकल करि विजयिनि खरी नारि तुजासि
यशद बहु आहे ॥ १ ॥

म्हणून त्याचा बेत पूर्णपणें हाणून पाडून, धर्माचें आणि नीतीचें राज्य प्रस्थापित केलेंच पाहिजे.

**कैकेयीः**——तुझा हा सल्ला अत्यन्त योग्य आहे ! पण कोणत्या उपायानें रामचंद्राला सिंहासनावरून दूर करून, त्या जागीं भरताची स्थपना करतां येईल ? काय केलें असतां कौसल्येचा वरचढपणा जाऊन, त्या जागीं माझें महत्व प्रस्थापित होईल ? मंथरे ! माझी आई लहानपणींच स्वर्गीं गेली, आणि आपलें दूध पाजून तूंच माझें पालनपोषण केलेंस म्हणून माता या नात्यानेंच मी तुझ्याकडे पाहात आलें आहे. विवाह होऊन मी जरी अन्य राजघराण्यांत गेलें, तरी माझ्यावरील प्रेमामुळें तूं मला यत्किंचितही विसंबली नाहींस. तूं जरी जातीनें अनार्य असलीस, तरी तुझ्या अंगांतील अमोलिक सद्गुण अतुलनीय आहेत. माझ्या भरतास अनार्यांवर स्वजातिप्रमाणें प्रेम करण्यास तूंच शिकविलेंस. माझें हित तेंच आपलें याच भावनेनें तूं आजपर्यंत वागत आलीस. आजहि ह्या प्रसंगांतून तूंच माझें रक्षण कर. रामाला दूर सारून भरताला सिंहासनावर बसविण्याचा उत्तम उपाय

दाखवून दे आणि मला राजपत्नीप्रमाणें राजमातेच्या पदावर अधिष्ठित कर पाहूं.

२७. पद (चालः—करुणा करि जाइ०)

विभवपदिं नेई मला बाई । विसरुनि भारी दोषाचे
माझा । प्रकटिं सकल सुमती तीही ॥ध्रु०॥ वितर
भूवनीं सोज्वल आतां । विजय, विमोह लया
नेई ॥ १ ॥

उत्कर्षाची, वैभवाची आणि सन्मानाची इच्छा प्रत्येकाला जन्मतःच असते. मी त्या नियमाला काय म्हणून अपवाद असणार ? माझ्या पुत्राचें सिंहासन मी कोणालाहि हिराऊं देणार नाहीं. मग तो हिरावणारा वसिष्ठ असो किंवा प्रत्यक्ष विष्णु असो.

**मंथरा:**—कैकेयी तूं सुज्ञ आहेस, शहाणी आहेस आणि सुविचारी आहेस. नरन्याचें मन कोणत्या उपायानें ताब्यांत ठेवावें, ही कला तुला चांगली अवगत आहे. ज्या सौंदर्यानें राजाला तूं आपल्या अंकित केलें आहेस, त्याच सौंदर्याच्या प्रभावानें तूं आज त्याला चीत कर. तो स्त्रीलंपट राजा तुझ्या हट्टाबाहेर जाणें सहसा शक्य नाहीं. तुझ्या व.पास दिलेल्या वचनाची त्याला जाणीव करून दे, सत्यभ्रष्ट म्हणून त्याचा उपहास कर आणि निर्भत्सनेच्या वेदनेनें त्याला आत्मभ्रष्ट कर.

२८. पद ( चालः—बहु आपल्या सहवासीं० )

धरि चतुरे नृपराया त्या कामांगणीं । मदन भावना
उपजवि प्रेमें । विकल करित परभारें त्या गे
धमनी ॥ १ ॥ मस्तवाल नर दचकत पाहीं । लाथ
विकल शिरिं हाणीतां नव ललनीं ॥२॥

या उपायानें राजा खचित ताळ्यावर येईल; पण इतक्याहि उप्पर जर त्यानें आपलाच हेका चालविला तर दैत्यांबरोबर झालेल्या युद्धांत रथाचा

आंस सांवरून धरल्यामुळें त्यानें तुला दिलेल्या वरांचें त्याला स्मरण दे. तूं स्त्री आहेस. स्त्रियांच्या अंगांत जन्मापासून पांडित्य वास करितें, असा अनुभव आहे; म्हणून कांहींही कर आणि भरताचें सिंहासन भरताला मिळवून दे.

कैकेयीः—मंथरे ! बरी आठवण केलस. देवांचें साह्य साधण्याकरितां युद्धास जाणें झालें होतें, त्यावेळीं मी महत्वाची मदत केल्यामुळें दोन वर दिलेले तसेच बाकी आहेत. निर्वाणीचें शस्त्र म्हणून राजाला त्या वरांची आठवण देणें माझें कर्तव्य आहे. तें कर्तव्य योग्य कालीं मी बजावीन याबद्दल संशय नको !

मंथराः—तूं कर्तव्यशील कामिनी नाहींस,असा मला कधींच संशय आला नव्हता ! पुत्राचें प्रिय करणें, त्याला वैभव मिळवून देणें हें आज तुझें कर्तव्य आहे, ह्याची जाणीव तुला करून देण्याकरितां मी आलें होतें. भरताची भावी भवितव्यता काय आहे, ह्याचा कयास कोणी बांधावा ? पण पुढेंमागें आपण कर्तव्यास चुकलों हा पश्चात्ताप होऊं नये, म्हणून वेळींच खबरदारी घेणें योग्य आहे.

कैकेयीः—भरताची माता भरताला कशी बरें विसंबेल ? जिनें त्याला नऊ मास उदरांत वाहिलें, लहानपणीं प्राणापलीकडे त्याचें जतन केलें, तिला त्याची काळजी ही असणारच !

मंथराः—म्हणूनच मला एवढा वेळ कंठशोष करावा लागल वाटतें ? रामाला राज्याभिषेक होणार हें वर्तमान घोषित होऊन एक दिवस निघून गेला, तरी तूं त्याबद्दल कांहींच हालचाल केली नाहींस ती ?

कैकेयीः—मी अबला माणूस ! कोणत्या उपायानें हा समारम्भ थांबवावा, याची जाणीव न झाल्यानें स्वस्थ बसण्याशिवाय गत्यन्तर राहिलें नाहीं. रामाला राज्याभिषेक होतांच कौसल्या राजमाता म्हणून आपला वरचष्मा मिरवणार ! तें दृश्य मला कसें सहन होईल ? सवतीचा मत्सर

किती प्रखर असतो, ह्याची तुला अजून कल्पना नाहीं ! स्त्रियांना कोणाचाहि उत्कर्ष सहन होईल; पण सवतीचा सहन होणार नाहीं ! सवतीच्या उत्कर्षानें बायकांचीं अंतःकरणें सारखीं जळत असतात.

मंथराः–बरें, जातें मी आतां ! वसिष्ठाच्या कारस्थानाचा मनोरा सपशेल ढांसळून टाक म्हणजे झालें ?

कैकेयीः–त्याची तुला काळजी नको. जीवाच्या जोखमीनें मी तें कार्य तडीस नेतें. ( मंथरा जाते. ) वसिष्ठा ! कारस्थानें चालवून कैकयीनें आजवर मनांत बाळगलेलें ध्येय विलयास नेण्याचा घाट घातला आहेस काय ? या कैकेयीशीं गांठ आहे ! पित्याला राजानें दिलेल्या वचनाची मला माहिती नव्हती, आणि मला दिलेल्या वरांची आठवण नव्हती ! हीं तीन जाज्वल्य शस्त्रें आतां माझ्या हातांत असतां, वसिष्ठाची दरकार मी कां करावी ? राजाची पर्वा मी कां बाळगावी ? लोकनिंदेला मी कां भ्यावें ? नाहीं ! नाहीं ! मला कोणाची दरकार, भीति किंवा पर्वा नाहीं! भरताला राज्य मिळवून देणें, हेंच एक आतां माझें साध्य आहे.

( पडदा पडतो. )

## प्रवेश तिसरा.

( सीता एकटीच प्रवेश करिते. )

सीताः—(स्वगत) आनंदाच्या अतिरेकानें अंतःकरण भरून जाऊन, माझी वृत्ति बेभान बनत चालली आहे! जिचें भाग्य माझ्याहून वरचढ आहे, अशी एक तरी युवति अवनीतलावर विद्यमान आहे काय ? श्रीरामचंद्राच्या सुखद व प्रेममय सहवासांत माझ्या सुखाच्या सागराला असामान्य भरती येत चालली आहे ! श्रीरामचंद्रापेक्षां श्रेष्ठ असा जगांत एक तरी पुरुष निपजला आहे काय ? श्रीरामचंद्रापेक्षां प्रेममय अशी एक तरी मूर्ति जगांत निर्माण झाली आहे काय ? नाहीं ! नाहीं ! श्रीरामाचें अलौकिक शौर्य, श्रीरामाचें असामान्य चातुर्य, श्रीरामाचें निस्सीम पत्निप्रेम ह्या गुणांची सर

कोणालाहि येणें शक्य नाहीं. अशा पुरुषाच्या सान्निध्यांत कोणाचा एक दिवस व्यतीत झाला, तर त्याच्या जीवनाचें सोनें झालें. मग जन्मभर त्याच्या अर्धांगीपणाचें दिव्य भाग्य जिला लाभलें, तिच्या सुखाला पारावार आहे काय ? ब्रह्मानन्दसुखाचा पूर्ण अनुभव जर कोठें पहावयास मिळत असेल, तर तो श्रीरामाच्या सहवासांतच होय.

२९. पद ( चालः–शशि सूर्यप्रभा० )

नरदेव खरा, भुवनाची । कांती ही, शांति मनांत-
रिंची ॥ध्रु०॥ करिं चाप शरां घेत नरवरां शासाया
समरीं हाची ॥१॥

साहस, शौर्य, पराक्रम, पौरुष, पांडित्य इत्यादि श्रेष्ठ गुणांत श्रीरामाचें असामान्य नैपुण्य पाहून त्यांच्या पत्नीच्या देहावर उत्साहाच्या ऊर्मी कां उसळणार नाहींत ? अभिमानानें तिचें मस्तक उन्नत कां होणार नाहीं ? आनंदानें तिचें अंतःकरण कां भरून जाणार नाहीं? श्रीरामाचें कमलवदन, श्रीरामाचे राजीव लोचन अखंड पाहात राहिलें, तरी मनाची तृप्ति म्हणून होत नाहीं, अंतःकरण शांत म्हणून होत नाहीं; पण जों जों त्या मुखाकडे अवलोकन करावें तों तों नेत्रांची तृषा जास्तच वाढत जाते, हृदयाची उत्कंठा परमावधीस पोहोंचते आणि समाधीसुखाचा आस्वाद मनमुराद चाखावयास सांपडतो.

३०. पद (चालः–वैरि मारायाला० )

देत आल्हादाला । हा विश्वाला ॥ ध्रु० ॥ शांती-
संसाराला प्रेमला,मोहिलें श्रेष्ठ नव गुणें कांतेला॥१॥

देवा ! जन्मोजन्मी ह्याच परमपदाची प्राप्ति होऊन हाच ठेवा मला लाभूं दे ! (रामचंद्र पाठीमागें प्रवेश करितो. )

रामः—( एकीकडे ) सूर्याच्या उदयानें कमलें प्रसन्न होतात आणि चन्द्राच्या आगमनानें कमलांना तजेला चढतो; पण निरंतर प्रसन्न असें जर

कोणतें कुसुम असेल तर तें सीतेचें वदनसुमनच होय! परमावधीची काळजी, कमालीची चिंता आणि पराकाष्ठेचा मनस्ताप सीतेच्या मुखकमलावर नजर जातांच नाहींसा होतो. रमणीय रूप, कमनीय केश आणि विशाल वक्षःस्थल यांचा हा संगम किती बहारीचा आहे! (उघड) सीते! अपूर्व आनंदानें अंतःकरणांत पतीशिवाय कोणाचें ध्यान चालविलें आहेस?

सीताः—पतिव्रतेच्या अंतःकरणांत पतीशिवाय कोणाचें ध्यान चालू असणार? पति हाच पतिव्रतेचा परमेश्वर असतो. सति स्त्रिया जीवनांतील सर्वकाळ त्याच्याच चिंतनांत घालवीत असतात. बसावें गडे! राजकारणाच्या दगदगीनें आणि सैनिकांच्या शिक्षणानें शरीर श्रांत झालें असेल! ( राम बसतो. सीता त्याला पंख्यानें वारा घालते. ) आज राजसभेंत महत्वाचें वृत्त काय आहे? शत्रुघ्नाच्या सेनापतित्वाखालीं शंबरासुरावर केलेल्या मोहिमेची काय वार्ता आहे? त्यानें संधीचें बोलणें लाविलें, त्याचा स्वीकार केला काय? आजची लोकसंमत परिषद् त्याच कारणाकरितां भरविण्यांत आली होती वाटतें?

रामः—एकदम किती तरी प्रश्नांचा मारा करतेस? बायकांची जात अधीर म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं! पण प्रथम तो पंखा बंद कर पाहूं! असा वारा घालीत प्रहरान प्रहर तिष्ठत राहून शरिराला किती श्रम देणार?

सीताः—(हंसत) मला नाहीं श्रम वाटत! उलट मला यांत आनंदच वाटत आहे! आपल्या सेवेंत कोणाला आनंद वाटणार नाहीं! पतीची सेवा हेंच स्त्री-जीवनाचें ध्येय आहे! पतिसेवेंत अपूर्व काय आहे?

रामः—अपूर्व कांहीं नाहीं; पण स्त्रीनेंच पतीची सेवा करणें मला पसंत नाहीं. प्रेम हें उभयान्वयी असलें पाहिजे. पतीच्या सुखाकरितां स्त्रीचा जन्म आहे आणि पतीनें मात्र तिच्या सुखाची कांहींच पर्वा न करितां

तिच्याकडून पाहिजे तशी सेवा घ्यावी, हें आर्यांचें ध्येय कधींच नव्हतें आणि नाहीं. कर बंद पाहूं तुझा तो पंखा.

सीताः—आपण आर्यश्रेष्ठ आहांत यांत संशय नाहीं. मला जर त्यांत आनन्द वाटतो, तर आपला तरी इतका आग्रह कां ?

रामः—तुला आनन्द वाटेल; पण मला आनन्द वाटला पाहिजे ना ? तुझ्याकडून कष्ट करून घेण्यांत मला अत्यन्त दुःख होतें. 'पतीचें सुख तेंच माझें सुख' असें नेहेमीं म्हणतेस. मग मला ज्या कृतीनें दुःख होतें, ती कृति करण्याचा तुझा एवढा हट्ट कां ?

सीताः—भलतेंच कांहीं तरी ! वारा घालण्यानें कोणाला दुःख झालें आहे काय ?

रामः—वारा घालण्यानें दुःख कसें होईल ? ( तिला जवळ ओढून ) पांडित्यांत तुझ्यापुढें कोणाचा पाड लागणार ?

सीताः—बरें ! पण सांगायचें गडे ! आज ही लोकसंमत परिषद मुद्दाम कां भरविली होती ? संधिपत्राचा मसुदा झाला कीं नाहीं ? काय काय अटी ठरल्या ?

रामः—अजून अटी अशा कांहीं ठरल्या नाहींत ! शंबरासुराचा वकील आजच येऊन पोहोंचला आहे. प्रथम मंत्रिमंडळाशीं त्याची वाटघाट होऊन मग पक्का मसुदा लोकसभेच्या संमतिकरितां मांडण्यांत येईल. त्याला आठ-पंधरा दिवस अवकाश आहे.

सीताः—मग आज परिषद भरण्याचें कारण काय ? परिषदेचा एवढा खटाटोप कां करण्यांत आला ?

रामः—परिषदेचें कारण निराळेंच होतें. आम्हां चारबंधूंपैकीं अयोध्येच्या युवराजपदावर कोणाची स्थापना करावी, ह्याचा विचार करण्याकरितां ती परिषद भरविण्यांत आली होती.

सीताः-( उत्सुकतेनें ) मग त्यांत काय ठरलें ? बहुमतानें आपलीच निवड झाली असेल.

रामः—नाहीं ! भरताची निवडणूक झाली. बहुमतानें त्यालाच युवराज म्हणून पसंत केलें.

सीताः—( खिन्नतेनें ) आपण जेष्ठ पुत्र असतां युवराजपदाचा हा आपला हक्क प्रजेनें पायांखालीं कां तुडवावा ?

रामः—कां बरें! भरताच्या उत्कर्षानें तुला वाईट वाटल्यासारखें दिसतें. बायकांचा स्वभाव मत्सरी म्हणतात तो असा !

सीताः—भावोजींच्या उत्कर्षानें मला काय म्हणून वाईट वाटेल ?

रामः—मग तूं एवढी कष्टी कां झालीस ? तुझा चेहरा सुकून कां गेला.

सीताः—आपला हक्क पायांखालीं तुडविण्यांत आला म्हणून ! आपणाला त्याचें कांहींच वाटत नाहीं काय ?

रामः—मला वाईट कां वाटावें ? सिंहासन अयोध्येच्या लोकांचें आहे ! त्यांनीं भरताला निवडलें, यांत त्यांचा शहाणपणाच दिसून येतो. शांति, क्षमा, गांभिर्य, दया या गुणांनीं युक्त असा भरतासारखा कोणता पुरुष आज विद्यमान आहे ?

सीताः—आपण ज्येष्ठ पुत्र आहांत. जेष्ठ पुत्रच सिंहासनाचा अधिकारी आहे, अशी शास्त्राज्ञा आहे. ही धर्मशास्त्राची आज्ञा अयोध्येच्या नागरिकांनीं धाब्यावर कां बसविली ? आपणांसारखा सकलगुणसम्पन्न पुरुष त्यांना अनधिकारी कां वाटला ?

रामः-सीते ! माझी आई कौसलदेशासारख्या लहानशा संस्थानिकाची कन्या होती आणि भरताची आई कैकयदेशासारख्या अवाढव्य आणि सन्माननीय देशाची राजकन्या होती. यामुळें पट्टराणीपदाचा मान अयोध्येच्या राजघराण्यांत आजपर्यंत कैकेयीकडेच चालत आहे असें असल्यानें

साहजीकच तिच्या पुत्राची युवराजपदावर निवडणूक झाली. यांत नागरिकांनीं वावगें तें काय केलें ?

सीताः—आपण शांतीचे समुद्र आहांत आणि भरतावर आपलें तसेंच प्रेम आहे, यामुळें आपणाला तो अन्याय वाटत नाहीं; पण जगाच्या दृष्टीनें तो अन्यायच होईल. भावोजी शांतिचेसागर आहेत, दयाळुअंतःकरणाचे आहेत, प्रजेवर त्यांचें अत्यंत प्रेम आहे; परंतु राजाच्या अंगीं आवश्यक असणारे दृढनिश्चय, चिकाटी, खंबीरपणा इत्यादि गुण त्यांच्या अंगांत मुळींच नाहींत.

रामः—राणी म्हणून मिरवण्याची तुझी हौस मनांतल्या मनांत जिरल्यामुळें तुझें मन बरेंच खट्टू झालें आहे, असें वाटतें, नाहीं तर भरताची निवडणूक तुला कां पसंत पडली नसती ?

सीताः—मी मत्सरी आहें, असेंच आपलें अप्रत्यक्ष म्हणणें ना ?

रामः—मत्सरी नाही तर काय ? बायकांच्या मत्सरामुळेंच घरांत भाऊबंदकीचा प्रवेश होत असतो !

सीताः—( रडकुंडीस येऊन ) नाथ ! हीच कां माझी योग्यता आपणास दिसून आली. पतीकडून अवहेलना झालेल्या युवतीनें जगण्यांत तरी काय भूषण ? ( रडूं लागते. )

रामः—( तिचे अश्रु पुसून ) वेडी कुठली ! थट्टाहि समजत नाहीं ! परिषदेंत भरताची निवडणूक न होतां युवराजपदावर माझीच निवडणूक झाली आहे आणि यौवराज्याभिषेकोत्सव फार दूर नसून परवांच त्या समारंभाला मुहूर्त निश्चित केला आहे. त्या समारम्भांत कसें मिरवावें, कोणते दागिने घालावे, कोणता शालू नेसावा, ह्या विचारास आतांपासूनच लाग पाहूं.

सीताः—( सहर्ष ) खरेंच कां हें ? कां ही सारी थट्टाच चालविली आहे ? थट्टाच आहे खास ! नाहीं तर इतक्या लवकर समारम्भाची

सिद्धता कशी होईल ? देशोदेशींच्या राजांस आमंत्रणें कशीं पाठवितां येतील ? शहर शृंगारण्याची तयारी कशी होईल ? चारहि समुद्र आणि गंगानदी यांचें पवित्र उदक कसें मिळेल ?

रामः—त्या सर्वांची सिद्धता करूनच यौवराज्याभिषेकाची योजना केली आहे.

सीताः—मला नाहीं हें खरें वाटत ! माझ्या गळ्या शपथ घ्या पाहूं.

रामः गळ्याची शपथ हें निर्वाणीचें सत्य वाटतें मग माझ्या शब्दां-वर तुझा भरंवसा नाहीं तर ?

सीताः—भरंवसा नसायला काय झालें ? पण आपले थट्टेचे शब्द कोणते आणि गंभीरतेचे शब्द कोणते, हें ओळखण्यास एखाद्या ध्वनिदर्शक यंत्राची तरी योजना केली पाहिजे माणसानें.

रामः—तुझ्या गळ्यावर हात ठेवला कीं, त्या यंत्राची उत्पत्ति होणार वाटतें शपथ ही एक बायकांची अडाणी भावना आहे. पुरुष कधीं शपथ वाहात नसतात. आमचा शब्द हीच आमची शपथ. राम एकवचनी आहे हें तुला ठाऊक नाहीं वाटतें ?

सीताः—मग बहुवचनी म्हटलें कोणी ? एक पुरुष बहुवचनी होणें शक्यच नाहीं ?

रामः—मी तुला व्याकरण शिकविण्यास बसलेलों नाहीं किंवा साहित्य-शास्त्रांतील गूढ प्रमेयेंहि शिकवीत नाहीं.

सीताः—मग एवढा वेळ थट्टा चालविण्याचें कारण काय ?

रामः—तुझें मन पाहात होतों. उदार हृदयाच्या कसोटीवर उतरल्या तर त्या बायका कसल्या ?

सीताः—बायकांविषयीं आपलें मत बऱ्याच उच्च दर्जाचें आहे म्हणावयाचें ?

रामः—कां असणार नाहीं ? आर्य स्त्रियांच्या आदर्श म्हणून समजण्यांत येणाऱ्या सीतादेवीची जर ही गोष्ट तर अन्य स्त्रियांची स्थिति विचाराव-

यालाच नको! कोळशांत मणि आणि स्त्रियांत गुणी म्हणून सांपडणेंच शक्य नाहीं.

सीताः—होय! म्हणूनच पुरुष अनेक बायका करून आपल्या गुणांचा त्यांच्यावर प्रकाश पाडीत असतात.

रामः—तुझा हा टोमणा इतर पुरुषांना लागूं होईल; पण मला त्याचें काय? एकपत्नि व्रत म्हणून त्याला अपवाद आहे.

सीताः—अपवादानें नियमाला बाध येत नाहीं, उलट त्याला बळकटी येते. तुम्हीं अपवाद असलां तरी सारेच पुरुष कांहीं तुमच्यासारखे नाहींत. हीनपणा करून जगांत हंसें करून घेणें, यांत पुरुषच सरस ठरतील!

रामः—हें बायकांपुरुषांचें भांडण जगाच्या अंतापर्यंत संपावयाचें नाहीं. आतां या समारंभांत मिरवण्याकरितां तूं कोणते दागिनें अंगावर घालणार, कोणते शालू नेसणार, कशा तऱ्हेचा शृंगार करणार तें तरी कळूं द्या. बायकांना दागिन्यांची फार आवड आणि त्यांतल्या त्यांत राणी म्हणून मिरवायचें! दागिन्यांनीं नुसतें फुलून निघालें पाहिजे! अयोध्येच्या राजघराण्याच्या वैभवांत कांहीं कमतरता पडतां कामा नये.

सीताः—बायका हें वैभवाचें प्रदर्शन करण्याचें साधन नाहीं! आपल्या घराण्याचें वैभव लोकांना दाखवून दिपवून टाकावयाचें असेल तर अभिषेक मंडपाच्या आवारांत तुम्हीं एक प्रदर्शन भरवा म्हणजे झालें!

रामः—पण बायकांची मनिषा तृप्त होऊन फुकट प्रदर्शन होत असेल तर तें कां न करा? बायकांचें शहाणपण चुलीपुरतें आणि बायकांची विद्या दागिने घालण्यापुरती अशी म्हणच आहे!

सीताः—सर्वच बायका कांहीं तशा नसतात!

रामः—भार्गवरामाच्या शिव धनुष्याचें खेळणें केलें म्हणून तुला थोडा गर्व झाला आहे, बाकी भार्गवरामाचें धनुष्य हा केवळ भीतीचा बागुल-बोवा होता!

सीता:—बोलले म्हणजे राम येणार आणि उंदराला मारलें की, गणेशाची संभावना होणार! पण त्या धनुष्याच्याच धाकानें अनेक क्षत्रिय वीरांनीं समरांगणांतून पळ काढून पलायन केलें होतें. फार दूरचें कशाला? प्रत्यक्ष—

राम:—प्रत्यक्ष काय? माझा पिताच स्त्रीवेषानें राणीवशांत जाऊन दडला होता, असेंच ना म्हणणार तूं?

सीता:—मी तें कशाला म्हणूं? जगच तसें बोलत आहे!

राम:—आणि तें खरेंहि आहे; पण त्यांत मला कांहीं मानहानी दिसत नाहीं. प्रबलांशीं गांठ पडतांच त्या वेळेपुरतें मुत्सद्देगिरीनें आपलें संरक्षण करणें हें राजनीतीचें आद्य तत्वच आहे.

सीता:—पण तें क्षत्रियाच्या ब्रीदाला फारसें धरून नाहीं. रणांगणांत पाठ दाखविणें हा क्षत्रियवीराचा धर्म नव्हे!

राम:—आम्हां आर्य क्षत्रियांचें चुकतें तें इथेंच. कोत्या समजुती उराशीं बाळगून आम्हीं आपसांत लढावें आणि मरून जावें. या धोरणामुळेंच अनार्यांना उत्तेजन येऊन त्यांनीं आतांशा डोकें बरेंच वर काढलें आहे. माझ्या पित्यानें मुत्सद्दगिरीनें त्या वेळीं क्षत्रियांचें जर संरक्षण केलें नसतें, तर आजला आर्यावर्त अनार्यावर्त झाला असता. ब्राम्हण आणि क्षत्रिय, एकाच समाजपुरुषाचे दोन अवयव! त्यांनीं आपसांत लढावें आणि परकी अनार्यांच्या धामधुमीस वाव द्यावा, यांत शहाणपणा कसला?

सीता:—अनार्य झाले तरी ते मानवच ना? आम्हांला ते परकी कसे? आर्यांच्या प्रमाणें त्यांच्या अंगांत रक्त खेळत आहे, आर्यांप्रमाणेंच त्यांना सुखदु:खाच्या भावना होतात, आर्यांप्रमाणेंच त्यांच्या देहाची आकृती आहे, मग त्यांचीच अस्पृश्य समजून हेटाळणी कां करण्यांत येते?

राम:—त्यांची संस्कृति, भाषा, आचार विचार आणि वर्ण भिन्न असल्यामुळें साहजीकच ते आम्हांला परकी वाटतात, आपले कोण आणि

परकी कोण हा विचार अत्यन्त सूक्ष्म आहे. त्याचें सांगोपांग ज्ञान व्हावयास पुष्कळच अध्ययन झालें पाहिजे. बायकांना तें सांगून काय फायदा ?

सीता:—आर्यसंस्कृति स्वीकारलेले, संस्कृत भाषा बोलणारे, सुसंस्कृत आचारविचारांचे आणि गौर वर्णाचे अनार्य नाहींत काय ? त्यांनाहि हीन समजण्यांत कां येतें ? दास्यवृत्तिपासून त्यांची उन्नति कां होत नाहीं ?

राम:—सीते ! मला या सर्व गोष्टी समजत नाहींत, अशी कां तुझी समजूत आहे ? मला आर्यांनीं चालविलेला तो अन्याय ढळढळीत दिसून येत आहे! पण लोकाराधनेकरितां मी हा मार्ग पत्करला आहे. सुधारणा ही लोकांनाच बरोबर घेऊन केली पाहिजे. त्याशिवाय ती चिरस्थायी होत नसते. " स्नेहं दया च धर्मं च यदि वा जानकी मपि । आराधनाय लोकस्य मूंचतो नास्ति मे व्यथा ॥ " हेंच माझें तत्त्व आहे.

सीता:—मग तुम्ही लोकाराधनेकरितां मलाहि टाकून देणार वाटतें ? मग आजपासूनच सावधगिरी बाळगली पाहिजे. नाहींतर एखादे दिवशीं पटकन् मला रानावनांत जाण्याची पाळी यावयाची ! ( रडूं लागते. )

राम:—फाजील संशयी स्वभाव तुझा ! प्रेमाच्या अतिरेकाचें चिन्ह म्हणून मी तुझा नामनिर्देश केला, त्याबद्दल मनाला काय लावून घेतेस, पाहिजे तर मी तुझी क्षमा मागतों.

सीता:—मनुष्य लोकाराधनेच्या व्यसनास लागला म्हणजे त्याच्या हातून काय पाप घडेल याचा नेम नाहीं. लोकप्रीति ही एक मादक मदिरा आहे.

---

३१. पद (चाल:—नाचत ना गगनांत०)

डोलत जी हृदयांत । नाथा । प्रीतीची नव ज्योत ।
मादक माया । होमित काया । निशिदिनिं मानस
शांत । मोही सकलां । दाही अबलां । साधित
लोक विघात ॥ १ ॥

आपलें सहजगत्या उच्चारलेलें वचन मला तर भावी संकटाचेंच द्योतक वाटतें.

रामः—बायकांचा स्वभावच हा असा ! उगीच कांहीं तोंडांतून शब्द बाहेर पडला, तर घरली अढी मनांत. सीते ! मी तुझा त्याग करणें म्हणजे माझ्या प्राणाचाच त्याग करण्यासारखें आहे. अग्निब्राम्हणांस साक्षी ठेऊन ज्या वेळी मी तुझें पाणिग्रहण केलें, त्याच वेळीं माझ्या सुखदुःखाची तूं वांटेकरीण झालीस !

३२. पद ( चालः—विमल अधर निकटिं० )

अनल भुसुर निकट हस्त हा केला । ग्रहण भुवन
रत्न मोल ॥ध्रु०॥ दयिता दीप्ती दीपक पाहीं पुरुष
खरा, नृत वचन सकल ॥१॥

असले उद्वीग्नतेचे विचार सोडून दे आणि परवांच्या समारम्भाच्या तयारीस लाग पाहूं. आनंदाच्या, उत्कंठेच्या वेळीं मनाला एक प्रकारची हुरहुर लागून राहिलेली असते. ह्या आनन्दाच्या साम्राज्यांत एकप्रकारची उदासीनता दडून बसलेली असते. हा आनन्दाचा काळ संपून दुःखाचा समय तर येणार नाहीं ना ह्यासम्बधीं लागलेली ती काळजीच होय ! जा ! आनंदितमनानें उत्सवाच्या तयारीस लाग पाहूं ( सीता जाते. एक दासी प्रवेश करिते. )

दासीः—वसिष्ट गुरुमहाराजांकडून पत्र घेऊन एक बटु राजवाड्याच्या महाद्वाराशीं आला आहे आणि त्यानें हें पत्र दिलें आहे व तो उत्तराची अपेक्षा करीत आहे. ( पत्र घेतो व वाचतो. ) जा.

रामः—जा, त्याला सांग कीं, सायंकाळीं मी गुरुमहाराजांच्या दर्शनास येतों ( दासी जाते. ) गुरुमहाराजांची माझ्यावर काय ही प्रीति ! शिष्याच्या कल्यणाकरितां झटणारा गुरु, जनतेच्या कल्याणाकरितां झटणारा

राजा आणि अर्भकांच्या कल्याणाकरितां झटणारी माता हीं एकाच प्रेमाचीं अनेक दृश्यें आहेत. सुवर्ण जरी एकच असलें तरी अलंकाराप्रमाणें त्याचे भिन्न भिन्न आकार होतात. त्याचप्रमाणें निस्सीम प्रेमाचे हे निरनिराळे प्रकार आहेत. प्रीति ही परस्परावलंबी आहे. माझें जें अयोध्येच्या प्रजाजनांवर निस्सीम प्रेम आहे, तिचें द्योतक म्हणून आज तिनें मला राजा निवडलें आहे. राजा हा प्रजेचा नियंता आहे. प्रजेच्या उन्नतीचीं सूत्रें जशीं त्याच्या हातीं असतात, तशींच तिच्या अवनतीचीं सूत्रेंहि त्याच्याच हातीं असतात. अग्नि हा जसा उपयोग करणाराच्या बुद्धिप्रमाणें त्यास फलें देतो त्याचप्रमाणें राजाच्या अधिकाराचीं फलेंहि उपयोग करणाराच्या बुद्धिप्रमाणें मिळतात. राजा हा राष्ट्राचा स्वार्थशून्य स्वामी आहे.

३३. पद (चालः—दासपणें जगतांत मिरवणें०)

स्वार्थपरें नच राज पदवितें। लोभित निशिदिनिं
असणें गमतें ॥ध्रु०॥ सिंहासन उज्ज्वलता पर्वत।
हुतात्माचि नर या वरि स्वमतें ॥ १ ॥ हूतांशन
दाहकता जाळित। नगाघात मनुजा शिरिं,दिसतें॥२॥

लोकसेवा हेंच त्याचें ध्येय, जनतेची उन्नति हेंच त्याचें साध्य आणि राष्ट्रोत्कर्ष हेंच त्याचें अंतिम कार्य. या साध्याच्या आड, या ध्येयाच्या आड, या कार्याच्या आड स्नेह, दया, धर्म किंवा नीति हीं आणतां कामा नयेत. राष्ट्रोत्कर्ष कसा साधेल हीच त्याच्या कार्याची कसोटी! मग तें कृत्य आत्मनाशक असो, कुलनाशक असो, आप्तनाशक असो किंवा स्त्री–पुत्रांचाही नाश करणारें असो! कर्तव्याच्या जबाबदारीनें त्यानें तें पार पाडलें पाहिजे. पुण्याच्या पवित्रतेनें त्यानें तें तडीस नेलें पाहिजे, सत्याच्या प्रीतीनें त्यानें तें हातीं घेतलें पाहिजे आणि नीतीच्या आकांक्षेनें त्याचा आपल्या ध्येयांत समावेश केला पाहिजे. लोकसेवा! जनता हाच या जगांतील

जनार्दन आहे! ह्या जनार्दनाची सेवा करणारांचें जिणें धन्य होय! असल्याच पुण्यपावन नररत्नामुळेंच धरणीला स्वर्गाचें स्वरूप प्राप्त होतें.

३४. पद (चालः—पद कुवलयिं या विमला०)

जनसुखरत जो दिसला। प्रभुच्या तुलनेला। नमन
झणिं। त्या स्वमनीं। विमल कार्य कर्त्याला॥ध्रु०॥
राम नित्य त्यास नमी। वदत सुगुण नव नामीं।
स्मरत सदां बहु सुखदा पदकमलां॥१॥

[ पडदा पडतो ]

## अंक तिसरा समाप्त.



संगीत

# स्वार्थत्याग

## अंक चवथा.

### प्रवेश पहिला.

( वासिष्ठ ध्यानस्थ बसला आहे, असा पडदा उघडतो. )

वासिष्ठ:—( स्वगत ) आज माझ्या मनाला कितीतरी शांति वाटत आहे. हा शरयुतीरावरील माझा नेहमींचाच आश्रम पण येथील निसर्गशोभा आज नवोनव वैभवानें नटली आहे कीं काय, असें वाटलें ! सायंकाळच्या या रमणीय वेळीं अस्तास जाणाऱ्या सूर्याची शोभा किती तरी आनंदकारक दिसत आहे ! पाश्चिम दिग्वधू लज्जेच्या आरक्त वदनानें आपल्या प्रिय पतीचें स्वागत करण्यांत मग्न होऊन गेली आहे. दिग्वधूची ही रमणीय लिला पहाण्यांत सकल विश्व रंगून गेलें आहे आणि शांतपणें त्या आनंदांत तल्लीन होऊन भान विसरल्यासारखी त्याची स्थिति झाली आहे.

३५. पद ( चालः--एकला नयनाला० )

एकला जगताला । भुषण हा झाला ॥ ध्रु० ॥
सकलिक जनता सुखवी सविता आतितर विजयी
गमला । अभिनव भुवनीं म्हणुनी तरणी । सह-
जचि महति चढला ॥१॥

माझ्या मनाला अपूर्व शांति वाटण्याला तसेंच दृढतर कारण आहे.रामचंद्राला

राज्याभिषेक करवून घेण्याकरितां मी ज्या ज्या क्लृप्त्या योजल्या, ज्या ज्या युक्त्या केल्या त्या त्या क्लृप्त्या आणि युक्त्या निर्विघ्नपणें पार पडल्या आहेत. प्रथम राजा दशरथाचें भोळें मन सत्यापासून परावृत्त करणेंच मला अत्यंत कठीण वाटत होतें. त्याची भरतावरील प्रीति, त्याचें कैकेयीवरील प्रेम आणि त्याच्या मनाचा कमकुवतपणा लक्षांत घेतां ही गोष्ट साध्य होईल असें मला वाटलें नव्हतें; परंतु मोठ्या चातुर्यानें, अपूर्व वक्तृत्वानें आणि कमालीच्या कावेबाजपणानें मी ती गोष्ट घडवून आणिली. त्यानंतर जनतेचें मत मिळविणें हें कार्य तर अत्यंत दुष्कर होतें. भरतालाच नंदिग्रामास पाठविलें असतां जनतेला विनाकारण संशय येईल म्हणून शंबरासुरावरील मोहीम उकरून काढून मी शत्रुघ्नाला त्रिपुरास पाठविलें. इतक्यानेंहि माझें कार्य झालें नसतें. त्याकरितां राजाच्या स्वप्नाची स्वकपोलकल्पित कथा निर्माण करावी लागली. हा बाण मात्र भोळ्या प्रजेच्या समाधानाकरितां अचूक लागू पडला. एकाच दंतकथेनें माझें कार्य झालें आणि रामाच्या राज्याभिषेकाकरितां अयोध्येच्या प्रजेनें एकमतानें संमति दिली. अहाहा ! रामाला राज्याभिषेक करून एका आदर्श नृपतीची आर्यावर्ताला जोड करून देणें, हें माझ्या जीवनाचें ध्येय होतें आणि तें ध्येय तडीस जाण्याच्या बेतांत आलें आहे. ह्या ध्येयपूर्तीकरितां मी असत्यानें आचरण केलें, नीतीचा त्याग केला, जनसमाजाची वंचना केली आणि अधर्माला प्रोत्साहन दिलें; पण मी हें सर्व कशाकरितां केलें ? तर मी ज्या राष्ट्रांत जन्मास आलों, त्या राष्ट्राचा उत्कर्ष साधण्याकरितां केलें ! राष्ट्रोत्कर्ष हेंच पुण्य इतकें मोठें आहे कीं, त्या पुण्याच्या पावन अग्नींत कोणत्याहि प्रकारचीं पापें भस्म झाल्याशिवाय राहात नाहींत.

२६. पद ( चालः--रूपबली तो नर शार्दूल० )

राष्ट्रसुखीं जो रत मानव झाला । कधीं शिवे नच
तिळ पाप तयाला ॥ ध्रु० ॥ पुण्यें पावन जगातिं

सदां तो। विमल शोभत, देवाचे होतो। वरी
सुकीर्ति सतत भव्य विशाला ॥१॥

[ रामचन्द्र येतो ]

रामचन्द्रा बरा वेळेवर आलास. उद्यां तुला राज्याभिषेक होणार, त्यापूर्वी तुला राजधर्माचा कांहीं उपदेश करावा, म्हणूनच मी तुला बोलाविलें होतें. हा कुलाचार आहे आणि कुलाचाराला मान देणें हें कुलीन पुरुषाचें कर्तव्य आहे. एरवीं तुला राजधर्माची माहिती करून दिली पाहिजे, अशांतली कांहीं गोष्ट नाहीं.

रामचन्द्रः—सूर्यवंशांत पूर्वीं होऊन गेलेल्या इक्ष्वाकु, उत्तानपाद, ध्रुव, दिलीप किंवा रघु यांच्यामानानें माझी योग्यता किती तरी अल्प आहे ! आपल्या दृढनिश्चयाच्या जोरावर नारायणाला नमवून अक्षय अढळपदाची योग्यता प्रस्थापित करणारा महात्मा ध्रुव कोणिकडे आणि मी यःकश्चित पामर कोणीकडे ! सिंहापुढें स्वतःचें शरीर टाकून कामधेनूचा बचाव करणाऱ्या आणि त्याबरोबरच शरीरापेक्षां अभंग अशी सत्कीर्ति मिळविणाऱ्या देवतुल्य दिलीपमहाराजांची योग्यता कोठें ! आणि माझ्यासारख्या एका लोकसेवकाची योग्यता कोठें ! महनीय अशा माझ्या ह्या पूर्वजांनीं वसिष्ठकुलांतील विभूतींचा उपदेश ग्रहण करूनच दिगंतीं लौकिक कमाविला होता. त्यांच्या—वसिष्ठांच्या—सल्ल्याबाहेर सूर्यवंशांतील नृपतींनीं सहसा वर्तन केलें नाहीं आणि त्रिशंकूसारख्या राजांनीं अपवादादाखल वर्तन केलें, त्याचा परिणामही चांगला झाला नाहीं. माझ्या पूज्यपूर्वजांनीं जो आचार पाळला, त्याला माझी पूर्ण मान्यता आहे. एकाग्रचित्तानें आणि उत्सुकहृदयानें तो उपदेश ऐकून आचरणांत आणण्याची माझी तयारी आहे.

वसिष्ठः—रामचंद्रा ! आजपर्यंत तूं माझ्या तालमींतच तयार झाला आहेस आणि राजकारणशास्त्राच्या अध्ययनांत " शिष्यादिच्छेत पराजयं " या न्यायानें तूं केलेला माझा पराजय मला भूषणावहच आहे; परंतु आम्हीं

वृद्ध माणसें ! पुन्हां पुन्हां एकच गोष्ट त्याच त्याच शब्दांत सांगण्याची आम्हाला संवय लागून गेली आहे. "वारांगनेव राजनीति अनेक रूपः" अशी स्थिति असल्यानें त्या शास्त्रांत एक गोष्ट म्हणून ठामपणें सांगतां येत नाहीं. प्रतिपक्ष ज्याप्रमाणें डावपेंच लढवील, त्याप्रमाणें आपलेंहि धोरण ठरविलें पाहिजे. राजानें क्रूरपणें वर्तन करून प्रजापीडन करणें हें ज्याप्रमाणें त्याज्य आहे, त्याचप्रमाणें अस्थानीं दया दाखवून अपराध्यास क्षमा करणेंहि योग्य नाहीं. सत्य, अहिंसा, अस्तेय इत्यादि गुण राजाच्या अंगीं अवश्य पाहिजेत; पण त्यांची अतिव्याप्ति कामाची नाहीं. सत्य तेंच कीं, ज्याच्या योगानें बहुजनहित साधून अंतीं जगताचें कल्याण होतें. ज्या सत्यानें भूतमात्राचें कांहींच हित न साधतां, झालें तर सर्वांचें अकल्याण होण्याचा संभव आहे, तें सत्य नसून तो एक सत्याचा आभास आहे. असल्या घातक सत्याच्या संपर्कास सुद्धां राजानें राहातां कामा नये. प्रजेचें कल्याण हेंच राजाचें ध्येय आहे. ह्या ध्येयाच्या आड येणारें सत्य पालन करणें, म्हणजे स्वतःला नरकाचा धनी करून घेण्यासारखें आहे. म्हणून असल्या सत्याच्या वाऱ्यासहि तूं राहूं नकोस ! ज्या सत्यानें स्वराष्ट्रोद्धार न होतां, त्या महत्कार्याला आडकाठी येते, तें सत्य कसलें ? तें मूर्तिमंत पाप आहे. ज्या राजाला हें पाप पछाडलें, त्या राजाचें राष्ट्र लयास जाऊन त्या राष्ट्रांतील लोकांच्या पायांत पारतंत्र्य-शृंखला पडल्याच म्हणून समजावें ! पारतंत्र्य आणि नरक यांत फारसा भेद नाहीं. एक भूवरील आणि दुसरा स्वर्गांतील, एक प्रत्यक्ष आणि दुसरा काल्पनिक, इतकाच फरक ! अहिंसेचीहि गोष्ट अशीच आहे. अहिंसेची अतिव्याप्ति होतांच शौर्य, साहस, पराक्रम इत्यादि सद्गुण मातीस मिळून भित्रेपणाचा राष्ट्रांत सुकाळ होण्यास वेळ लागणार नाहीं. निर्बल मनुष्यास किंवा प्राण्यास व्यर्थ त्रास देणें अनुचित आहे; पण परकयास पीडा देणारा, विष घालणारा, अग्नि लावणारा, स्त्रियांवर बलात्कार करणारा, दुसऱ्याच्या

सदां तो। विमल शोभत, देवाचि होतो। वरी
सुकीर्ति सतत भव्य विशाला ॥१॥

[ रामचन्द्र येतो ]

रामचन्द्रा बरा वेळेवर आलास. उद्यां तुला राज्याभिषेक होणार, त्यापूर्वी तुला राजधर्माचा कांहीं उपदेश करावा, म्हणूनच मी तुला बोलाविलें होतें. हा कुलाचार आहे आणि कुलाचाराला मान देणें हें कुलीन पुरुषाचें कर्तव्य आहे. एरवीं तुला राजधर्माची माहिती करून दिली पाहिजे, अशां-तली कांहीं गोष्ट नाहीं.

**रामचन्द्रः**—सूर्यवंशांत पूर्वी होऊन गेलेल्या इक्ष्वाकु, उत्तानपाद, ध्रुव, दिलीप किंवा रघु यांच्यामानानें माझी योग्यता किती तरी अल्प आहे ! आपल्या दृढनिश्चयाच्या जोरावर नारायणाला नमवून अक्षय अढळपदाची योग्यता प्रस्थापित करणारा महात्मा ध्रुव कोणीकडे आणि मी यःकश्चित पामर कोणीकडे ? सिंहापुढें स्वतःचें शरीर टाकून कामधेनूचा बचाव कर-णाऱ्या आणि त्याबरोबरच शरीरापेक्षां अभंग अशी सत्कीर्ति मिळविणाऱ्या देवतुल्य दिलीपमहाराजांची योग्यता कोठें ? आणि माझ्यासारख्या एका लोकसेवकाची योग्यता कोठें ? महनीय अशा माझ्या ह्या पूर्वजांनीं वसिष्ठ-कुलांतील विभूतींचा उपदेश ग्रहण करूनच दिगंतीं लौकिक कमाविला होता. त्यांच्या—वसिष्ठांच्या—सल्ल्याबाहेर सूर्यवंशांतील नृपतींनीं सहसा वर्तन केलें नाहीं आणि त्रिशंकूसारख्या राजांनीं अपवादादाखल वर्तन केलें, त्याचा परिणामही चांगला झाला नाहीं. माझ्या पूज्यपूर्वजांनीं जो आचार पाळला, त्याला माझी पूर्ण मान्यता आहे. एकाग्रचित्तानें आणि उत्सुक-हृदयानें तो उपदेश ऐकून आचरणांत आणण्याची माझी तयारी आहे.

**वसिष्ठः**—रामचंद्रा ! आजपर्यंत तूं माझ्या तालमीतच तयार झाला आहेस आणि राजकारणशास्त्राच्या अध्ययनांत " शिष्यादिच्छेत पराजयं " या न्यायानें तूं केलेला माझा पराजय मला भूषणावहच आहे; परंतु आम्हीं

वृद्ध माणसें ! पुन्हां पुन्हां एकच गोष्ट त्याच त्याच शब्दांत सांगण्याची आम्हाला संवय लागून गेली आहे. "वारांगनेव राजनीति अनेक रूपः" अशी स्थिति असल्यानें त्या शास्त्रांत एक गोष्ट म्हणून ठामपणें सांगतां येत नाहीं. प्रतिपक्ष ज्याप्रमाणें डावपेंच लढवील, त्याप्रमाणें आपलेंहि धोरण ठरविलें पाहिजे. राजानें क्रूरपणें वर्तन करून प्रजापीडन करणें हें ज्याप्रमाणें त्याज्य आहे, त्याचप्रमाणें अस्थानीं दया दाखवून अपराध्यास क्षमा करणेंहि योग्य नाहीं. सत्य, अहिंसा, अस्तेय इत्यादि गुण राजाच्या अंगीं अवश्य पाहिजेत; पण त्यांची अतिव्याप्ति कामाची नाहीं. सत्य तेंच कीं, ज्याच्या योगानें बहुजनहित साधून अंतीं जगताचें कल्याण होतें. ज्या सत्यानें भूतमात्राचें कांहींच हित न साधतां, झालें तर सर्वांचें अकल्याण होण्याचा संभव आहे, तें सत्य नसून तो एक सत्याचा आभास आहे. असल्या घातक सत्याच्या संपर्कास सुद्धां राजानें राहातां कामा नये. प्रजेचें कल्याण हेंच राजाचें ध्येय आहे. ह्या ध्येयाच्या आड येणारें सत्य पालन करणें, म्हणजे स्वतःला नरकाचा धनी करून घेण्यासारखें आहे. म्हणून असल्या सत्याच्या वाऱ्यासहि तूं राहूं नकोस ! ज्या सत्यानें स्वराष्ट्रोद्धार न होतां, त्या महत्कार्याला आडकाठी येते, तें सत्य कसलें ? तें मूर्तिमंत पाप आहे. ज्या राजाला हें पाप पछाडतें, त्या राजाचें राष्ट्र लयास जाऊन त्या राष्ट्रांतील लोकांच्या पायांत पारतंत्र्य-शृंखला पडल्याच म्हणून समजावें ! पारतंत्र्य आणि नरक यांत फारसा भेद नाहीं. एक भूवरील आणि दुसरा स्वर्गांतील, एक प्रत्यक्ष आणि दुसरा काल्पनिक, इतकाच फरक ! अहिंसेचीहि गोष्ट अशीच आहे. अहिंसेची अतिव्याप्ति होतांच शौर्य, साहस, पराक्रम इत्यादि सद्गुण मातीस मिळून भित्रेपणाचा राष्ट्रांत सुकाळ होण्यास वेळ लागणार नाहीं. निर्बल मनुष्यास किंवा प्राण्यास व्यर्थ त्रास देणें अनुचित आहे; पण परक्यास पीडा देणारा, विष घालणारा, अग्नि लावणारा, स्त्रियांवर बलात्कार करणारा, दुसऱ्याच्या

भूमीचा अपहार करणारा मनुष्य वध्य असून हरउपायानें त्या मनुष्यास राजानें ठार केलेंच पाहिजे. असले आततायी मनुष्य राष्ट्रांत प्रबल होतांच कोणाचा पायपोस कोणाच्या ताब्यांत राहात नाहीं व तें राष्ट्र डबघाईस येतें. माजलेले पशु, सर्प आणि हिंस्र जनावरें यांचा वध करणें आवश्यक आहे. ती हिंसा नसून तें एक महनीय सत्कृत्य आहे आणि ह्या सत्कृत्याच्या योगानें राजा पुण्याचा भागीदार होतो. दुसऱ्याच्या वस्तूंचा अपहार करणें हें सामान्यपणें जरी पातक असलें, तरी जुलुमी राजांचीं राज्यें पादाक्रांत करून त्याजागीं स्वसत्ता स्थापन करण्यांत कांहींच दोष नाहीं. " असंतुष्टा द्विजा नष्टः संतुष्टः च क्षत्रियः " असें शास्त्रवचन आहे. जो राजा आपल्या टीचभर राज्यावर संतुष्ट राहून कांहींच हालचाल न करितां स्वस्थ बसतो त्याचें राज्य पादाक्रांत करून शत्रु त्याला आपला दास बनवितात. याकरितां भूपतीनें नेहमीं चतुरंग सैन्यानें सज्ज राहून शत्रूचें पारिपत्य करण्यास सिद्ध असलें पाहिजे. राजकारण हें नेहमीं गुप्त राखावें. शत्रूस त्याचा मागमूसहि लागूं देतां कामा नये. जो राजा आपलें राजकारण उघड करतो, त्या राजाचा कधींहि उत्कर्ष होत नाहीं. अस्थानीं दया, अस्थानीं प्रेम, अस्थानीं सहानुभूति हे सर्व दुर्गुण आहेत. राजानें तर या दुर्गुणांचा त्याग अवश्य केलाच पाहिजे. तूं सूज्ञ आहेस. राजनीतिप्रविण आहेस आणि चतुर आहेस. समयासारखा समय येत नाहीं, म्हणून ज्याकालीं जें आचरण करणें योग्य आहे, त्याचप्रमाणें आचरण करीत जावें. शत्रूंची उपेक्षा आणि मित्रांची उपेक्षा यांत फारसें अंतर नाहीं. शत्रूंची उपेक्षा कित्येक प्रसंगीं हानिकारक होते आणि मित्रांची उपेक्षा केल्यानें ते शत्रु बनतात. याकरितां नेहमीं

३७. पद ( चालः—अमर पद पावे० )

सकल अरि ठेचीं । दूर, अति हीतकर । होईल
तुज पाहीं ॥ध्रु०॥ जानिं सकल कामना । गुप्त ती
राखितां । ध्येय हित साधना । योग्य होई ॥१॥

रामः—गुरुमहाराज ! आपला हा अमोलिक उपदेश हृत्पटलावर खोदून ठेऊन त्याप्रमाणें आचरण करण्याचा शक्य तों प्रयत्न करीन. अयोध्येचे प्रजाजन हेच मला देवाच्या ठिकाणीं आहेत. या जगांत जनरूपानेंच प्रभु प्रकट झाला आहे, अशी माझी भावना आहे आणि त्या प्रभूची सेवा करण्यांतच मी आजपर्यंत माझें जीवन व्यतीत केलें आहे. तोच मार्ग मी यापुढेंहि चोखाळीन, याबद्दल आपण खात्री बाळगावी. माझें एकच ध्येय ठरलेलें आहे आणि तें हेंच कीं,

३८. पद ( चालः—पांडुनियां रिपुरुधिरा० )

लीन सदां जन चरणीं । प्रेमानें । चंचल जरि पथ
असला । सौख्यद मज झाला ॥ध्रु०॥ विमल दया
प्रिय वनिता । स्नेहाचे सुखानिय ममता । अभिनव
वर धर्माला । त्यागीनाहि जाणी ॥१॥

वसिष्ठः—आतां तुला अनार्यांच्या विषयीं कांहीं सांगितलें पाहिजे. अनार्य हे आर्यांचा द्वेष करितात, त्यांना पाण्यांत पाहातात आणि त्यांच्या अकल्याणाविषयीं झटतात. हा केवळ त्यांच्या अशिक्षितपणाचा परिणाम आहे. त्यांच्या कमालीच्या अशिक्षितपणामुळेंच आर्य लोक त्यांना वानर म्हणून संबोधित आहेत. या वानरांना नराच्या पदवीस आणणें, या नागांना नम्र करणें, या राक्षसांना रक्षक बनविणें हें तुझें परम कर्तव्य आहे. भरताप्रमाणें त्यांची मैत्री संपादन केली, त्यांच्यांत मिळून मिसळून वागलें, त्यांना पुष्कळ सवलती दिल्या किंबहुना आर्यांच्या बरोबरीनें हक्क दिले, तरी हे अशिक्षित अनार्य ताळ्यावर येणार नाहींत. त्यांच्यात जोंपर्यंत शिक्षणाचा प्रसार झाला नाहीं, तोंपर्यंत अडाणी समजुती, अनिष्ट चालीरीती, अशुद्ध धर्म यांचा त्यांच्यातून नायनाट होणें शक्य नाहीं. त्यांची लिंगपूजा, त्यांचे बिभत्स देव, भूतेंखेतें, वेताळ, झोटींग, डांकिणी, शंखिणी इत्यादि क्रूर देवता यांचें निर्मूलन होऊन त्या जागीं आर्यांचा सात्विक धर्म स्थापन

करण्यास एकच उपाय आहे आणि तो म्हटला म्हणजे आर्यसंस्कृतीचा प्रसार अनार्यांत करणें हाच होय. अनार्यांचा कट्टा द्वेष्टा म्हणून माझी ख्याती आहे आणि माझ्या जिवास अपाय करण्याकरितां अनार्य लोक रात्रंदिवस जपत असतात; परंतु हा केवळ त्यांचा भ्रम आहे. अनार्यांच्या दुःखानें माझें अंतःकरण तिळतिळ तुटत आहे, त्यांच्या दुर्दशेनें माझें मन रात्रंदिवस जळत आहे; पण त्याला इलाज नाहीं. उद्धार हा स्वतःच करून घेतला पाहिजे. दुसरे फक्त मदत करूं शकतील; पण स्वतः कांहींच प्रयत्न न करितां दुसऱ्यांच्या नांवानें खडे फोडणें कितपत सुसंगत आहे ? आर्य जातीचें मस्तक म्हणून अनार्य लोक ब्राम्हणांचाच जास्त द्वेष करितात; परंतु द्वेषाच्या पायावर उभ्या राहिलेल्या कोणत्याहि जातीची उन्नति होणें शक्य नाहीं. त्यांनीं जरी हें द्वेषाचें बीज खोल रुजविण्याचा प्रयत्न केला, तरी तूं त्या विद्वेषास बळी पडूं नकोस. द्वेषानें कोणाची उन्नति झाली नाहीं आणि होणारहि नाहीं, परंतु त्याच बरोबर हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, अनार्यांना फाजील सवलति देतां कामां नयेत. अनार्य प्रबल झाले कीं, आर्यांची या देशात धडगत नाही. आर्यांचा नायनाट झाला, तर एका महान् संस्कृतीस अखिल अवनी मुकून तिची दुर्दशा होईल ! संपूर्ण जगतीतलावर आर्यसंस्कृतीइतकी उत्तम संस्कृति कोणती आहे ? वैदिक धर्माइतका श्रेष्ठ धर्म कोणता आहे ? संस्कृत भाषेइतकी उत्तम भाषा कोणती आहे ? या सर्वांचें निर्मूलन होणें कधींहि इष्ट होणार नाहीं. आमची संस्कृति, धर्म आणि भाषा यांचा नाश होऊन, शांतता नांदत असेल, तर असली स्मशानशांतता तूं कधींच अंगिकारूं नकोस ! या त्र्यींच्या संरक्षणाकरितांच मनुष्यजन्म असतो आणि यांचें संरक्षण करण्यांतच मनुष्यजन्माचें सार्थक आहे. म्हणून

३९. पद (चालः—नयनीं लाजवीत०)

तनुजें सबल होय । आर्य साम्राज्यी । आदि निर्भय.

दायी। जवळीं करावी। तारील जगता। हित हेंच
भावी। करणी विमल जाण। सुजनीं दिसावी॥१॥

शांतता प्रस्थापित करण्याचा भरताचा मार्ग चुकलेला आहे. या मार्गानें शांतता तर प्रस्थापित होणार नाहींच, तर अनार्य प्रबल होऊन ते आर्यांच्या डोक्यावर नाचूं लागतील आणि अशांतीचा अग्नि पेटून, त्यांत संपूर्ण आर्यावर्ताची आहुती पडल्याशिवाय राहाणार नाहीं. शांतीचा सागर, महात्मा, सत्यभक्त म्हणून कांहीं आर्यांनीं त्याचा उदो उदो चालविला आहे, तरी त्याचा अनिष्ट परिणाम त्यांना लवकरच भोगावा लागेल.

**रामः**—महात्मा भरत शांतीचा सागर आहे, यांत संशय नाहीं. लवकरच आपल्या कृतीचे अनिष्ट परिणाम दिसून येतांच तो ताळ्यावर येईल आणि अखिल अवनीवर आर्यांचें साम्राज्य प्रस्थापित करण्यास झटेल, यांत संशय नाहीं. ताऊनसुलाखून निघालेला भरत पुढें जास्तच नेटानें कार्यास प्रवृत्त होईल.

**वसिष्ठः**—रामचंद्रा ! तुझें मन अत्यन्त थोर असल्यानें अजूनहि भरताची तुला आशा वाटते; पण ही तुझी चूक आहे. लहान बालक होता, तेव्हांपासून भरताला मी चांगला ओळखतों. शांति हें त्याचें ब्रीद, सत्य हें त्याचें ध्येय आणि अहिंसा हें त्याचें साध्य ! लहानपणीं ढेकणाच्या मृत्यूनें सुद्धां त्याचें अंतःकरण कळवळत असे. अग्निहोत्राकरितां समिधा गोळा करीत असतां तृणांकुरावर वावरणाऱ्या जीवांची हत्या आपल्या हातून घडूं नये, म्हणून त्यानें समिधा गोळा करण्याचेंच सोडून दिलें होतें.

**रामः**—होय ! ती गोष्ट मलाहि स्पष्टपणें आठवते. आम्हीं त्या वेळीं आठ वर्षांचे होतों व नुकताच कोठें धनुर्विद्येला आरंभ केला होता. आपल्या उपदेशानें तो मग त्या कार्यापासून परावृत्त झाला.

**वसिष्ठः**—त्यावेळीं मी त्याला क्षात्रधर्माची ओळख करून दिली. रणांगणांत शत्रूशीं लढून त्याचा नाश करणें हाच क्षत्रियांचा परम धर्म आहे.

शांततेचीं व्याख्यानें झोडलीं असतां शत्रु पळून जात नाहीं, तर उलट जास्त वेगानें आक्रमण करून शांततावाद्याचा नायनाट करून टाकतो आणि त्याचें राज्य धुळीस मिळवितो. जगांत स्वातंत्र्यानें, सन्मानानें, शांततेनें जीवन व्यतीत करावयाचें असेल, तर त्याला एकच उपाय आहे. आपल्या अंगांत जुलुमाचा प्रतिकार करण्याची धमक आहे, ही गोष्ट शत्रूच्या प्रत्ययास आणून देणें, हाच तो उपाय होय ! निर्बलाची शांतता, प्रामाणिकपणा, न्याय किंवा सत्य यांना जगांत कोणीच विचारीत नाहीं. ' बळी तो कान पिळी ' हेंच तत्व सत्य आहे आणि जगाच्या अंतापर्यंत त्याचें सत्यत्व कायम राहाणार ?

४०. पद (चालः—मम मनिं कृष्णसखा०)

अरिजन शस्त्रधरा नमिती । पदतलिं नम्र सदां
असती ॥ध्रु०॥ सतत नमत बल अनुपम लोकीं ।
विक्रम धारणिं सुजन शोभती ॥१॥

(पडदा पडतो.)

## प्रवेश दुसरा.

(कुटिला प्रवेश करिते.)

कुटिलाः—शाबास ! मंथरे शाबास, धन्य तुझी ! मुत्सद्दि म्हणून मिरविणाऱ्या या ब्राम्हणबुद्रुकाना तूं आपल्या चाणाक्षपणानें चकविलेंस खरें ! हे पुरुष आपणाला मोठे राजकार्यधुरंधर म्हणून समजतात. वसिष्ठांना म्हणावें आतां ती राजकार्याची धुरा आपल्या मानेवर घेऊन खुशाल वनांत जाऊन हांकीत बसा ! थेरडा मोठा कारस्थानी. आपल्या कारस्थानी डोक्यानें यानें आजवर्यंत बरींच कारस्थानें केलीं असतील, पुष्कळांचे नाहक गळे कापले असतील, बऱ्याच जणांना फांसावर चढविलें असेल; पण त्यांत आम्हांला ढवळाढवळ करण्याचें कांहींच कर्तव्य नसल्यानें त्यांत आम्ही मुळींच लक्ष दिलें नाहीं; परंतु जेव्हां याची मजल राजाला वचन-

भंगाचा सल्ला देण्यापर्यंत जाऊन तें कारस्थानी डोकें आमच्या हिताआड येऊं लागलें, तेव्हां त्याच्याकडे लक्ष देण्याशिवाय आम्हांला गत्यन्तर राहिलें नाहीं. मंथरेनें भरलेल्या सुरंगाला इतक्यांत तिकडे कैकेयी राणीसाहेबांनीं बत्तीहि दिली असेल. त्या सुरंगाचा होणारा स्फोट रामास अरण्याचा युवराज केल्याशिवाय खास राहात नाहीं. थेरड्या कर आतां कारस्थानें ! तो मेला कारस्थानी राम कसा अगदीं गोडबोल्या ! मेला गोड बोलून लोकांना अगदीं भुरळ पाडितो ! तो मेला कपटी आणि कैकेयीबाईसाहेब कमालीच्या भोळ्या ! भोळेपणालासुद्धां मर्यादा असते. पोटच्या गोळ्या-प्रमाणें सावत्रमुलावरहि प्रेम करणारी बायको ही पाहिलींच ! मंथरेनें तिला पुष्कळ सांगून पाहिलें; पण प्रथम ती ऐकेनाच ! पण मंथरा कसली बस्ताद ! तिनें बाईसाहेबांच्या भावीस्थितीचें चित्र इतक्या भडक रंगांत रंगाविलें कीं, सांगतां सोय नाहीं. तें चित्र पाहून बाईसाहेब अगदीं भिऊन गेल्या आणि मंथरेच्या म्हणण्याला एकदम राजी झाल्या झालें ! वसिष्ठाच्या मुत्सद्दिपणाचा शेवट इतक्यांत लागलाहि असेल. "वसिष्ठोगणिकापुत्रः" हें प्रसिद्धच आहे. हा बोलूनचालून गणिकेच्या कुळांत जन्मलेला अकलेचा खन्दक, राजकारण तें काय करणार ? अरे गणिकापुत्रा ! तुझे सद्दीचे दिवस आतां संपले. याचें प्रस्थ तरी किती माजलें होतें. थेरड्याला सर्व प्रजाच काय पण राजासुद्धां अगदीं वचकून वागत होता; पण मंथरेनें त्याचे दांत पाडलेच कीं नाहींत. बायकांना राजकारण समजत नाहीं, हें या पुरुषाचें पहिलें सूत्र ! पण आम्हीं बायकांनींच या सर्व मी मी म्हणणाऱ्या मुत्सद्द्यांस हार खावयास लावलें की नाहीं ? माझ्या तर अगदीं मनासा-रखें झालें ! मंथरेनें तर माझ्या कामगिरीची फार फार वाखाणणी केली आणि बाईसाहेबांनीं हा आपल्या गळ्यांतील हार मला बक्षीस दिला. भरत राजा झाल्यावर मला एक जहागीरच मिळणार आहे. जहागीरदारीण झाल्यावर माझें भाग्य काय विचारतां ! बरी आठवण झाली. संकेताप्रमाणें

आतां तो मूर्ख कौटिल्य इकडे येणार; त्याच्याकडून कांहीं महत्वाची बातमी असल्यास काढून घ्यावी आणि बेट्याला द्यावा झिडकारून ! या भिकारड्याची बायको होऊन भिक्षापात्र हातांत घेण्याइतकी कुटिला मूर्ख आहे, असें या भाबड्याला वाटलें तरी कसें ? राजकारणांत वचनभंग करणें हें पातक नसून चातुर्य आहे. ( दूर पाहून ) आला आपल्या संकेताप्रमाणें भाबडया. ( कौटिल्य प्रवेश करितो. )

कौटिल्यः—माझ्यापूर्वी तूं येथें तयार ! सूर्योदय व्हायला अजून थोडा अवधी आहे. मी मोठ्या पहाटेस उठून इकडे आलों. बराच वेळ तिष्ठत बसावें लागेल, असें वाटलें होतें; पण पाहातों तों उलटा अनुभव आला. इतक्या पहाटेस या निर्जन जागीं येण्यास तुला कांहींच भीति वाटली नाहीं ? पण भीति कसली म्हणा ! कारण हें आहे रामराज्य !

कुटिला:—बरें तें राहूं द्या ! पण समारम्भाबद्दल आपणाला आणखी कांहीं नवीन वर्तमान लागलें आहे काय ?

कौटिल्यः—नवीन वर्तमान तें काय असणार ? समारम्भ होणार, रामास राज्य मिळणार, कौसल्या राजमाता होणार आणि देवी सीता राणी होणार हें ठरलेंच आहे. एकदां परिषदेंत ठराव पास झाला कीं मग तो वज्रलेप!तो फिरविण्याची मग कोणाची प्राज्ञा आहे;कारण हें आहे रामराज्य!

कुटिला:—आज यौवराज्याभिषेक होणार, असें तुम्हांला वाटतें ?

कौटिल्यः—अग ! वाटणार काय ? माझी तशी खात्री आहे. अभिषेकापूर्वी युवराजास गुरूनें राजनीतिशास्त्राचा उपदेश करावयाचा तोसुद्धां करून झाला. आता शंका घेण्याचें मुळींच कारण नाहीं. कारण हें आहे रामराज्य !

कुटिला:—काय युवराजांस उपदेशसुद्धां झाला ? पण कांहींही झालें तरी हा वचनभंगाचा सूड ढांसळणार खास ! ह्याबद्दल माझी पूर्ण खात्री आहे. भरतास राज्य व रामास वनवास मिळून खोट्याच्या कपाळीं गोटा ही म्हण सार्थ होणार !

कौटिल्यः--( चपापून ) काय म्हणतेस ? रामास वन आणि भरतास सिंहासन लाभण्यास असें एकाएकीं झालें तरी काय ? माझ्या रामाला वनवास काय म्हणून ? पण असें होईल तरी कसें ? बिलकूल होणार नाहीं कारण हें आहे रामराज्य !

कुटिलाः—आतां तुमचें तें रामराज्य विसरा. राम आतां वनाचा राजा मात्र खास होणार !

कौटिल्यः—अगदीं खोटें ! अगदीं खोटें ! तूं माझी थट्टा करिते आहेस झालें ! थट्टेशिवाय प्रेमाला रंग नाहीं म्हणतात तें खरें ! थट्टाच ना ही ? थट्टेशिवाय असलें अभद्र भाषण या राज्यांत कोण करणार ? कारण हें आहे रामराज्य !

कुटिलाः—रामास राज्य नाहींच; पण वनवास येण्यास कारण मात्र तुमचे गुरूजी. युवराज भरत शांतीचा सागर आणि कैकेयी प्रेमाची सरिता ह्या उभयतांच्या स्वभावाचा फायदा घेण्याचा तुमच्या गुरुजींनीं निश्चय केला होता; पण कारस्थान अगदीं आंगलट आलें.

कौटिल्यः—पण गुरूजींच्या अन्यायाबद्दल रामचंद्रास शिक्षा काय म्हणून ? चोर सोडून संन्याशास सुळीं म्हणतात तशांतलीच गत ! खऱ्या गुन्हेगारास शिक्षा झाली पाहिजे; कारण हें आहे रामराज्य !

कुटिलाः--तो थेरडा चोर आणि हा राम चोरांचा साथीदार ! चांगले तोंडघशीं पडणार दोघेहि.

कौटिल्यः—पण त्यांना तोंडघशीं पाडणार कोण तें तरी सांग ?

कुटिलाः—तें थोड्या वेळानें समजलेच आपणाला. मीच सांगितलें पाहिजे अशांतली गोष्ट नाहीं. मला आतां गेलेंच पाहिजे. मी जातें आपली.

कौटिल्यः—बरें तें राहूं द्या. रामास राज्य नाहीं तर नाहीं मिळालें. आम्हीं तरी लवकर लग्न करून आमचें रामराज्य थाटूं या म्हणजे झालें. राम काय आणि भरत काय दोघेहि आम्हाला सारखेच.

कुटिला:-तुम्हांला आतां मी संशयांत ठेवीत नाहीं. चक्क सांगून टाकतें. तुझ्याशीं मला लग्न कर्तव्य नाहीं. तुझ्यासारख्या भटुरग्याशीं लग्न लावून निरंतरची चोपदरी हातीं घेण्यास माझें अडलें आहे खेटर!

कौटिल्यः—पण मला तूं वचन दिलें होतें ना? आणि आतां वचन मोडतेस? वचन मोडणें हें महापातक आहे; कारण हें आहे रामराज्य!

कुटिला:—वचन! वचन कोणी कोणाला दिलें होतें? मी तुम्हांला वचन दिलें कीं, तुम्हीं मला दिलें? रामास राज्य मिळालें असतें तर मी तुमच्याशीं लग्न केलें असतें; पण आतां रामास राज्य मिळण्याचा संभव नाहीं. मग मी तुमच्याशीं लग्न करण्याचा संभव तरी कसा असेल? आम्हां स्त्रियांचें पुरुषांपेक्षां त्यांच्या पैशावरच जास्त प्रेम असतें. समजलांत ना?

कौटिल्यः—मग इतके दिवस जो तूं विलक्षण प्रेमाचा आविर्भाव केलास, तो लटकाच म्हणावयाचा?

कुटिला:-लटका नाहीं तर कसला? बायकांनीं फसवावें आणि दुधखुळ्यांनीं फसावें हा कामशास्त्रांतील पहिला सिद्धांत आहे. तुमच्यासारख्या भाबड्यांना भुलविल्याशिवाय आमचा कार्यभाग कसा साधणार?

कौटिल्यः—मग तूं माझा केंसानें गळा कापला, असेंच कीं नाहीं.

कुटिला:—तुम्हांला पाहिजे तसें म्हणा; पण तुम्ही मात्र आपल्या भाबडेपणानें रामास अरण्याचा मार्ग दाखविला इतकें खरें!

कौटिल्यः—छट्! असें कधींच होणार नाहीं. मी आहे रामाचा भक्त! रामभक्त त्याचें कधींही अकल्याण चिंतीत नसतो. मग कृतीनें करणार कसा?

कुटिला:-तुम्हीं आहां शुद्ध नंदीबैल! वसिष्ठाच्या गुप्त कारस्थानाची तुम्ही जी मला वेळोवेळीं बातमी देत होतां, त्याचाच आहे हा परिणाम! तुमच्यासारख्या भटुरग्यांवर प्रेम करण्याइतकी कांहीं मी दुधखुळी नाहीं. तुमच्याकडून बातमी काढण्याकरितां केलेलें तें एक कपट होतें. बरें, आतां मी जातें आपली. या अद्दलीनें पुढें तरी शहाणपण शिका म्हणजे झालें! (जाते.)

कौटिल्य:—किती मी मूर्ख ? या सटवेच्या नादास लागून रामरायास वनास पाठविण्यास मी कारण झालों. छट् ! स्त्रीजात तेवढी निमकहराम ! बस्स ! झाला निश्चय ! आतां लग्न म्हणून करावयाचें नाहीं. बायकांमुळेंच आजपर्यंतचीं जगांतलीं सर्व अपकृत्यें घडून आलीं आहेत. रामराय वनास जाणार मग आम्हीं तरी अयोध्येंत राहून काय करणार ? स्त्रिया असलेल्या शहरांत सुद्धां राहणें धोक्याचें आहे.　　　　[ जातो. ]

## प्रवेश तिसरा.

[ पात्रें:—दशरथ आणि कैकेयी. ]

दशरथ:— प्रिये ! आजच माझ्या प्रेमाचा संशय तुला कां बरें यावा ? लोकोत्तर ललनेच्या लोभास लालचावून वृद्धपणांत विवाहाची विशाल जबाबदारी मी आपल्या शिरावर घेतली. पूर्वजांच्या परंपरागत पद्धतीचा त्याग करून, रामचंद्राची माता वयानें वडील असतां पट्टराणीपदाची पूजा तुला अर्पण केली आणि जनतेच्या जाहीर निंदेला नाहक पात्र झालों. गुलाब–कुसुमाप्रमाणें शोभणारे तुझे कोमल कपोल पाहतांच माझें भान भडकून जातें आणि अननूभूत आनंदानें अंत:करणांत गुदगुल्या होऊं लागतात. आज आमचा विवाह झाल्यास दीर्घ कालावधि लोटून गेला; पण एका शब्दानेंहि मी तुझें मन कधीं दुखविलें नाहीं कीं, तुझी कोणतीहि इच्छा अपूर्ण ठेविली नाहीं. भारतवर्षांत विशाल वैभवानें व विस्तृत वसुधेनें नटलेल्या अयोध्येचा मी स्वामी आहे. कित्येक मांडलिक भूपतींचे भव्य राजमुकूट माझ्या पायांशीं लोळण घेत असतात; पण तुझ्या सहवासांत मला जो आनंद होतो, तितका जगांतील अन्य कोणत्याहि सन्मानानें होत नाहीं. वृद्धपणात वनितेच्या व्यामोहानें व्यास झाल्यानें, आर्यांच्या आश्रम धर्माप्रमाणें वानप्रस्थाश्रमाचा मी अजून स्वीकार केलेला नाहीं; म्हणून बाईलवेडा या विशेषणानें अयोध्येचे प्रजाजन परस्पर माझी संभावना

करितात. ही सर्व निंदा, हा सर्व उपहास, मी केवळ तुझ्याकरितां सहन करीत आहें; पण प्रिये ! या माझ्या आत्यंतिक प्रेमाची किंमत तुला कांहींच वाटत नाहीं काय ?

**कैकेयीः**–राजा ! पुरुषांचीं हीं मानभावी बोलणीं मला पूर्णपणें समजतात. स्वतःच्या सुखाकरितां सुदतीची सेवा करून, मग तिचा केसानें कोमल कंठ कापण्यास कसाब–करणीनें तयार होणारे कापुरुष कैकेयीनें पुष्कळ पाहिले आहेत. राजा ! तुझीं सर्व कृष्णकृत्यें मला माहीत नाहीत अशी तुझी भावना आहे काय ? तशी भावना असल्यास ती पूर्णपणें चूक आहे. मला पट्टराणीपदाचा मान दिला हे उपकार कोणाला सांगतोस ? कैकयदेशाच्या राजघराण्यांतील कन्यकांना त्यांच्या कुलिनत्वामुळें पट्टराणीपदाचा मान मिळावा अशी भारतवर्षांत वहिवाटच आहे. मग माझ्याच बाबतींत ती पद्धति अंमलांत कां येऊं नये ?

४१. पद (चालः–जो नटला पापें मधुभाषी०)

हीं कुलिना कांता विभवाची खनिकासी योग्या
महाराणी ॥ ध्रु० ॥ वरितां मजला, पिता वचन
सुहीता घेत सुता भुपती मानी ॥१॥

आपल्या कृष्णकृत्यावर उपकाराचा पडदा टाकून द्यावा, असा तुझा डाव आहे; पण अशानें तीं कृत्यें नाहींशीं न होतां त्यांचें काळेंकुट्ट स्वरूप अधिकच प्रकाशांत येईल.

**दशरथः**––कैकेयी ! आज तुझ्या डोक्यांत हें कसलें वेड शिरलें आहे ? तुला हे चाळे कोणी शिकविले ? तुझ्या संमतिशिवाय आजपर्यंत मी कोणतेंहि कृत्य केलेलें नाहीं. राजकारणांतहि मी तुझा सल्ला घेतों. असें असतां माझीं कृष्णकृत्यें तीं तुला कोणतीं दिसून आलीं. कल्पनेच्या कामनेनें फावून कृत्येवीं कृत्यें करूं नकोस. पतीच्या पायांची पूजा करण्यांतच

सतचिं सोज्ज्वल सौंदर्य साजून दिसतें. नीतीचा, धर्माचा आणि पुण्याचा पथ लाथाडून तुला काय लाभ होणार ?

कैकेयीः—राजा ! पत्निधर्माचा मला उपदेश करण्यापूर्वी आपला पतिधर्म आणि राजधर्म कोठें वाहत चालला आहे, ह्याचा कांहीं विचार करावयाचा होतास ? दुसऱ्यांना प्रतिज्ञापूर्वक दिलेलीं वचनें बेशक लाथाडून आपण त्या गांवचेच नव्हेत असा बहाणा करणें हा अयोध्येच्या राजाचा धर्म आहे काय ? ध्रुव, रघु, दिलीप, हरिश्चंद्र यांसारखे सत्यप्रतिज्ञ राजे ज्या वंशांत होऊन गेले त्या वंशांतील नृपतीनें वचनभंग करून आपले बेचाळीस पूर्वज नरकांत ढकलण्यास तयार होणें, याच राजधर्माचा उपदेश वसिष्ठानें तुम्हांला केला आहे काय ? राजा ! बोल. पतिधर्माचें आणि राजधर्माचें परिपालन तुझ्याकडून योग्य रीतीनें घडत आहे ?

दशरथः—(स्वगत) घात झाला ! कोणातरी नागिणीनें कैकेयीच्या कानाला दंश केला असें वाटतें. (उघड) कैकेयी आज तुला झालें आहे तरी काय ? रघुकुलांतील राजे राजधर्माचा त्याग करतील, असा तुला संशय तरी कां यावा ? रघुकुलांतील राजांचा एकच धर्म आहे. सत्याचें परिपालन हाच तो धर्म होय. प्राणांचीहि पर्वा न बाळगितां त्यांनीं ह्या धर्माचें पालन केलें आणि त्याचे वंशजही तसेंच करतील.

कैकेयीः—राजा ! तुझी अधोगति आतां पराकोटीस पोहोंचलेली आहे. करूनसवरून नामानिराळें राहाण्याची तुझी ही कृति अत्यंत हीन आहे. माझ्या पाणिग्रहणाच्या वेळीं माझ्या पित्याला कोणतें वचन दिलें होतें, ह्याची तुला आठवण आहे काय ? विचार कर आणि उत्तर दे. प्रतिज्ञाभंगाच्या पापांत असत्य बोलण्याची आणखी भर घालूं नको.

दशरथः—( एकदम तिचे पाय धरून ) कैकेयी क्षमा कर. ऐनवेळीं यौवराज्याभिषेकोत्सवांत विघ्न आणून रघुकुलाची बदनामी करूं नकोस !

विस्मरणामुळें माझ्या हातून हा प्रमाद घडला. रामाचा राज्याभिषेक बंद होऊन तुझ्या पतीची जगांत नाचक्की व्हावी, अशी तुझी इच्छा आहे काय ? अयोध्येच्या राजसिंहासनाची तूं अधिष्ठात्री देवता आहेस. त्या सिंहासनाची लोकांत छीः थूः झाल्यास त्यांत तुझाहि अपमान आहे. भरताप्रमाणें रामचंद्रावरहि तुझें निष्कलंक प्रेम आहे ना ? मग पतीची अब्रू, सिंहासनाचा सन्मान, कुलाची कीर्ति यांचें रक्षण करण्याचें मला अभयवचन दे पाहूं.

कैकेयीः—( राजाला लाथाडून ) ऊठ ! येरव्या ऊठ ! आतां विस्मरणाचा बहाणा करितोस ? तुझीं कारस्थानें मला पूर्णपणें माहीत आहेत. राज्याभिषेकांत कदाचित् अडथळा आणील म्हणून भरतास नंदि-ग्रामास कोणी पाठविलें ? कृष्णकारस्थानांवर वस्तुस्थितीचा बेगडी साज चढवून लोकांच्या डोळ्यांत धूळ फेंकूं पाहतोस काय ? नाहीं ! राजा, रामाला राज्याभिषेक होणें कधींहि शक्य नाहीं.

४२. पद (चालः–आपदा राजपदा भयदा०)

राम ना राजधना अवना । सवति सुत नीच
गमत ॥ध्रु०॥ लोभुनियां नृप विभवा । भव्य देश
तांडवा । शांतपणें । दिव्यगुणें । तेजें करविन
महिवरि महा अनर्थता त्वरित ॥१॥

इतकेंच नव्हे, तर रामचन्द्रानें भरताच्या अयोध्येचा त्याग करून, वाट फुटेल तिकडे निघून गेलें पाहिजे. रामचंद्र क्षत्रिय वीर आहे. त्यानें परभृत-पणानें बंधूच्या संपत्तीचा लोभ धरावा हें त्यास उचित नाहीं.

दशरथः–( काकुळतीनें ) कैकेयी ! अशी निर्दय होऊं नकोस ग ! अयोध्येचें सिंहासन हें अयोध्येच्या पौरजनांचें सिंहासन आहे. त्यांनीं रामाला राजा निवडलें, यांत माझा काय दोष ? तारुण्यांतील स्मरज्वरानें

पीडित होऊन, मी तुझ्या बापाला त्यावेळीं वचन दिलें होतें, ही गोष्ट जरी खरी असली, तरी अयोध्येच्या प्रजाजनांच्या इच्छेविरुद्ध मला कसें जातां येईल ? प्रजेचा सन्तोष हाच राज्याच्या दृढतेचा पाया आहे. हा पायाच जर ढांसळला ! तर मग काय राहिलें ?

कैकेयी:—काय पण कांगावा चालविला आहे ! जणूं काय मी एखादें बोंडल्यानें दूध पिणारें पोर आहे ! प्रजेच्या मान्यतेचा अर्थ मला चांगला समजतो बरें ! राजाच्या इच्छेविरुद्ध प्रजेनें वर्तन केल्याचें उदाहरण अयोध्येच्या इतिहासांत एक तरी घडून आलें आहे काय ? खरें पाहिलें, तर सर्व अनार्य लोक रामाला राज्याभिषेक करण्याविरुद्ध आहेत. अनार्यलोक रामचन्द्राचा द्वेष करितात, हें प्रसिद्ध आहे. सर्व राष्ट्रांत सर्वांना सारखा प्रिय असलेला भरतासारखा महात्मा कोण आहे ? अशा पराक्रमी व गुणवान् पुत्राला दूर सारून विनाकारण रामाला राज्याभिषेक करणें हा अन्यायाचा अतिरेक आहे, हा नीतीचा खून आहे, हा अत्याचाराचा कळस आहे. हा अन्याय मी कल्पांतींहि चालूं देणार नाहीं.

दशरथ:—कैकेयी ! आर्यावर्तांतील अन्यभूपतींना पाठविलेलीं आज्ञापत्रें मी आतां कोणत्या तोंडानें परत घेऊं ? अयोध्येची अब्रू त्या राष्ट्राचा सन्मान आज तुझ्यामुळें--त्या देशाच्या पट्टराणीमुळें—धुळीस मिळणार ना ? देवा ! ही विटम्बना पाहण्यास मला जिवंत तरी कां ठेवलेंस ? ( घेरी येऊन पडतो ) कैकेयी ( घाबरून ) मंथरे, मंथरे ! ( मंथरा येते ) राजाला प्रबल ग्लानी आल्यासारखें वाटतें. या हट्टामुळें माझ्या सौभाग्यसूर्याचा अस्त तर होणार नाहीं ना ?

मंथरा.—कैकेयी ! घाबरूनजाण्यासारखें यांत काय आहे ? राजा लवकरच शुद्धिवर येईल; पण आपण आपल्यापरीनें काळजी घेतलेली चांगली. मी रामाला हें वृत्त कळविण्यास जातें. तूं त्यांना वारा घालीत

येथेंच बैस. (स्वगत) लक्षण कांहीं ठीक दिसत नाहीं. पीडा गेली तर एकपरी चांगलेंच होईल. अराजकतेमुळें माजणाऱ्या घामधुमींत अनार्यांच्या मदतीनें भरताला राज्यावर बसविणें अगदीं सोपें आहे. (जाते.)

कैकेयी:-मंथरेच्या सांगण्यानें काय केलें मी हें ? या दुखण्यांत राजाचें जर कांहीं बरेंवाईट झालें, तर त्या पापाचें खापर सर्व जग माझ्यावर फोडल्याशिवाय राहणार नाहीं. एकीकडे राजमातेचें वैभव आणि दुसरीकडे सौभाग्यसूर्याची आशा या कात्रींत मी सांपडली आहे; पण छे ! मन असें द्विधा होऊं देतां कामा नये. एक वेळ अंगिकृत केलेल्या कार्यांत कच खाणें हें भागूबाईपणाचें लक्षण आहे. काय होईल तें होवो ! अयोध्येचें सिंहासन भरताला मिळालेंच पाहिजे ! मी त्याची माता धडधडीत जिवंत असतां सवतीच्या पोरानें माझ्या भरताचा हक्क पायाखालीं तुडविलेला मी कसा पाहूं ? ( रामचन्द्र आणि वसिष्ठ प्रवेश करतात. )

रामचन्द्रः—आई ! आज एकाएकीं हें काय झालें ? आकस्मिकपणें पित्याला प्रबल मूर्च्छा येण्याचें कारण काय ?

कैकेयीः—रामचन्द्रा ! तें कारण तुझा पिताच तुला चांगल्या रीतीनें सांगू शकेल ! आधीं कारणाची चौकशी करण्यापेक्षां पित्याची मूर्च्छा दूर करण्याचा प्रयत्न कर पाहूं. ( रामचंद्र दशरथास वारा घालूं लागतो. )

दशरथः—( सावध होऊन ) रामचंद्रा, तूं कोठें आहेस ? ती कृत्या कोठें गेली ?

रामचंद्रः—तात ! काय बोलतां तुम्ही हें ? कृत्या ती कोण ?

कैकेयीः—कृत्या ! कृत्या ! रामचन्द्रा ! हा तुझा सत्यप्रतिज्ञ बाप कोणाला उद्देशून आणि कशाकरितां हे शब्द बोलत आहे, हें तुला माहीत आहे काय ? परम पवित्र अशा सूर्यकुलांत जन्म घेऊन हा तुझा बाप आपल्या बेचाळीस पिढ्या नरकांत ढकलण्यास तयार झाला आहे.

रामचंद्रः—अंब ! आपल्या गूढ भाषणाचा अर्थच मला समजत नाहीं.

कैकेयीः—रामचंद्रा ! तुझ्या जन्मापूर्वी घडून आलेली अयोध्येच्या भावी राजाविषयींची घटना तुला विदित करणें आज माझें कर्तव्य आहे. माझ्या सौंदर्यानें वेडावून जाऊन तुझ्या बापानें जेव्हां माझ्या पित्याजवळ मला मागणी घातली, तेव्हां एकाच अटीवर त्यानें माझा तुझ्या पित्याशीं विवाह करून दिला. ती अट हीच कीं, मला मुलगा झाल्यास तो पुढें अयोध्येच्या सिंहासनाचा धनी व्हावा. ही घटना राज्यांतील सर्व जबाबदार मुत्सद्दयांना माहीत आहे. माझें बोलणें तुला खोटें वाटत असेल, तर हा तुझा पिता आणि गुरु येथें बसलेले आहेत. त्यांना विचारून याबद्दल पूर्ण खात्री करून घे.

रामचन्द्रः—अंब ! आपल्या वचनावर माझा पूर्ण विश्वास आहे. अयोध्येची पट्टमहिषि अनृतभाषण करील असें मला स्वप्नातहि वाटत नाहीं.

कैकेयीः—असें असतां या वचनाला हरताळ फांसून तुझा पिता भरताचा सिंहासनावरील हक्क दूर झुगारून देत आहे. तो आपलें वचन पालन करूं इच्छित नाहीं. हें त्याचें अन्यायाचें कृत्य तुला पसंत आहे काय ? पसंत नसेल तर या अधोगतीपासून पित्याचा बचाव करण्याच्या प्रयत्नास लाग पाहूं. पुत्र हा पित्याच्या पापाचा वांटेकरी होतो, अशी शास्त्राज्ञा आहे.

रामचन्द्रः—माते ! हा राम क्षत्रियपुत्र आहे. पराक्रमी क्षत्रिय बाहुबलावर राज्यें पादाक्रांत करून त्यांचा उपभोग घेत असतात. मला अयोध्येच्या सिंहासनाची मुळींच इच्छा नाहीं. त्यावर भरतानें खुशाल अधिष्ठित व्हावें. रामचन्द्राच्या मनगटांत शक्ति आहे, रामचन्द्राच्या हृदयांत उत्साह आहे, रामचन्द्राच्या मेंदूंत बुद्धि आहे. या त्रयींच्या जोरावर नूतन राज्य स्थापन करण्याचा मला हुरूप आहे.

४२. पद (चालः—दिव्य स्वातंत्र्य रवि०)

बुद्धि, विक्रांत द्रव्य साधनें आगळीं । सुधिरता
जगतितलिं आड नाहीं बळी ॥ध्रु०॥ राज्य भूवन

चरणीं सतत लोळत पहा। आपदा लपत त्या
नव भुवन मंडळीं ॥१॥

वीराच्या कर्तबगारीला संधीचा लाभ व्हावा लागतो. ती संधि अनायासें चालून आल्याबद्दल मला आनंदच वाटत आहे.तात!पित्याचें वचन परिपालन करण्याकरितां हा रामचन्द्र अयोध्येच्या सिंहासनाचा त्याग करण्यास तयार आहे.

वसिष्ठः—रामचन्द्रा ! तूं राज्यत्याग करण्यास तयार असशील ! पण ज्यांनीं तुला भावी राजा म्हणून निवडलें ती जनता भरताला राजा म्हणून कबूल करण्यास तयार झाली पाहिजे ना ? अयोध्येचें सिंहासन हें कांहीं दशरथाचें सिंहासन नाहीं कीं, त्यानें तें पाहिजे त्याला दान करावें ! हें रघुकुलाचें सिंहासन आहे, हें अयोध्येच्या पौरजनांचें सिंहासन आहे. राजा हा राष्ट्राचा उपभोगशून्य स्वामी आहे. प्रजेचें योग्य रीतीनें परिपालन करून तिची उन्नति साधणें हेंच त्याचें कार्य ! ह्या अधिकाराचा दुरुपयोग करून तो जर प्रजेच्या हक्कांत ढवळाढवळ करूं पाहील, तर त्या अधिकारातिक्रमणामुळें त्या राजाचा विनाश झाल्याशिवाय राहणार नाहीं.

४४. पद (चालः—दुर्मदें भरल्या अरीच्या०)

कामना असतां जनांची राज्यभारा वहाया। प्रबल
ना कोणी बलानें नाश तीचा कराया। सबल जनता
सतत पाही आत्महीता बघाया। आक्रमाया श्रेष्ठ
कार्या तशिच समरीं मराया ॥१॥

जेष्ठ पुत्र हाच राज्याचा स्वामी असावा असाच सूर्यवंशाचा परंपरागत नियम आहे. त्या नियमाचा त्याग तुलाहि करतां येणार नाहीं.

कैकेयीः—रामचंद्रा ! मला असल्या सतरापंधरा गोष्टींची गरज नाहीं. राज्यलोभाकरितां तूं आपल्या पित्याला नरकांत लोटणार कीं, स्वार्थत्याग करून तूं आपल्या कीर्तिनें त्रिभुवन भरून टाकणार ? धुरीणांच्या कृत्यांकडे सामान्य जनतेचें लक्ष असतें. आपल्या कृतीनें तिला यशाचा किंवा अपयशाचा मार्ग दाखविणें तुझ्या हातीं आहे.

रामः—गुरुमहाराज ! सूर्यवंशाच्या उत्कर्षाविषयीं वसिष्ठकुलास वाटत असलेली तळमळ जगांत मशहूर आहे. त्यामुळें तुम्हीं दिलेली सल्ला मान्य करणें हें जरी माझें परम कर्तव्य असलें, तरी यावेळीं माझें मन त्या कर्तव्यास सादर होण्यास मला सांगत नाहीं. स्वार्थत्याग हाच मानवाचा परम धर्म आहे. त्यागानेंच त्याच्या कर्तव्याला उज्ज्वलता येते. माझ्या सर्व पूज्य-पूर्वजांनीं त्यागानेंच आपलें महात्म्य जगतीतलावर प्रस्थापित केलें आहे. महात्मा दिलीपानें आपला देह सिंहाच्या भक्ष्यस्थानीं टाकण्या-पर्यंत त्यागाची पराकाष्ठा केल्यामुळेंच त्याचें यश जगतीतलावर कायम राहिलें आहे. स्वार्थत्यागाशिवाय कोणत्याहि कार्याला महति नाहीं. स्वार्थत्याग हाच यशाचें माप आहे. पित्याला पापापासून बचावण्याकरितां रामचंद्राच्या हातून थोडासाहि त्याग झाला नाहीं, तर जग त्याला काय म्हणेल ? म्हणून मी अशी प्रतिज्ञा करितों कीं, अयोध्येच्या सिंहासनावर—

दशरथः—रामचंद्रा ! थांब ! अशी एकदम प्रतिज्ञा करूं नकोस. स्वतःच्या सुखाकरितां दिलेल्या वचनामुळें पुत्राच्या सर्वस्वाची आहुति पडत आहे हें पाहून कोणत्या सहृदय पित्याला बरें वाटेल ? अजूनहि भरताची संमति मिळाल्यास तुला सिंहासनावर बसतां येईल. बंधुप्रेमानें भावनावश बनलेला भरत आपला सिंहासनावरचा हक्क कधींहि सांगणार नाहीं, असा मला भरंवसा आहे.

रामः—तात ! असलें भिक्षेचें राज्य स्वीकारण्यास तुम्हीं मला कसें सांगतां ? भिक्षेचें अन्न सुद्धां अंगीं लागत नाहीं, मग भिक्षेच्या राज्याची प्रतिष्ठा ती काय ? क्षत्रिय वीर दान घेत नसतात; दान करणें हाच त्यांचा धर्म आहे. स्वतःच्या सामर्थ्यावर राज्य संपादन करून योग्य वाट-ल्यास त्या राज्याचें दान करावें, अशी माझी इच्छा आहे. रघुराजानें आपली कुबेरासारखी सर्व संपत्ति ब्राम्हणांस दान केली; पण ती संपत्ति त्यानें स्वतः कमावलेली होती. स्वतः मृत्तिकापात्रें वापरण्याचा त्यानें उप-क्रम केला; पण कोणाजवळ याचना म्हणून केली नाहीं. वंशपरंपरेनें त्याच

महात्म्याचें रक्त माझ्या अंगांत खेळत आहे. भिक्षेचें राज्य मला मुळींच स्वीकारतां येणार नाहीं.

वसिष्ठः—रामचंद्रा ! असा अविचार करूं नकोस ! अयोध्येच्या राज्यावर खरी सत्ता तुझीच आहे. भरताचा शांततेचा कारभार राज्यरक्षणास मुळींच उपयोगी पडणार नाहीं. त्या योगानें अनार्य प्रबल होतील आणि भारतवर्षांतील आर्यांची सत्ता संपुष्टांत येईल. लोकहितकारक त्याग हाच खरा त्याग होय. ज्या त्यागाच्या योगानें स्वजन, स्वदेश आणि स्वसंस्कृति यांचें संगोपन होऊन उत्कर्ष साधेल तोच खरा त्याग होय. तुझ्यासारख्या वीराला हा त्याग शोभत नाहीं.

रामचन्द्रः—गुरुवर्य ! तुमें कर्तव्याकर्तव्यांच्या कात्रींत सांपडून माझ्या कोमल मनोवृत्ति बहिरून जात आहेत. राम एकवचनी आहे अशी ख्याति असल्यानें मघां बोलून टाकलेले शब्द मला आतां परत घेतां येत नाहींत. कसल्याहि बिकट परिस्थितींत कोणत्याहि संकटांनीं गांगरून जाऊन वचनापासून ढळणें रामाला कधींहि शोभणार नाहीं.

४५. पद ( चालः—परवशता पाश दैवें० )

अनुसरतां शब्द रामें नाहीं कधीं मोडिला। विभव-
पदीं असतांनाही हाच ध्यास त्याला ॥ ध्रु० ॥
विमल सत्य पालन करण्या वचनबद्ध झाला।
राज्य, द्रव्य, वनिता, माता, पितृ तुच्छ झाला॥ १॥

म्हणून या महत्कार्यांत सिद्धी मिळविण्याकरितां आपण मला आशिर्वाद द्यावा. अंब ! तात ! आपणाजवळहि हा राम आशिर्वादाची भिक्षा मागत आहे. अयोध्येच्या तोडीचें नूतन राज्य संपादन करूनच हा राम आपले पवित्र पाय वंदन करण्यास येईल.

दशरथः—बाळ ! भारतवर्षांतील सर्व आर्य नृपतींचा आपसांत सलोखा होऊन असें ठरलें आहे कीं, कोणत्याहि आर्यराजानें किंवा राजपुत्रानें अन्य दुर्बल राजांचें राज्य अपहरण करून त्यावर आपली सत्ता गाजवूं नये. जर

एखाद्या आर्यराजानें या नियमाचें उल्लंघन केलें, तर सर्वांनीं एकत्र होऊन त्या अन्यायाचें परिमार्जन करावें; म्हणून आर्यावर्तांत तरी तुला नूतन राज्याची संस्थापना करितां येणार नाहीं. राहिलेला अनार्यांचा दक्षिण प्रांत अतिशय संकटांनीं व्याप्त आहे. रानटी जाति आणि हिंस्र श्वापदें यांनीं तो गजबजून गेला आहे. त्यांचें निर्मूलन करून त्या देशांत राज्य स्थापन करणें मानवी शक्तीला शक्य नाहीं. आजपर्यंत अनेक आर्यवीरांनी त्या प्रयत्नांत आपले प्राण खर्ची घातले आहेत; पण एकाच्याहि हातून तें महत्कार्य सिद्धीस गेलेलें नाहीं.

**रामचंद्रः**—म्हणूनच तें महत्कार्य शेवटास नेण्याची मला महत्वाकांक्षा आहे. दक्षिण देशांत जाऊन वानर म्हणून ओळखण्यांत येणाऱ्या तेथील रानटी जातींना आर्य संस्कृतीची दीक्षा देऊन, त्या संस्कृतीचा डंका अखिल भारतवर्षांत गाजवावा आणि आर्यावर्ताची सीमा दक्षिणसमुद्रास नेऊन भिडवावी, हीच माझ्या जीवनाची महत्वाकांक्षा आहे. अयोध्येचा राज्यभार वाहण्यांतच जर गुंतून राहिलों, तर तें कार्य तडीस जाण्याची आशाच धरतां आली नसती; परंतु ईशेच्छेप्रमाणें सर्व गोष्टी घडून येत असतात. माझ्या राज्यत्यागांतूनच आर्यसंस्कृतीचा प्रसार व्हावा असा त्या सर्वशक्तिमान ईश्वराचा हेतु नाहीं म्हणून तरी कोणी सांगावें ?

**दशरथः**—बाळा ! तेथील रानटी लोकांच्या क्रूरत्वाची तुला यत्किंचितहि कल्पना नाहीं. ते लोक आर्यांचा अतिशय द्वेष करीत असतात. तुला त्या प्रांतांत वस्तीहि करण्यास ते हरकत करतील. मग त्यांना वश करण्याची, त्यांना सुधारण्याची गोष्टच बोलावयास नको.

**रामचंद्रः**—तात ! रामानें विनाकारण कोणाचाहि घात केलेला नाहीं. म्हणून त्याला जगातील कोणत्याहि शक्तीची भीति वाटत नाहीं. कार्यसिद्धि हीच कर्तव्याची परीक्षा आहे आणि कार्य जितकें कठीण तितकेंच यशाचें महत्वहि जास्त आहे. पूर्वजांचें सिंहासन कोणीहि सांभाळील. त्यांत कांहीं विशेष नाहीं. स्वसंपादित संपत्ति हीच यशाची गुरुकिल्ली आहे.

४६. पद ( चालः—स्वातंत्र्य हेंच ज्याचें० )

सामर्थ्य मानवाचें। यशगीत संपदेचें । नृप आसनीं
बसाया । जनहीत साधनेचें ॥ ध्रु० ॥ कुलकीर्ति
पूर्वजांची । भूषा न मानवाला। विश्वांत मीरवाया।
स्वार्जीत भाग्य त्याचें ॥१॥

म्हणून आनंदीत हृदयानें दक्षिणप्रांतांत जाऊन राहण्यास मला परवानगी द्या पाहूं.

दशरथः—बाळा ! वृद्धत्वांत मनुष्याला पुत्राचाच आधार असतो. नयनांत नाचणारा, हृदयांत हालणारा, बुद्धींत बोलणारा तुझ्यासारखा पुत्र दृष्टिआड होतांच माझे प्राण तरी राहातील काय ? धनुर्विद्येचें शिक्षण देण्याकरितां तुम्हां उभयतांस विश्वामित्राच्या स्वाधीन करतेवेळीं मला जें ब्रम्हांड आठवलें, त्याचें मला अजूनहि स्मरण होत आहे; परंतु क्षत्रियोचित धनुर्विद्येंत तुम्हांला शक्य तितकें प्रविण बनविणें हें माझें कर्तव्य होतें; पण आतां तुझा विरह सहन होणें मला शक्य नाहीं.

४७. पद (चालः—बहु आपुल्या सहवासीं या०)

तव विरहें असु माझे हे जाती पहा ॥ध्रु०॥ जरठ
कामना पुरवुनि प्रेमें सदन भुषित करिं आनंदें राहिं
गृहा । लोकपाल सदा विलसत तेजें। दास सकल
जन स्वाराज्यीं वरिं वर हा ॥१॥

कैकेयीः—रामचंद्रा ! कसला विचार करतोस ? भरताच्या सत्तेचें राज्य बळकावून तूं आपलें कृष्णमुख जगतांत दिमाखानें मिरविणार काय ? सागरवलयांकित हा अफाट भारतवर्ष तुझ्या कर्तबगारीला मोकळा असतां परभृतपणाचें जीवन व्यतीत करून तूं आपलें कुल उज्ज्वल करणार काय ? सांग ! रामचंद्रा, सांग! तुझ्या एका शब्दावर रघुकुलाच्या यशाचें भवितव्य अवलंबून आहे.

रामचंद्रः—माते ! राम एकदां तोंडांतून उच्चारलेला शब्द कधींहि फिरवीत नाहीं. केवळ तातांच्या आज्ञेकरितां मी खोळंबून उभा आहे.

कैकेयीः—राजा ! कसले लपण्डाव खेळतोस ? स्वतःच्या खुषीनें रामचन्द्र आपला राज्याधिकार सोडण्यास तयार असतां तुला कसला मायेचा उमाळा येत आहे ? स्वतःचा सत्यानाश केलास, हें पाप पुरे झालें नाहीं काय ?

दशरथः—कैकेयी ! गुरुजनांसमोर असलें अभद्रभाषण करूं नये ! ही जाणीवही तुला राहिली नाहीं ना ? स्त्रियांची मर्यादा सुटल्यावर कुलाचें पावित्र्य तें काय राहिलें ?

कैकेयीः—हा महाल माझा आहे. माझ्या परवानगीशिवाय येथें येण्याचें कोणालाहि कारण नाहीं. मला न्याय पाहिजे आहे. न्यायदेवतेला कोणाचीहि मर्यादा किंवा भीति बाळगण्याचें कारण काय ? भरताचा राज्यावरील हक्क उडवून देण्याचा ज्यांनीं अन्यायानें प्रयत्न केला, त्यांनींच अयोध्येच्या पट्टराणीच्या महालांत येण्यापूर्वीच कांहीं विचार करावयास पाहिजे होता.

रामचन्द्रः—तात ! मायेचा मोह दूर सारून कर्तव्यनिष्ठुर होण्याची ही वेळ आहे. वादविवादात व्यर्थ कालक्षेप करून एकमेकांचीं मनें दुखविण्यांत अर्थ काय ? उद्यांचा यौवराज्याभिषेकोत्सव तर आतां रद्द झालाच आहे. आजच्या आज भरताला बोलावण्यास नंदिग्रामास रथ रवाना करा; परंतु येथें घडलेली घटना मात्र त्यास तिकडे निवेदन न होईल, अशी दक्षता बाळगा. उद्यांच्याच सुमुहूर्तावर दक्षिणापथांत जाण्याचें मी प्रस्थान ठेवतों. ईश्वरीघटनेप्रमाणें सर्व गोष्टी घडून येत असतात. जगाचा जगदीश जें करितो तें बऱ्याकरितांच करीत असतो.

४८. पद (चालः—परम गहन ईश काम०)

विमल करित नित्य ईश। धरित सतत श्रेष्ठ आस।
वसुधातलिं सतत,विरस। नर उगाच होई। दाक्षिण

अवनी विशाल । परम सुपिक सस्यशाल । जन
सुहिता अति सुकाल । मिळत आज पाहीं ॥१॥

दशरथः—रामचन्द्रा ! माझ्या अपराधाचें प्रायश्चित तूं काय म्हणून घेतोस ? पित्राज्ञा परिपालन हा जरी पुत्राचा धर्म असला तरी पुत्राला कोणती आज्ञा द्यावी, याचा तारतम्यभाव पित्यानें अवश्य बाळगिला पाहिजे; परंतु वचनबद्धतेमुळें मी तुला आनंदानें परवानगी देतों. तुझ्या पश्चात् माझे प्राण देहाचा आश्रय सोडून निघून जातील; पण सत्यप्रतिज्ञ सूर्यवंश वचनपराङ्मुख झाला, हा डंका जगतांत वाजण्यापेक्षां माझ्या प्राणाची किंमत मला जास्त वाटत नाहीं. कार्यांत सिद्धि मिळवून तूं जेव्हां परत येशील, तेव्हां माझा आत्मा तुझें आनंदानें स्वागत केल्याशिवाय राहणार नाहीं. जा, बाळा! आपल्या अंगिकृत कार्यांत पूर्ण सिद्धि मिळवून परत ये.

४९. पद ( चालः—इतुकें कळवी आज० )

मिळवी विजय श्रेष्ठ सिद्धी बलानें । विजयींहि
विरतेसि वरि वैभवानें । तव आगमन मोदकर
स्वागतानें । लोकीं स्मृती नित्य राहो सुखानें ॥१॥

भरतवाक्य.

५०. पद ( चालः—मरण तरि कां न ये० )

सतत तनु आमुची देश जननी पदीं । पडुनियां
विक्रमें शोभु विश्वामधीं ॥ ध्रु० ॥ स्वार्थ नच
आकळो । लोभ भीति पळो । ज्ञान सगळें वळो ।
श्रेष्ठ गुण धारणीं ॥१॥ सकल जन उन्नती । विमल
कार्यीं रती । भव्य समरीं धृती । वितर विभवांबुधी ॥

समाप्त.

रामचंद्रः—अंब ! आपल्या गूढ भाषणाचा अर्थच मला समजत नाहीं.

कैकेयीः—रामचंद्रा ! तुझ्या जन्मापूर्वी घडून आलेली अयोध्येच्या भावी राजाविषयींची घटना तुला विदित करणें आज माझें कर्तव्य आहे. माझ्या सौंदर्यानें वेडावून जाऊन तुझ्या बापानें जेव्हां माझ्या पित्याजवळ मला मागणी घातली, तेव्हां एकाच अटीवर त्यानें माझा तुझ्या पित्याशीं विवाह करून दिला. ती अट हीच कीं, मला मुलगा झाल्यास तो पुढें अयोध्येच्या सिंहासनाचा धनी व्हावा. ही घटना राज्यांतील सर्व जबाबदार मुत्सद्द्यांना माहीत आहे. माझें बोलणें तुला खोटें वाटत असेल, तर हा तुझा पिता आणि गुरु येथें बसलेले आहेत. त्यांना विचारून याबद्दल पूर्ण खात्री करून घे.

रामचन्द्रः—अंब ! आपल्या वचनावर माझा पूर्ण विश्वास आहे. अयोध्येची पट्टमहिषि अनृतभाषण करील असें मला स्वप्नांतहि वाटत नाहीं.

कैकेयीः—असें असतां या वचनाला हरताळ फांसून तुझा पिता भरताचा सिंहासनावरील हक्क दूर झुगारून देत आहे. तो आपलें वचन पालन करूं इच्छित नाहीं. हें त्याचें अन्यायाचें कृत्य तुला पसंत आहे काय ? पसंत नसेल तर या अधोगतीपासून पित्याचा बचाव करण्याच्या प्रयत्नास लाग पाहूं. पुत्र हा पित्याच्या पापाचा वांटेकरी होतो, अशी शास्त्राज्ञा आहे.

रामचन्द्रः—माते ! हा राम क्षत्रियपुत्र आहे. पराक्रमी क्षत्रिय बाहुबलावर राज्यें पादाक्रांत करून त्यांचा उपभोग घेत असतात. मला अयोध्येच्या सिंहासनाची मुळींच इच्छा नाहीं. त्यावर भरतानें खुशाल अधिष्ठित व्हावें. रामचन्द्राच्या मनगटांत शक्ति आहे, रामचन्द्राच्या हृदयात उत्साह आहे, रामचन्द्राच्या मेंदूंत बुद्धि आहे. या त्र्यींच्या जोरावर नूतन राज्य स्थापन करण्याचा मला हुरूप आहे.

४२. पद (चालः—दिव्य स्वातंत्र्य रवि०)

बुद्धि, विक्रांत द्वय साधनें आगळीं । सुधिरता
जगतितलिं आड नाहीं बळी ॥ध्रु०॥ राज्य भूवन

चरणीं सतत लोळत पहा। आपदा लपत त्या
नव भुवन मंडळीं ॥१॥

वीराच्या कर्तबगारीला संधीचा लाभ व्हावा लागतो. ती संधि अनायासें चालून आल्याबद्दल मला आनंदच वाटत आहे.तातांपित्याचें वचन परिपालन करण्याकरितां हा रामचन्द्र अयोध्येच्या सिंहासनाचा त्याग करण्यास तयार आहे.

वसिष्ठः—रामचन्द्रा ! तूं राज्यत्याग करण्यास तयार असशील ! पण ज्यांनीं तुला भावी राजा म्हणून निवडलें ती जनता भरताला राजा म्हणून कबूल करण्यास तयार झाली पाहिजे ना ? अयोध्येचें सिंहासन हें कांहीं दशरथाचें सिंहासन नाहीं कीं, त्यानें तें पाहिजे त्याला दान करावें ! हें रघुकुलाचें सिंहासन आहे, हें अयोध्येच्या पौरजनांचें सिंहासन आहे. राजा हा राष्ट्राचा उपभोगशून्य स्वामी आहे. प्रजेचें योग्य रीतीनें परिपालन करून तिची उन्नति साधणें हेंच त्याचें कार्य ! ह्या अधिकाराचा दुरुपयोग करून तो जर प्रजेच्या हक्कांत ढवळाढवळ करूं पाहील, तर त्या अधिकारातिक्रमणामुळें त्या राजाचा विनाश झाल्याशिवाय राहणार नाहीं.

४४. पद ( चालः—दुर्मदें भरल्या अरीच्या० )

कामना असतां जनांची राज्यभारा वहाया । प्रबल
ना कोणी बलानें नाश तीचा कराया। सबल जनता
सतत पाही आत्महीता बघाया । आक्रमाया श्रेष्ठ
कार्या तशिच समरीं मराया ॥१॥

जेष्ठ पुत्र हाच राज्याचा स्वामी असावा असाच सूर्यवंशाचा परंपरागत नियम आहे. त्या नियमाचा त्याग तुलाहि करतां येणार नाहीं.

कैकेयीः—रामचंद्रा ! मला असल्या सतरापंधरा गोष्टींची गरज नाहीं. राज्यलोभाकरितां तूं आपल्या पित्याला नरकांत लोटणार कीं, स्वार्थत्याग करून तूं आपल्या कीर्तिनें त्रिभुवन भरून टाकणार ? धुरीणांच्या कृत्यांकडे सामान्य जनतेचें लक्ष असतें. आपल्या कृतीनें तिला यशाचा किंवा अपयशाचा मार्ग दाखविणें तुझ्या हातीं आहे.

रामः–गुरुमहाराज ! सूर्यवंशाच्या उत्कर्षाविषयीं वसिष्ठकुलास वाटत असलेली तळमळ जगांत महशूर आहे. त्यामुळें तुम्हीं दिलेली सल्ला मान्य करणें हें जरी माझें परम कर्तव्य असलें, तरी यावेळीं माझें मन त्या कर्तव्यास सादर होण्यास मला सांगत नाहीं. स्वार्थत्याग हाच मानवाचा परम धर्म आहे. त्यागानेंच त्याच्या कर्तव्याला उज्ज्वलता येते. माझ्या सर्व पूज्य पूर्वजांनीं त्यागानेंच आपलें महात्म्य जगतीतलावर प्रस्थापित केलें आहे. महात्मा दिलीपानें आपला देह सिंहाच्या भक्ष्यस्थानीं टाकण्या-पर्यंत त्यागाची पराकाष्ठा केल्यामुळेंच त्याचें यश जगतीतलावर कायम राहिलें आहे. स्वार्थत्यागाशिवाय कोणत्याहि कार्याला महति नाहीं. स्वार्थत्याग हाच यशाचें माप आहे. पित्याला पापापासून बचावण्याकरितां रामचंद्राच्या हातून थोडासाहि त्याग झाला नाहीं, तर जग त्याला काय म्हणेल ? म्हणून मी अशी प्रतिज्ञा करितों कीं, अयोध्येच्या सिंहासनावर–

दशरथः–रामचंद्रा ! थांब ! अशी एकदम प्रतिज्ञा करूं नकोस. स्वतःच्या सुखाकरितां दिलेल्या वचनामुळें पुत्राच्या सर्वस्वाची आहुति पडत आहे हें पाहून कोणत्या सहृदय पित्याला बरें वाटेल ? अजूनहि भरताची संमति मिळाल्यास तुला सिंहासनावर बसतां येईल. बंधुप्रेमानें भावनावश बनलेला भरत आपला सिंहासनावरचा हक्क कधींहि सांगणार नाहीं, असा मला भरंवसा आहे.

रामः–तात ! असलें भिक्षेचें राज्य स्वीकारण्यास तुम्हीं मला कसें सांगतां ? भिक्षेचें अन्न सुद्धां अंगीं लागत नाहीं, मग भिक्षेच्या राज्याची प्रतिष्ठा ती काय ? क्षत्रिय वीर दान घेत नसतात; दान करणें हाच त्यांचा धर्म आहे. स्वतःच्या सामर्थ्यावर राज्य संपादन करून योग्य वाट-ल्यास त्या राज्याचें दान करावें, अशी माझी इच्छा आहे. रघुराजानें आपली कुबेरासारखी सर्व संपत्ति ब्राम्हणांस दान केली; पण ती संपत्ति त्यानें स्वतः कमावलेली होती. स्वतः मृत्तिकापात्रें वापरण्याचा त्यानें उप-क्रम केला; पण कोणाजवळ याचना म्हणून केली नाहीं. वंशपरंपरेनें त्याच

महात्म्याचें रक्त माझ्या अंगांत खेळत आहे. भिक्षेचें राज्य मला मुळींच स्वीकारतां येणार नाहीं.

वसिष्ठः—रामचंद्रा ! असा अविचार करूं नकोस ! अयोध्येच्या राज्यावर खरी सत्ता तुझीच आहे. भरताच्या शांततेचा कारभार राज्यरक्षणास मुळींच उपयोगी पडणार नाहीं. त्या योगानें अनार्य प्रबल होतील आणि भारतवर्षांतील आर्यांची सत्ता संपुष्टांत येईल. लोकहितकारक त्याग हाच खरा त्याग होय. ज्या त्यागाच्या योगानें स्वजन, स्वदेश आणि स्वसंस्कृति यांचें संगोपन होऊन उत्कर्ष साधेल तोच खरा त्याग होय. तुझ्यासारख्या वीराला हा त्याग शोभत नाहीं.

रामचन्द्रः—गुरुवर्य ! तूर्त कर्तव्याकर्तव्यांच्या कात्रींत सांपडून माझ्या कोमल मनोवृत्ति बहिरून जात आहेत. राम एकवचनी आहे अशी ख्याति असल्यानें मघां बोलून टाकलेले शब्द मला आतां परत घेतां येत नाहींत. कसल्याहि बिकट परिस्थितींत कोणत्याहि संकटांनीं गांगरून जाऊन वचनापासून ढळणें रामाला कधींहि शोभणार नाहीं.

४५. पद ( चालः—परवशता पाश दैवें० )

अनुसरतां शब्द रामें नाहीं कधीं मोडिला। विभव-
पदीं असतांनाही हाच ध्यास त्याला ॥ ध्रु० ॥
विमल सत्य पालन करण्या वचनबद्ध झाला।
राज्य, द्रव्य, वनिता, माता, पितृ तुच्छ झाला॥ १॥

म्हणून या महत्कार्यांत सिद्धी मिळविण्याकरिता आपण मला आशिर्वाद द्यावा. अंब ! तात ! आपणाजवळहि हा राम आशिर्वादाची भिक्षा मागत आहे. अयोध्येच्या तोडीचें नूतन राज्य संपादन करूनच हा राम आपले पवित्र पाय वंदन करण्यास येईल.

दशरथः—बाळ ! भारतवर्षांतील सर्व आर्य नृपतींचा आपसांत सलोखा होऊन असें ठरलें आहे कीं, कोणत्याहि आर्यराजानें किंवा राजपुत्रानें अन्य दुर्बल राजांचें राज्य अपहरण करून त्यावर आपली सत्ता गाजवूं नये. जर

एखाद्या आर्यराजानें या नियमाचें उल्लंघन केलें, तर सर्वांनीं एकत्र होऊन त्या अन्यायाचें परिमार्जन करावें; म्हणून आर्यावर्तांत तरी तुला नूतन राज्याची संस्थापना करितां येणार नाहीं. राहिलेला अनार्यांचा दक्षिण प्रांत अतिशय संकटांनीं व्याप्त आहे. रानटी जाति आणि हिंस्र स्वापदें यांनीं तो गजबजून गेला आहे. त्यांचें निर्मूलन करून त्या देशांत राज्य स्थापन करणें मानवी शक्तीला शक्य नाहीं. आजपर्यंत अनेक आर्यवीरांनी त्या प्रयत्नांत आपले प्राण खर्ची घातले आहेत; पण एकाच्याहि हातून तें महत्कार्य सिद्धीस गेलेलें नाहीं.

रामचंद्रः—म्हणूनच तें महत्कार्य शेवटास नेण्याची मला महत्वाकांक्षा आहे. दक्षिण देशांत जाऊन वानर म्हणून ओळखण्यांत येणाऱ्या तेथील रानटी जातींना आर्य संस्कृतीची दीक्षा देऊन, त्या संस्कृतीचा डंका अखिल भारतवर्षांत गाजवावा आणि आर्यावर्ताची सीमा दक्षिणसमुद्रास नेऊन भिडवावी, हीच माझ्या जीवनाची महत्वाकांक्षा आहे. अयोध्येचा राज्यभार वाहण्यांतच जर गुंतून राहिलों, तर तें कार्य तडीस जाण्याची आशाच धरतां आली नसती; परंतु ईशेच्छेप्रमाणें सर्व गोष्टी घडून येत असतात. माझ्या राज्यत्यागांतूनच आर्यसंस्कृतीचा प्रसार व्हावा असा त्या सर्वशक्तिमान ईश्वराचा हेतु नाहीं म्हणून तरी कोणी सांगावें ?

दशरथः—बाळा ! तेथील रानटी लोकांच्या क्रूरत्वाची तुला यत्किंचितहि कल्पना नाहीं. ते लोक आर्यांचा अतिशय द्वेष करीत असतात. तुला त्या प्रांतांत वस्तीहि करण्यास ते हरकत करतील. मग त्यांना वश करण्याची, त्यांना सुधारण्याची गोष्टच बोलावयास नको.

रामचंद्रः—तात ! रामानें विनाकारण कोणाचाहि घात केलेला नाहीं. म्हणून त्याला जगातील कोणत्याहि शक्तीची भीति वाटत नाहीं. कार्यसिद्धि हीच कर्तव्याची परीक्षा आहे आणि कार्य जितकें कठीण तितकेंच यशाचें महत्वहि जास्त आहे. पूर्वजांचें सिंहासन कोणीहि सांभाळील. त्यांत कांहीं विशेष नाहीं. स्वसंपादित संपत्ति हीच यशाची गुरुकिल्ली आहे.

४६. पद ( चालः—स्वातंत्र्य हेंच ज्याचें० )

सामर्थ्य मानवाचें। यशगीत संपदेचें। नृप आसनीं
बसाया। जनहीत साधनेचें॥ ध्रु०॥ कुलकीर्ति
पूर्वजांची। भूषा न मानवाला। विश्वांत मिरवाया।
स्वार्जीत भाग्य त्याचें॥१॥

म्हणून आनंदोत हृदयानें दक्षिणप्रांतांत जाऊन राहण्यास मला परवानगी द्या पाहूं.

दशरथः—बाळा! वृद्धत्वांत मनुष्याला पुत्राचाच आधार असतो. नयनांत नाचणारा, हृदयांत हालणारा, बुद्धींत बोलणारा तुझ्यासारखा पुत्र दृष्टिआड होतांच माझे प्राण तरी राहातील काय? धनुर्विद्येचें शिक्षण देण्याकरितां तुम्हां उभयतांस विश्वामित्राच्या स्वाधीन करतेवेळीं मला जें ब्रम्हांड आठवलें, त्याचें मला अजूनहि स्मरण होत आहे; परंतु क्षत्रियोचित धनुर्विद्येंत तुम्हांला शक्य तितकें प्रविण बनविणें हें माझें कर्तव्य होतें; पण आतां तुझा विरह सहन होणें मला शक्य नाहीं.

४७. पद (चालः—बहु आपुल्या सहवासीं या०)

तव विरहें असु माझे हे जाती पहा॥ध्रु०॥ जरठ
कामना पुरवुनि प्रेमें सदन भुषित करि आनंदें राहिं
गृहा। लोकपाल सदा विलसत तेजें। दास सकल
जन स्वाराज्यीं वरि वर हा॥१॥

कैकेयीः—रामचंद्रा! कसला विचार करतोस? भरताच्या सत्तेचें राज्य बळकावून तूं आपलें कृष्णमुख जगतांत दिमाखानें मिरविणार काय? सागरवलयांकित हा अफाट भारतवर्ष तुझ्या कर्तबगारीला मोकळा असतां परभृतपणाचें जीवन व्यतीत करून तूं आपलें कुल उज्ज्वल करणार काय? सांग! रामचंद्रा, सांग! तुझ्या एका शब्दावर रघुकुलाच्या यशाचें भवितव्य अवलंबून आहे.

रामचंद्रः-माते! राम एकदां तोंडांतून उच्चारलेला शब्द कधींहि फिरवीत नाहीं केवळ तातांच्या आज्ञेकरितां मी खोळंबून उभा आहे.

कैकेयीः-राजा! कसले लपण्डाव खेळतोस? स्वतःच्या खुषीनें रामचन्द्र आला राज्याधिकार सोडण्यास तयार असतां तुला कसला मायेचा उमळा येत आहे? स्वतःचा सत्यानाश केलास, हें पाप पुरे झालें नाहीं काय

दशरथःकैकेयी! गुरुजनांसमोर असलें अभद्रभाषण करूं नये! ही जाणीवही का राहिली नाहीं ना? स्त्रियांची मर्यादा सुटल्यावर कुलाचें पावित्र्य तें काय राहिलें?

कैकेयी-हा महाल माझा आहे. माझ्या परवानगीशिवाय येथें येण्याचें कोणालाहि कारण नाहीं. मला न्याय पाहिजे आहे. न्यायदेवतेला कोणाचीहि मर्यादा किंवा भीति बाळगण्याचें कारण काय? भरताचा राज्यावरील हक्क उडवून देण्याचा ज्यांनीं अन्यायानें प्रयत्न केला, त्यांनींच अयोध्येच्या पट्टराणीच्या महालांत येण्यापूर्वीच कांहीं विचार करावयास पाहिजे होता.

रामचन्द्रः-तात! मायेचा मोह दूर सारून कर्तव्यनिष्ठुर होण्याची ही वेळ आहे वादविवादांत व्यर्थ कालक्षेप करून एकमेकांचीं मनें दुखविण्यांत अर्थ काय? उद्यांचा यौवराज्याभिषेकोत्सव तर आतां रद्द झालाच आहे. आजच्याआज भरताला बोलावण्यास नंदिग्रामास रथ रवाना करा; परंतु येथें घडलेली घटना मात्र त्यास तिकडे निवेदन न होईल, अशी दक्षता बाळगा. उद्यांच्याच सुमुहूर्तावर दक्षिणापथांत जाण्याचें मी प्रस्थान ठेवतों. ईश्वरीघटनेप्रमाणें सर्व गोष्टी घडून येत असतात. जगाचा जगदीश जें करितो तें बऱ्याकरितांच करीत असतो.

४८. पद (चालः-परम गहन ईश काम०)

विमल करित नित्य ईश। धरित सतत श्रेष्ठ आस।
वसुधातलिं सतत,विरस। नर उगाच होई। दाक्षिण

अवनी विशाल [illegible] सुपिक सस्यश [illegible] । त्र
सुहिता अति सुकाल । मिळत आज पा [illegible] ॥

दशरथः—रामचन्द्रा ! माझ्या अपराधाचें प्रा[illegible]त काय म्हणून घेतोस ? पित्राज्ञा परिपालन हा जरी पुत्राचा धर्म असलातरी पुत्राला कोणती आज्ञा द्यावी, याचा तारतम्यभाव पित्यानें अवश्य बाळगिला पाहिजे; परंतु वचनबद्धतेमुळें मी तुला आनंदानें परवानगी देतों. तुझ्या पश्चात् माझे प्राण देहाचा आश्रय सोडून निघून जातील; पण सत्यप्रतिज्ञ सूर्यवंश वचनपराङ्मुख झाला, हा डंका जगतांत वाजण्यास माझ्या प्राणाची किंमत मला जास्त वाटत नाहीं. कार्यांत सिद्धि मिळवून तूं जेव्हां परत येशील, तेव्हां माझा आत्मा तुझें आनंदानें स्वागत केल्याशिवाय राहणार नाहीं. जा, बाळा! आपल्या अंगिकृत कार्यांत पूर्ण सिद्धि मिळवून परत ये.

४९. पद ( चालः—इतुकें कळवी आज० )

मिळवी विजय श्रेष्ठ सिद्धी बलानें । विजनींहि
विरतसि वरि वैभवानें । तव आगमन मोदकर
स्वागतानें । लोकीं स्मृती नित्य राहो सुखानें ॥१॥

भरतवाक्य.

५०. पद ( चालः—मरण तरि कां न ये० )

सतत तनु आमुची देश जननी पदीं । पडुनियां
विक्रमें शोभुं विश्वामधीं ॥ ध्रु० ॥ स्वार्थ नच
आकळो । लोभ भीति पळो । ज्ञान सगळें वळो ।
श्रेष्ठ गुण धारणीं ॥१॥ सकल जन उन्नती । विमल
कार्यीं रती । भव्य समरीं धृती । वितर विभवांबुधी ॥

समाप्त.